DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021
कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, अंबरनाथ-बदलापूर, भिवंडी, उल्हासनगर, मुरबाड, शहापूर.
www.thanevaibhav.in

# ठाणेवैभव

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ
भारतीय सौर दिनांक आश्विन ९ शके १९४४ | वर्ष ४८ | अंक ३६ | शनिवार १ ऑक्टोबर | पाने १२ | रु. ४
संपादक : मिलिन्द बल्लाळ

## नव्या नियुक्त्या, नवी आव्हाने !

➤➤अग्रलेख / 5

## ठाण्यातील पहिले हृदय प्रत्यारोपण यशस्वी

➤➤पान 3

## किमान पाच वर्षे ठामपात होणार नाही नोकरभरती

➤➤पान 3

प्रॉपर्टी EXHIBITION

SECOND HOMES
WEEKEND HOMES
AFFORDABLE HOMES

Inauguration by
Mr. Amit Porwal
Principal Designer
Icon Projects Inspace Pvt Ltd
at 12:00 noon

HOTEL TIP TOP PLAZA,
NEAR TEEN HATH NAKA, THANE WEST.

+91-93269 25975
+91-98330 05777

www.dreamhomesexpo.com
info@asiaticexpositions.com

THE WATERFRONT SUITES
Presents
Dream Homes® Expo

ENTRY FREE
1st & 2nd OCTOBER 2022
TIME: 10AM - 8PM
OPENING TODAY



Banking Partner | Associate Partner | Associate Partner | Print & Online Magazine Partner | Expo Organized & Conceptualized by:
बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda
(Engineers & Builders) VARDHAMAN GROUP
INFRATECH PRIME PLOTS & LAND EXPERTS
PROPERTY HOUSE
ASIATIC EXPOSITIONS®
SIBA

श्री. अजित मनोहर सावंत
उपाध्यक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, ठाणे शहर (जिल्हा)
आपणांस वाढदिवसाच्या मनस्वी शुभेच्छा !







AMAZETECH ENTERPRISES
९ ऑक्टोबर

# प्रवाशांची मोबाईल तिकीट ॲपला पसंती

**मुंबई :** करोनाकाळात बंद झालेली रेल्वेची मोबाइल तिकीट ॲप सेवा पुन्हा सेवेत दाखल झाल्यानंतर त्याला प्रवाशांकडून प्रतिसाद वाढू लागला आहे. तिकीट खिडकी समोरील रांगेत उभे राहून तिकीट वा पास काढणारे प्रवासी आता हळूहळू कागदविरहित मोबाइल ॲप तिकीट सेवेला पंसती देऊ लागले आहेत. मार्च 2022 च्या तुलनेत सप्टेंबरमध्ये मोबाइल ॲपद्वारे प्रतिदिन 74 हजार तिकीटे काढण्यात आली असून मार्चमध्ये ॲपद्वारे 36 हजार तिकीटे काढण्यात आली होती.

करोना संसर्ग वाढल्याने मार्च 2020 पासून लोकल प्रवासावर निर्बंध घालण्यात आले होते. टाळेबंदी काळात अत्यावश्यक सेवा कर्मचाऱ्यांनाच लोकल प्रवासाची परवानगी देण्यात आली होती. निर्बंध असल्यामुळे अन्य प्रवासी लोकलमधून प्रवास करु नये यासाठी मोबाइल तिकिट ॲप सुविधा तात्पुरती बंद करण्यात आली होती. पहिली लाट ओसरल्यानंतर फेब्रुवारी आणि मार्च 2021 मध्ये ॲप सेवा सुरु करण्यात आली. दुसऱ्या लाटेमुळे ॲप सुविधा एप्रिल 2021 ते 23 नोव्हेंबर 2021 या काळात बंद ठेवण्यात आली होती. ही लाट ओसरताच मोबाइल तिकीट ॲप पुन्हा कार्यरत झाले. त्यानंतर या सेवेला प्रतिसाद वाढू लागला असून तिकीट खिडकीवरील रांगेत उभे राहण्यापेक्षा मोबाइल ॲपवर तिकीट काढणे प्रवासी पसंत करीत आहेत.

या ॲपद्वारे सप्टेंबर 2022 मध्ये दररोज 74 हजार तिकीट काढण्यात येत असल्याची माहिती मध्य रेल्वेतील अधिकाऱ्यांनी दिली. गेल्या मार्चमध्ये 36 हजार तिकीटांची ॲपद्वारे विक्री झाली होती. ॲपद्वारे तिकीटे काढून मार्चमध्ये दररोज दोन लाख 17 हजार प्रवाशांनी प्रवास केला होता. मात्र सप्टेंबरमध्ये यात दुपटीने वाढ झाली असून ती चार लाख 23 हजार इतकी आहे. मोबाइल ॲपवरुन होणाऱ्या तिकीट खरेदीत सुमारे 4.80 टक्क्यांनी वाढ झाली आहे. मोबाइल ॲपवरुन 8 टक्के तिकीटे काढली जात आहेत. ठाणे, कल्याण, दादर, कुर्ला, वडाळा, वाशी स्थानकातून मोबाइल ॲपवरवरुन मोठ्या प्रमाणात तिकीट व पास काढण्यात येत आहेत.

**मध्य रेल्वे उपनगरीय मार्गांवर तिकीट काढण्याचे प्रमाण**
**तिकीट खिडकी – 60 ते 65 टक्के**
**एटीव्हीएम – 20 ते 21 टक्के**
**जनसाधारण तिकीट बुकिंग सेवा (जेटीबीएस)- 8 ते 9 टक्के मोबाईल ॲप- 8 टक्के**

## पंतप्रधानांनी 'वंदे भारत' ट्रेन प्रवासाचा आनंद लुटला

**गांधीनगर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गांधीनगर ते मुंबई सेंट्रल दरम्यान धावणाऱ्या 'वंदे भारत' एक्स्प्रेसला आज हिरवा झेंडा दाखवला. ही एक्स्प्रेस भारतातील पहिली स्वदेशी सेमी-हायस्पीड ट्रेन आहे. "ही ट्रेन विमानाच्या तुलनेत 100 पट कमी आवाज करते. या ट्रेनचा अनुभव घेतल्यानंतर ज्यांना विमानाने प्रवास करायची सवय आहे ते लोक या ट्रेनला प्राध्यान्य देतील", असा दावा या ट्रेनच्या लोकार्पण सोहळ्यात अहमदाबादेत पंतप्रधान मोदी यांनी केला आहे. गांधीनगर ते अहमदाबाद प्रवास करत मोदींनी प्रवासाचा आनंदही लुटला.


**शिपाई पाहिजे**

**सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे**

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित विनाअनुदानित तत्वावर चालवण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांकरिता शिपाई पदे भरण्यात येणार आहेत. तरी इच्छुक उमेदवाराकडून खालील ई-मेल आयडीवर अर्ज मागविण्यात येत आहे.

अर्ज पाठवण्याची अंतीम तारीख : ६ ऑक्टोबर २०२२
पात्रता : १० वी उत्तीर्ण.

Email : dnyanasadhanamanagement@gmail.com


**TENDER NOTICE**

Sealed envelopes are invited from reputed real estate developers for the proposed **Redevelopment of "Shri Vidya Co-operative Housing Society Ltd."**, C.T.S. No. 2014-A/1, Jeevan Jyoti Building, Thanekar Wadi, Chendani, Thane (East) - 400603., to build residential and commercial building using FSI Scheme comprising of Basic FSI of 1.10 + 50% incentive FSI on authorised BUA for building having age more than 30 years + 0.50 Premium FSI + 0.65 TDR + 60% / 80% ancillary FSI.

**Architect / PMC**: Ambiaance Design Pvt. Ltd., 702 / A,B,C, WIFI IT premises CSL, Above Hotel Satkar Grande, Near Mulund Check Naka, Wagle Ind. Estate, Thane (W) - 400604. Contact: 022-25827840 / 25828300.

**Issue of Tender**: From 03/10/2022 to 03/11/2022, between 10.30 a.m. to 6.00 p.m. on Monday to Friday from office of Architect/ PMC.

**Price of Tender Form**: Rs. 10,000/- (Rupees Ten thousand only) Non refundable (Payment to be made in cash).

**Submission of Tender**: on 05/11/2022 at Flat No. 6 (Mr. Haripalsingh Khalsa) Shri Vidya Co-operative Housing Society Ltd, C.T.S. No. 2014-A/1, Jeevan Jyoti Building, Thanekar Wadi, Chendani, Thane (East) - 400603 from 11.00 a.m. to 6.00 p.m.

The Society reserves the right to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

Date: 01-10-2022 **Sd/-**
**Secretary / Chairman,**
**On and behalf of Shri Vidya Co-operative Housing Society Ltd., Thane (East) – 400603**

## संबध विच्छेद

मै श्री. महाजन रामकेश चौहान और सौ. शर्मिला महाजन चौहान निवासी – रूम नं. ५, चंद्रकांत भोईर चाल– एफ, एकता सोसायटी, मंगळ राघो नगर, साईबाबा मंदीर, तिसगाव रोड, कल्याण पुर्व, सभी को सुचित किया जाता है की, हमारी पुत्री पुनम महाजन चौहान उम्र २५ वर्ष निवासी – सद्‌गुरू कृपाचाल, साई नगरी, काका धाबा, मंलग रोड, कल्याण पुर्व, ने हमारी मर्जी के खिलाफ घरसे भागकर अपने मर्जीसे प्रेम विवाह किया है, इसका हमे बहुत दुख हुआ, पुत्री पुनम नेहमारा विश्वासघात किया इसी के कारण हम हमारी पुत्री पुनम से हम दोनो माता पिता पुत्री का संबध विच्छेद करते है, साथ हि हम पुत्री पुनम को हमारे चल अचल संपत्ती से बेदखल करते है, आज के बाद हम दोनो का पुनम से कोई भी रिश्ता नही रहेगा, भविष्य मे किसी भी कृत्य के लिए पुनम स्वयं जिम्मेदार होगी, आज के बाद पुनम के साथ कोई भी लेन देन या कानुनी कारवाही से हमारा कोई संबध नही रहेगा।

दि. २८/०९/२०२२

श्री. महाजन रामकेश चौहान /सौ. शर्मिला महाजन चौहान
निवासी– रूम नं.५, चंद्रकांत भोईर चाल–
एफ, एकता सोसायटी, मंगळ राघो नगर,
साईबाबा मंदीर, तिसगाव रोड, कल्याण पुर्व


**हात स्वच्छ धुवा कोरोना टाळा**


**PUBLIC NOTICE**

NOTICE is hereby given that my clients, have entered into an agreement to purchase land property being **Survey Nos. 51/3/B**, lying & being at village **SHEEL**, Taluka & District Thane, State Maharashtra; (hereinafter for brevity's sake referred to as the **'said land'**), from its present owners, viz. **Shri. Vasant Rajaram Kokate** and others.

Anybody having any right, title, interest or claim of any nature whatsoever in or upon the said landed property or any part thereof by way of sale, transfer, mortgage, lien, gift, Wakf, inheritance, exchange, or otherwise whatsoever, are hereby called upon to make their claim/s known to the undersigned in writing at the below mentioned address within **14 (fourteen)** days from the date of publication hereof, along-with all documents under which such right is claimed; failing which such right or claim, if any, will be deemed waived and/or abandoned and no such claim will be deemed to exist.

Dated this the 30th day of September 2022

**MUHEET AVESH MUSANI**
**ADVOCATE, High Court,**
**Office: Musani Law Associates, 03, Nasheman Colony - H wing, Kausa, Thane-400612**
**Tel: 9892212025, mhtmusani@gmail.com**

**PUBLIC NOTICE**

Shri. Arthur Kevin Anthony Mengde Member of Rosalie Lx Co Operative Housing Society Ltd having address at Godrej Hill, Near "D" Mart, Kalyan West - 421301 Jointly holding flat No. 301, C wing - Celsia on 3rd floor in the building of the society, died on 10/05/2021 Respectively without making any nomination. His Wife Mrs. Alma Arthur Kevin Mengde and Son Kumar Adrian Arthur Mengde have jointly applied for shares transfer of late Arthur Kevin Anthony Mengde in their name of aforesaid flat. All Persons having any claim in respect thereof by way of sale, exchange gift, mortgage, charge, trust, inheritance, possession, lease, lien or otherwise howsoever are requested to inform the same in writing to the society office at Rosalie Lx Co-Operative Housing Society Ltd having address at Godrej Hill, Near "D"Mart, Kalyan west 421301 within 21 days from the date hereof failing which, the claim or claims if any, of such person or persons will be considered to have been waived and/or abandoned and the transfer shall be completed.

Place:- Kalyan Sd/
Date:- 30.09.2022

Hon. Secretary
For and on behalf of
Rosalie Lx Co-Operative Housing Society Ltd

Exh No.

**IN THE COURT OF 3rd Jt. CJSD SMT. S. V. NIKAM, THANE AT THANE**

**REG CIVIL SUIT NO. 1889 OF 2012**

**BALU MADHUKAR PATIL & ORS. PLAINTIFFS**

**V/S**

**GOKULDAS NARAYAN PATIL & ORS. DEFENDANTS**

**Whereas the abovementioned plaintiff has filed this suit against abovementioned defendants for cancellation of instruments, injunction, declarations and other various reliefs. During the pendency of this suit, the defendant No. 1 i.e. Gokuldas N. Patil died leaving behind this legal heir and successors. The plaintiff have moved an application unuer order 22 rule 4 to bring all legal heirs of deceased defendant no. 1. The Hon'ble court issued notices upon legal heirs of this defendant lio. 1. However defendant No. 1/1. i.e. SMT. YASHODA GOKULDAS PATIL Residing at GOKUL NIWAS, NEAR RAVINDPA BAR, KHAREGAON, TAL & DIST THANE, could not served with the notice of this application. Therefore The Hon'ble Court directed this plaintiff to publish public notice in local News paper as per order V Rule 20 (i) of C.P.C.**

**And whereas you are hereby given notice to appear before this Hon'ble Court in person or by pleader to file your say or written statement on or before 20.10.2022 at 11 A.M. cr within 30 days on this paper publication of this notire, failing which, the said suit will be heard in your absence and determined Ex-parte.**

**Given under my haqd the seal of Court on this 30 day of September, 2022.**

**Clerk** (Court Seal) **By order Superintendent Civil Judge Senior Division, Thane.**

**श्रीरंग युनिट क्र. ३ सहकारी गृहनिर्माण संस्था ( मर्या.) ठाणे**
रजि. क्र टिएनए/ (टिएनए)/ एचएसजी/ (टिसी )/ १००४४/९८-९९
दिनांक २९/०९/१९९८ बिल्डींग नं. ई-३५, ई-४२, ई-४३.
पत्ता : श्री. महालक्ष्मी एंटरप्रायझेस, गाळा नं. १४ श्रीरंग शॉपिंग सेंटर, ठाणे (प) -४००६०१

प्रति,

१ ऑक्टोबर २०२२

श्रीरंग युनिट क्र.३ सहकारी गृह निर्माण संस्थेच्या सर्व सभासादांसाठी,
कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीबाबत सूचना,

टप्पा क्र.१ : सूचित करण्यात येते कि, दिनांक १२ सप्टेंबर २०२२ रोजी ठाणे वैभव व पुढारी दैनिकात प्रसिद्ध करण्यात आलेल्या तात्पुरत्या मतदारांच्या यादी बाबत प्रतिपादन ,दावे, आक्षेप नोंदणी वा मतदान हक्क हस्तांतरित करण्यासंबंधीत सभासदांकडून लेखी सूचना प्राप्त झालेल्या नाहीत. सबब प्रसिद्ध करण्यात आलेली मतदारांची यादी कायम करण्यात येत आहे. सदर यादी संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध्र केली आहे.

टप्पा क्र.२/

१) ४ ऑक्टोबर २०२२ ते ९ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत ३० जून २०२२ पर्यंत संस्थेची देयके भरलेल्या सभासदांना सदर निवडणुकीत उमेदवारीचे नामांकन अर्ज संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध होतील तसेच या कालावधीत भरलेले अर्ज स्वीकारण्यात येतील.
२) १० ऑक्टोबर २०२२ रोजी संस्थेस प्राप्त झालेले अर्ज संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध करण्यात येतील.
३) ११ ऑक्टोबर : प्राप्त अर्जाची छाननी कार्यालयात करण्यात येईल.
४) १२ ऑक्टोबर रोजी वैध अर्ज संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध करण्यात येतील.
५) १३ ऑक्टोबर २०२२ ते २७ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत उमेदवारी अर्ज मागे घेण्या साठी राखीव.
६) २८ ऑक्टोबर २०२२ रोजी अंतिम उमेदवारांची यादी संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध करण्यात येईल.
७) २८ ऑक्टोबर २०२२ रोजी उमेदवारांना चिन्ह देण्यात येतील.
८) १३ नोव्हेंबर २०२२ रोजी विशेष सर्वसाधारण बैठकीचे आयोजन, ( मतदान वा बिनविरोध मतदानाची घोषणा) मत मोजणी, अंतिम निकाल जाहिर करणे.

दिवंगत उमेदवारांच्या (संस्थेच्या दफ्तरी) नामनिर्देशित व्यक्ती निवडणुकीत मतदान करू शकतील.

स्थळ : ठाणे
१ ऑक्टोबर २०२२

**रिटर्निंग अधिकारी**
**श्री. राजेंद्र जे . देशपांडे**
**RO DIR57/2021**

## जाहीर नोटीस

**निशाणी क्र. ०८**
**ठाणे येथील मे. सी. जे. एस. डी. साहेब, यांचे कोर्टात, ठाणे, जि.ठाणे**
**दिवाणी चौकशी अर्ज क्र./१५२२/२०२२**

**श्रीमती. रोहिणी सुहास घोगरे**
वय–५६ वर्षे, व्यवसाय–गृहिणी, रा. ए–५/७०४, हॅप्पी व्हॅली होम्स, टिकुजिनीवाडी जवळ, मानपाडा, ठाणे (पश्चिम) – ४००६१० .... **अर्जदार**

**विरुद्ध**

**१. कु. अनुराग सुहास घोगरे**
वय – २८ वर्षे, व्यवसाय : नोकरी, रा. ए–५/७०४, हॅप्पी व्हॅली होम्स, टिकुजिनीवाडी जवळ, मानपाडा, ठाणे (पश्चिम) – ४००६१०

**२. सौ. पुर्वा ऋतुराज कुलकर्णी**
वय – ३३ वर्षे, व्यवसाय : नोकरी,
रा. फ्लॅट नं.२०४, बिल्डींग नं.१, कुकरेजा हेरीटेज, आनंद पार्क,
धनोरी रोड, विश्रांतवाडी, पुणे – ४११०१५ **....सामनेवाले**

वरील अर्जदार यांचे पती व सामनेवाले यांचे वडील कै. सुहास मनोहर घोघरे, रा. ए–५/७०४, हॅप्पी व्हॅली होम्स, टिकुजिनीवाडी जवळ, मानपाडा, ठाणे (पश्चिम) – ४००६१०, ता. जि. ठाणे यांचे दिनांक २४/१२/२०१९ रोजी बेथनी हॉस्पीटल, ठाणे येथे आजारपणामुळे निधन झाले. त्यांची मिळकत खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**50% SHARE OF THE DECEASED IN PROPERTY NO.1 (Applicant is the Co-owner and hayin 50% Share in this Property)**

A-5/704, HAPPY VALLEY HOMES, NEAR TIKUJINIWADI, MANPADA, THANE (W) - 400610

**100% SHARE OF THE DECEASED IN PROPERTY NO.2**

OLD SAHAN JAGA, WARD NO.14, HOUSE NO.61, OUT OF LAYOUT PLOT NO.10 TOWARDS EAST-WEST-40 FT. (12.19MTR) LENGTH TOWARDS SOUTH-NORTH-30FT.(9.14MTR) WIDTH TOTAL AREA 111 SQ. MTR. SITUATED AT MAJALGAON, TAL.MAJALGAON, DIST. BEED, MAHARASHTRA

NEW ADDRESS OF PROPERTY NO.2 IN ASSESSMENT EXTRACT SURVEY NO.388 IN THAT PLOT NO.122, NAGAR PARISHAD PROPERTY NO.26/645/14-61/8 SITUATED AT MAJALGAON, TALMAJALGAON, DIST. BEED

**100% SHARE OF THE DECEASED IN THE PROPERTY NO.3**

AGRICULTURAL LAND HAVING GAT NO.363 SITUATED AT TAL, KHED, TAL.MAJALGAON, DIST. BEED AREA — 0-66-50 Hr.-Are.-Sq. Mtr. AS PER FERFAR NO.6285

**100% SHARE OF THE DECEASED IN TIIE PROPERTY NO. 4**

FLAT NO.7, SECOND FLOOR SITUATED ON PLOT NO.52, IN SURVEY NO.156 OF WHICH CITY SURVEY NO.2991 WITHIN THE LIMITS OF PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION, DIST. PUNE

वरील मिळकतीचा उक्त अर्जदाराने वारसदाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीचा वारसदाखला बाबत कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार व अर्जातील इतर वारसांच्या हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून वारसदाखला देण्यात देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २८/०९/२०२२ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**(लिपीक)** (शिक्का) **हुकुमावरुन सहाय्यक अधिकारी दिवाणी न्यायालय, ठाणे, जि. ठाणे**

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to all public at large that my client Mr. Bharat Meghji Shah, Residing at B/314, Shubh Ashirwad CHS LTD, Tilak Road, Opp PNB bank, Dombivli East 421201, is owner of Shop B/3, Area Admeasuring 180 Sq.Ft. (Built -up), on Ground Floor, in the society known as "Yashodhan Jeevan Co-op Hsg Soc Ltd.", constructed on land bearing survey no. 107, lying and being situated at Revenue Village Ayre, Rajaji Road, Near Swami Narayan Mandir, Dombivli East 421201., (herein after referred to as said **Shop**).

WHEREAS Mr. Bharat Meghji Shah had Purchased said Shop from Mr Suresh Dattatray Khadke vide Agreement for Sale Dt 21/Oct/1999 registered vide Sr. No 3715/1999 with The Sub-Registrar Kalyan -3.

AND WHEREAS Mr Suresh Dattatray Khadke got the possession, right, title, interest, shares and membership of said Shop as nominee / legal heirs after the death of his wife Mrs Suman Suresh Khadke and the Society duly enrolled the name of Mr Suresh Dattatray Khadke after the due process. And Society has issued No Objection Letter Dt 17/Oct/1999 vide Ref No ADM/Flat Transfer/NOC/01-99 for tranfer of said Shop.

AND WHEREAS Mrs Suman Suresh Khadke had purchased the said shop vide Agreement for Sale Dt 27/Feb/1984 from Laljibhai Kanjibhai Patel (therein referred to as Seller) and Mr Jayantibhai Kalidas Patel (therein referred to as Confirming Party).

AND WHEREAS Society has issued a Flow of Ownership and Title Clear Letter Dt 27/Sept/2022 vide Ref No YJ/B/60/2022 favouring Bharat Meghji Shah with regards to clear title and free of all encumbrances.

AND WHEREAS Society has duly recorded and issued the Share Certificate Dt 6/July/1999 vide Sr No 35, Members Registration No 4 with distinctive Shares from No 161 to 165 in the name of Bharat Meghji Shah.

Therefore any person(s) having claim in respect of the above-referred property or part thereof by way of sale, exchange, possession, mortgage, charge, gift, maintenance, inheritance, lease, tenancy, sub-tenancy lien license, hypothecation, transfer of title or beneficial interest under any trust right of prescription or pre-emption or under any Agreement or other disposition or under any decree, order or Award or otherwise claiming howsoever, are hereby requested to make the same known in writing together with supporting documents to undersigned Advocate at their Office address Within a period of 14 days(both days Inclusive) of the publication hereof failing which the claim of such person(s) in or upon the said Flat or any part thereof shall be deemed to have been waived and/or abandoned. Objections raised after wards will not be entertained.

**Shop No.2, Maratha Mandir, Mahatma Phule Road, Dombivli (W),Tal. Kalyan, Dist. Thane-421202. Mob- 9920899065.**

**Sd/-**
**Adv. Manish B. Jain**
**Advocate High Court**

**जाहिर नोटीस**
**मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२ ग खालील प्रकरणांची जाहिर नोटीस**

ज्या आर्थी या जाहिर नोटीसीमधील खालील परिशिष्टातील नमूद केलेल्या जमीनी मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२ ग नुसार चालु असलेल्या दाव्यांच्या संदर्भात प्रस्तुत अधिनियमात नमुद केलेल्या तरतुदीनुसार विचारात घेऊन न्यायाधिकरणाने प्रकरणी निकाली काढणे आवश्यक आहे. आणि ज्या आर्थी न्यायाधिकरणाने खालील परिशिष्टात नमुद केलेल्या जमीनीच्या बाबतीत उभय पक्षकारांना त्यांचे म्हणणे नोंदबिण्यासाठी फर्माविले आहे.

ज्या आर्थी सदरच्या जमिनीच्या बाबतीत संबंधित यांना सुनावणीची नोटीस बजावणीची रितसर प्रक्रिया करुन देखील अनुपस्तीत राहिल्याने अशा व्यक्तींना जाहिर नोटीसी व्दारे सदरची सुनावणी कळविणे आवश्यक असल्याने या न्यायाधिकरणाची खात्री झालेली आहे. त्या अर्थी सोबतच्या परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतींबाबत काही हरकती सुचना द्यावयाचे असल्यास जमिनीच्या संदर्भात हितसंबंधीतांना काही निवेदन करावयाचे असल्यास त्यांचे कडील योग्य त्या, पुराव्यांसह स्वःता अथवा त्यांनी ज्यांना प्राधिकृत केलेले आहे अशा व्यक्तीमार्फत सुनावणी दिनांक ०४/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायाधिकरणाचे मुरबाड येथील कार्यालयात बेळेत दाखल करावयात–

सदरची हरकती व सुचना विचारात घेऊन निर्णय प्रक्रिया पुर्ण करण्यात येईल या तारखेनंतर प्राप्त झालेल्या हरकती विचारात घेण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**दाव्याचे वर्णन**

| एस आर क्रमांक | गावाचे नांव | सर्व्हे क्रमांक गट क्रमांक | क्षेत्र हे.आर.प्र | पो.ख. हे.आर.प्र | आकार | सामनेवाले यांचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| ३२ ग एस आर ०३/२०२२ | कारवेळे | ६६० | ०–१०–०० | ०–००–५० | १.५६ | १. श्री. हजरा जुसुफ शेट २.श्रीम. खडनिसा अहमद जुसुफ आनावाला |

ही जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

**ठिकाण : मुरबाड**
**दिनांक : २१/९/२०२२९**

**सही/–**
**तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण मुरबाड**

क्र.बीडी/टेनन्सी/अपिल नं.९१/२०२२
उपविभागीय अधिकारी भिवंडी
विभाग भिवंडी यांचे कार्यालय
दिनांक : २९/०९/२०२२

**जाहीर सुचना**

याद्वारे जाहीर आवाहन करणेत येते की, **श्री. संतोष द्वारकानाथ पाटील** यांनी मौजे– अंजुर, ता. भिवंडी येथील मिळकतीबाबत तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण भिवंडी यांचेकडील क्र.कु.का.क./पहारे/३२–ग/मौजे–अंजुर/२२/२०१९ दिनांक २९/०६/२०२० रोजीच्या आदेशा विरुध्द या कार्यालयाकडे टेनन्सी अपिल क्र. ९१/२०२२ दाखल केले आहे. प्रस्तुत अपिलामधील जमिन मिळकतीचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | गावांचे नाव | स.नं | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे– अंजुर, ता. भिवंडी | १५२/३ | ०–४६–५ पो.ख. ०–०२–६ | ४–१९ |

प्रस्तुत प्रकरणी खालील सामनेवाले हे गांवी राहत नसल्यामुळे सदरची नोटीस बजावता येत नाही. सदर आरटीएस अपिलाची सुनावणी उपविभागीय अधिकारी भिवंडी विभाग यांच्या कार्यालयात **दि. १८/१०/२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता** ठेवण्यात आली आहे. तसेच अपिलार्थी यांनी पेपरनोटीस देण्याची विनंती बाबत समक्ष अर्ज दिला आहे.

त्यामुळे प्रस्तुत अपिल प्रकरणांत खालील नमुद सामनेवाले यांनी अगर त्यांचेतर्फे कायदेशीर वारस अगर हितसंबंधीत अन्य कोणतीही व्यक्ती यांनी या जाहीर नोटीसद्वारे उपविभागीय अधिकारी भिवंडी विभाग भिवंडी यांचे कार्यालयात नेमून दिलेल्या तारखेस व वेळेस आवश्यक त्या कागदपत्रासह न चुकता हजर रहावे. अन्यथा उपलब्ध कागदपत्राच्या आधारे गुणवत्तेवर निर्णय घेणेत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सामनेवाले यांची नावे :–**

१) श्री. शाम पंढरीनाथ पाटील २) श्री. हरिश्चंद्र गणपत पाटील ३) श्री. रमाबाई विनायक पाटील ४) गिरीप विनायक पाटील ५)कविता सचिन पवार ६) दिपीका वैभव म्हात्रे ७) लता काळुराम म्हात्रे
अ.क्र.१ व २ रा. मौजे–अंजुर, ता. भिवंडी, जि. ठाणे
अ.क्र.३, ४ रा. रुम नं. १०३, सुधाकर अपार्टमेंट, जरीमरी मंदिरा शेजारी, पाटील वाडी, खारेगाव, कळवा (प), ठाणे ४००६०५
अ.क्र.५ रा. रुम नं. ३०१, मनोहर समृत्ती पवार गल्ली, खारेगाव, कळवा (प), ठाणे ४००६०५
अ.क्र.६ रा.ओन हाउस, रेती बंदर क्रासीन, काळुबाई मंदिराजवळ, देवीचापाडा, डोंबिवली (प) विष्णूनगर, ठाणे ४२१०२०२
अ.क्र.७ रा. म्हात्रे हाउस, सहकार बाजार जवळ, खारेगाव, कळवा (प), ठाणे ४००६०५ **......सामनेवाले**

**स्थळ प्रतिवर मा. उपविभागीय अधिकारी यांची सही असे**

**सही/–**
**उपविभागीय अधिकारी भिवंडी विभाग भिवंडी करिता**

**आ.क्र. – नारपोली/२११०/२२०१/०१००६३१** **जा.क्र./७८३/२०२२ दिनांक – ३०/०९/२०२२**

**नमुना नं. ९**
**(नियम १४ व २४ पहा)**
**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९९६ यांच्या कलम १५०(२) अन्वये सूचना**

प्रति,
यशवंत मारुती टावरे, ३८० गुरुप्रसाद बिल्डींग गोकुळनगर भिवंडी, ठाणे महाराष्ट्र, ४२१३०२
मीना यशवंत टावरे, ३८० गुरुप्रसाद बिल्डींग गोकुळ पगा राणीसती ग्राऊंड भिवंडी भिवंडी, ठाणे महाराष्ट्र, ४२१३०८
शिरीष यशवंत टावरे, ३८० गुरुप्रसाद बिल्डींग गोकुळ पगा राणीसती ग्राऊंड भिवंडी भिवंडी, ठाणे महाराष्ट्र, ४२१३०८
मनाली संदीप पाटील, ३६/२ नाथ सदन सायन हाऊसिंग सोसायटी सुधा मिल्क सेंटर जवळ साईन ईस्ट साईन ईस्ट मुंबई, मुंबई शहर महाराष्ट्र, ४०००२२

ज्याअर्थी **उप अधिक्षक भूमि अभिलेख,** भिवंडी कार्यक्षेत्रातील **नारपोली** गावच्या फेरफाराच्या नोंदवहीत खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जमिनीतील अधिकारांच्या संपादनासंबंधी नोंद करण्यात आली आहे.

| फेरफाराच्या नोंदवहीतील नोंदीचा अनुक्रमांक व तारीख | संपादन केलेल्या अधिकाराचे स्वरूप | ज्यातील अधिकार संपादन करण्यात आले आहे तो नगर भुमापन क्रमांक किंवा उपविभाग |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २४४ ३०/०९/२०२२ | **वारस नोंद –** **बाजूस नमूद केलेल्या मिळकतीचे धारक यशवंत मारुती टावरे दिनांक १०/०२/२००६ रोजी मयत झाले असून मयताचा मुळ दाखला, वारसा बाबतचे स्वयंघोषणापत्र, स्थानिक चौकशी यांच्या आधारे वारसांची नावे नोंद केली.** | **१४८४, १४८५,१४८६** |

| न.भू.क्र. | एकूण क्षेत्र (चौ.मी.) | सत्ताप्रकार | मयत व्यक्तीचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) | वारसांची नावे, क्षेत्र (चौ.मी.), व नाते |
|---|---|---|---|---|---|
| १४८४ | १५.८० | क | यशवंत मारुती टावरे | १५.८० | मीना यशवंत टावरे, ५.२६ पत्नी<br>शिरीष यशवंत टावरे, ५.२७ मुलगा<br>मनाली संदीप पाटील ५.२७ मुलगी |
| १४८५ | ३५.९० | क | यशवंत मारुती टावरे | ३५.९० | मीना यशवंत टावरे, ११.९७ पत्नी<br>शिरीष यशवंत टावरे, ११.९६ मुलगा<br>मनाली संदीप पाटील ११.९७ मुलगी |
| १४८६ | ३.१० | क | यशवंत मारुती टावरे | ३.१० | मीना यशवंत टावरे, १.०४ पत्नी<br>शिरीष यशवंत टावरे, १.०३ मुलगा<br>मनाली संदीप पाटील १.०३ मुलगी |

आणि ज्याअर्थी, तुमचा उक्त फेरफारात हितसंबंध आहे असे अधिकारअभिलेखावरून/फेरफाराच्या नोंदवहीवरून मला वाटते. आणि ज्याअर्थी, उक्त फेरफारात तुमचा हितसंबंध आहे असे मानण्यास मला संयुक्तिक कारण आहे. त्याअर्थी मी, ज्या ठिकाणी उपरोक्त जमीन आहे त्या गावाचा परिरक्षण भुमापक याद्वारे, उक्त फेरफाराच्या नोंदी संबंधी तुम्हांस सुचना देत आहे व ही सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, उक्त नोंदीसंबंधी तुमची हरकत कोणतीही असल्यास, ती तोंडी किंवा लेखी माझ्याकडे पाठविण्यास तुम्हांस फर्मावित आहे. उक्त पंधरा दिवसांच्या मुदतीत कोणतीही हरकत मला न मिळाल्यास, उक्त नोंदीस तुमची संमती आहे, असे गृहीत धरले जाईल, कृपया याची नोंद घ्यावी.

ठिकाण : भिवंडी
दिनांक : ३०/०९/२०२२

ही नोटीस ९ (**दिनांक ३०/०९/२०२२ १२:२२:२४ PM** रोजी परिक्षित खूशाल कांबळे निमतानदार (NM) – नारपोली) यांचे लॉगीन मधून जनरेट केले असून ते संगणकीकृत असल्यामुळे त्यावर कोणत्याही सही शिक्याची आवश्यकता नाही. नोटीस ९ डाऊनलोड दिनांक **३०/०९/२०२२ १२:२२:४० PM**

**टिप : सदर नोटीस आपली–चावडी या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.**

क्र.बीडी/टेनन्सी/अपिल नं.९०/२०२२
उपविभागीय अधिकारी भिवंडी
विभाग भिवंडी यांचे कार्यालय
दिनांक : २९/०९/२०२२

**जाहीर सुचना**

याद्वारे जाहीर आवाहन करणेत येते की, **श्री. संतोष द्वारकानाथ पाटील** यांनी मौजे– अंजुर, ता. भिवंडी येथील मिळकतीबाबत तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण भिवंडी यांचेकडील क्र.कु.का.क./७०–ब/मौजे–अंजुर/३६/२०१६ दिनांक २०/०७/२०१८ रोजीच्या आदेशा विरुध्द या कार्यालयाकडे टेनन्सी अपिल क्र. ९०/२०२२ दाखल केले आहे. प्रस्तुत अपिलामधील जमिन मिळकतीचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | गावांचे नाव | स.नं | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे– अंजुर, ता. भिवंडी | १५२/३ | ०–४६–५ पो.ख. ०–०२–६ | ४–१९ |


प्रस्तुत प्रकरणी खालील सामनेवाले हे गांवी राहत नसल्यामुळे सदरची नोटीस बजावता येत नाही. सदर आरटीएस अपिलाची सुनावणी उपविभागीय अधिकारी भिवंडी विभाग यांच्या कार्यालयात **दि. १८/१०/२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता** ठेवण्यात आली आहे. तसेच अपिलार्थी यांनी पेपरनोटीस देण्याची विनंती बाबत समक्ष अर्ज दिला आहे.

त्यामुळे प्रस्तुत अपिल प्रकरणांत खालील नमुद सामनेवाले यांनी अगर त्यांचेतर्फे कायदेशीर वारस अगर हितसंबंधीत अन्य कोणतीही व्यक्ती यांनी या जाहीर नोटीसद्वारे उपविभागीय अधिकारी भिवंडी विभाग भिवंडी यांचे कार्यालयात नेमून दिलेल्या तारखेस व वेळेस आवश्यक त्या कागदपत्रासह न चुकता हजर रहावे. अन्यथा उपलब्ध कागदपत्राच्या आधारे गुणवत्तेवर निर्णय घेणेत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सामनेवाले यांची नावे :–**

१) श्री. शाम पंढरीनाथ पाटील २) श्री. हरिश्चंद्र गणपत पाटील ३) श्री. रमाबाई विनायक पाटील ४) गिरीप विनायक पाटील ५)कविता सचिन पवार ६) दिपीका वैभव म्हात्रे ७) लता काळुराम म्हात्रे
अ.क्र.१ व २ रा. मौजे–अंजुर, ता. भिवंडी, जि. ठाणे
अ.क्र.३, ४ रा. रुम नं. १०३, सुधाकर अपार्टमेंट, जरीमरी मंदिरा शेजारी, पाटील वाडी, खारेगाव, कळवा (प), ठाणे ४००६०५
अ.क्र.५ रा. रुम नं. ३०१, मनोहर समृत्ती पवार गल्ली, खारेगाव, कळवा (प), ठाणे ४००६०५
अ.क्र.६ रा.ओन हाउस, रेती बंदर क्रासीन, काळुबाई मंदिराजवळ, देवीचापाडा, डोंबिवली (प) विष्णूनगर, ठाणे ४२१०२०२
अ.क्र.७ रा. म्हात्रे हाउस, सहकार बाजार जवळ, खारेगाव, कळवा (प), ठाणे ४००६०५ **......सामनेवाले**

**स्थळ प्रतिवर मा. उपविभागीय अधिकारी यांची सही असे**

**सही/–**
**उपविभागीय अधिकारी भिवंडी विभाग भिवंडी करिता**



**CLASSIFIEDS ठाणेवैभव**

**छोट्या जाहिरातींसाठी संपर्क कार्यालय ठाणे - २५३४१५२६ / २५३४८५९४**

**'ठाणेवैभव' दैनिकातील जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकुरानुसार छापल्या जातात. या मजकुराच्या सत्यतेबाबतची खातरजमा वाचकांनी स्वतःच्या जबाबदारीवर करावयाची आहे. 'ठाणेवैभव' यांचा याबाबत कोणतीही आर्थिक वा कायदेशीर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष जबाबदारी राहणार नाही.**

**भाड्याने/विकणे आहे**

टेंभी नाका परिसरात रोड लगत कमर्शियल पहिला मजला (ठाणे वैभव कार्यालय) ५०० चौ फुट कार्पेट भाड्याने/विकणे आहे. संपर्क ९८१९२४९२८०

**ठाणेवैभव वाचकांना विनम्र सूचना**

ठाणेवैभव वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची ठाणेवैभव वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल ठाणेवैभव वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021

कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, अंबरनाथ-बदलापूर, भिवंडी, उल्हासनगर, मुरबाड, शहापूर.

La densitaé
HAIR | SKIN & LASER CLINIC
टक्कल पडलंय?
आपल्या ठाण्यातील विश्वसनीय तज्ज्ञांकडून केसांच्या सर्व विकारांवर मिळवा मोफत मार्गदर्शन
• हेअर ट्रान्सप्लांट • पी.आर.पी
• हेअर विग
9604117788 / 9028031509
www.ladensitae.co.in

www.thanevaibhav.in

# ठाणेवैभव

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ



शारदीय नवरात्रौत्सव
आजचा रंग - राखाडी

भारतीय सौर दिनांक आश्विन ९ शके १९४४ | वर्ष ४८ | अंक ३६ | शनिवार १ ऑक्टोबर | पाने १२ | रु. ४
संपादक : मिलिन्द बल्लाळ

## सावत्र आईच्या मारहाणीत चिमुरड्याचा मृत्यू

**डोंबिवली :** डोंबिवलीतील पाथर्ली येथील गायकवाड वाडीमध्ये एका सावत्र आईने आपल्या तीन वर्षाच्या सावत्र मुलाला जीवे ठार मारल्याचा प्रकार पोलीस तपासात उघडकीस आला आहे. या घटनेने डोंबिवलीत खळबळ उडाली आहे.

बुधवारी दुपारी तीन वाजता हा प्रकार घडला आहे. अंतीमादेवी जैस्वाल (28, रा. सिताबाई निवास इमारत, खोली क्र. 10, पहिला माळा, गायकवाड वाडी, पाथर्ली गाव, डोंबिवली पूर्व) असे आरोपी महिलेचे नाव आहे. टिळकनगर पोलीस ठाण्याचे साहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण बाकले यांनी याप्रकरणी आरोपी अंतीमादेवी विरुध्द खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

पाथर्ली गाव गायकवाडी येथे राहणारा कार्तिक (तीन वर्ष) याला गुरुवारी मारहाण झाल्याने त्याला वैद्यकीय उपचाराकरिता डोंबिवलीतील पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात त्याच्या वडिलांनी दाखल केले होते.

>>पान ४ वर

# ठाण्यातील पहिले हृदय प्रत्यारोपण यशस्वी

## ज्युपिटर रुग्णालयातील डॉक्टरांनी दिले रुग्णास जीवदान

**ठाणे: ठाण्यात वैद्यकीय आघाडीवरची ही अत्यंत आनंददायी बातमी आहे. येथील जुपिटर रुग्णालयात 39 वर्षांच्या रुग्णावर हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी झाली असून या रुग्णास दुसरे आयुष्य मिळाले आहे. ज्युपिटरच्या डॉक्टरांवर त्यामुळे अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**






कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्याचे रहिवासी भिकाजी निर्गुण यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांची प्रकृती झपाट्याने खालावत गेली. रुग्णाच्या नातेवाईकांनी भिकाजी यांना ठाण्याच्या ज्युपिटर रुग्णालयात अशा

>>पान ४ वर

**सरकारच्या विभागीय समितीने मुंबईच्या नानावटी रुग्णालयातील 59 वर्षीय मृताचे हृदय उपलब्ध करून दिले. मुंबई आणि ठाणे पोलिसांच्या मदतीने ग्रीन कॉरिडोर उभारुन अवघ्या 35 मिनिटांत हे हृदय ठाण्यात आणण्यात आले.**

# किमान पाच वर्षे ठामपात होणार नाही नोकरभरती

## सातव्या वेतन आयोगामुळे आस्थापना खर्च ७० टक्क्यांच्या घरात जाणार

**ठाणे :** सातवा वेतन आयोग लागू करण्यात आल्याने आस्थापना खर्च 70 टक्क्यांवर जाणार आहे. परिणामी अतिरिक्त खर्चासह नवीन नोकरभरतीला किमान पाच वर्षे खो बसण्याची शक्यता आहे.

ठाणे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना 1 जानेवारी 2016 पासून सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी कामगार संघटनांनी केली होती. त्यानुसार ही वेतनश्रेणी लागू करताना जर 2016 ते 2021 पर्यंतच्या फरकाची रक्कम द्यायची ठरल्यास तिजोरीवर किमान 500 कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडणार आहे. दरम्यान नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात कर्मचाऱ्यांच्या वेतन भत्यापोटी 619 कोटी रुपये अदा

>>पान ४ वर



**आजही ११२० पदे मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत तर पालिकेत आजच्या घडीला ३,८३६पदे रिक्त आहेत. ही पदे मंजुर करीत असतांना पालिकेचा आस्थापना खर्च हा ३५ टक्यांपेक्षा कमी असावा असा नियम आहे. मात्र सध्याच्या घडीला पालिकेचा आस्थापना खर्च ४२ टक्के आहे.**




# डोंबिवलीतील २७ गावांची तहान एमआयडीसी भागवणार

## उच्च दाबाने मिळणार ९० द. ल.लि. पाणी

**डोंबिवली:** कल्याण-डोंबिवलीला एमआयडीसीकडून 105 दशलक्ष लीटर पाण्याची गरज असताना फक्त 60 दशलक्ष लीटर पाणी मिळत आहे. त्यामुळे शहरातील 27 गावांना तीव्र पाणीटंचाई भेडसावत आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी 90 द. ल.लि. पाणी उच्च दाबाने पुरवठा करण्याचे आदेश एमआयडीसी अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे येथील पाणीटंचाई दूर होण्याची शक्यता आहे.

कल्याण-डोंबिवली

>>पान ४ वर



# वसई-विरार परिवहन बसमध्ये अग्नितांडव

**भाईंदर:** नालासोपारा रेल्वे स्थानकातून महामार्गावर जात असलेल्या वसई-विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसला आग लागून जळाल्याची दुर्घटना घडली. दुर्घटनेत वेळीच सावधगिरी बाळगल्याने सर्व प्रवासी बचावले.

नालासोपारा रेल्वे स्थानक परिसरातून मुंबई-अहमदाबाद महामार्गाकडे निघालेल्या महापालिका परिवहन सेवेच्या बसला आज शुक्रवारी दुपारी 3-30 च्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. नालासोपाऱ्यातून सुटलेली बस धानिवबाग येथे पोहोचली



असता बसच्या मागील भागात आग लागल्याने धूर येण्यास सुरुवात झाली. चालकाने प्रसंगावधान राखून बस रस्त्याच्या कडेला थांबवून सर्व प्रवाशांना उतरण्यास सांगितले.

आग लागल्याची खबर वसई-

>>पान ४ वर

# मनगटावरील घड्याळ सांगणार सफाई कर्मचाऱ्यांचा ठावठिकाणा

**हजेरी लावून गायब होणाऱ्या कर्मचाऱ्यांना लागणार शिस्त**



**ठाणे:** ठाणे महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांना शिस्त लागावी, त्यांच्या आरोग्याची काळजी घेता यावी यासाठी त्यांच्या हाती डिजिटल घड्याळ बांधण्यात येणार आहे. यामुळे घनकचरा विभागाला कामाच्या वेळी हे कर्मचारी कुठे आहेत, काय करत आहेत याची माहिती मिळणार आहे.

ठाणे महापालिकेने आता पहिल्या टप्यात 10 कर्मचाऱ्यांच्या हाती हे ट्रॅकर बसवले आहेत. स्वच्छता लीगचा भाग म्हणून या वेगळ्या उपक्रमाला सुरवात झाली आहे. ठाणे महापालिकेचे चार हजारांच्या आसपास सफाई कर्मचारी आहेत. त्यात खासगी तत्वावरील सफाई कामगारांचा देखील समावेश आहे. परंतु अनेक वेळेला हजेरी शेडवर हजेरी लावून गायब होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या तक्रारी पालिकेकडे वाढलेल्या होत्या. किंवा आपल्या जागी दुसऱ्याला दाखवून

>>पान ४ वर

## ठामपा आयुक्तपदी अभिजित बांगर



**ठाणे:** ठाणे महापालिका आयुक्त डॉ विपीन शर्मा यांची बदली झाली असून त्यांच्याकडे एमआयडीसीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा पदभार सोपवण्यात आला आहे. तर यापूर्वी नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त असलेले अभिजित बांगर हे ठाणे महापालिकेचे नवे आयुक्त झाले आहेत.

राज्य शासनाने महत्वाच्या आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या असून यामध्ये ठाण्याचे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, ठाणे महापालिका आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांचा देखील समावेश

>>पान ४ वर

## पप्पू कालानी यांच्या भावाची ४१ लाखाची फसवणूक

**उल्हासनगर:** माजी आमदार पप्पू कालानी यांचे मोठे बंधू नारायण कालानी यांच्या नोकरानेच टॅक्स आणि जीएसटीच्या 41 लाख रुपयांचा अपहार केला आहे.

या प्रकरणी मध्यवर्ती पोलीस ठाण्यात नोकराच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 1988 च्या कालावधीत पप्पू कालानी हे नगराध्यक्ष असताना नारायण कालानी यांनी उल्हासनगर नगरपरिषदेत सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जकातचे सभापती पद हाताळले होते. त्यांचे कॅम्प नंबर 3मधील फर्निचर बाजाराच्या मुख्य रोडवर सिमा इंटरनॅशनल हॉटेल आहे. नारायण कालानी यांच्याकडे कृष्णकांत फुलपारथी हा विश्वासू नोकर काम करत होता. कालानी यांचे आर्थिक व्यवहार तो हाताळत होता.

नारायण कालानी यांनी कृष्णकांत याच्याकडे 3 ऑक्टोबर

>>पान ४ वर

# दातांची संवेदनशीलता कमी करण्यासाठी आम्लयुक्त पेये टाळा

**ॲसिड क्षरणामुळे दात वाढले आहेत या विषयावर काही प्रकाश टाकू शकाल?**
- धूप म्हणजे जीवाणूंमुळे नसलेल्या ॲसिडमुळे दातांची रचना नष्ट होणे किंवा झीज होणे. धूप आंतरिक (ॲसिड रिफ्लक्स किंवा आम्लता) आणि / किंवा आहारासारख्या बाह्य घटकांमुळे होऊ शकते. सॉफ्ट ड्रिंक्स, विशेषतः कार्बोनेटेड सोडा आणि स्पोर्ट्स ड्रिंक्स, इरोशनचे सर्वात लक्षणीय बाह्य कारण असल्याचे दिसून येते. दुधासारख्या कॅल्शियमची उच्च सांद्रता असलेली पेये इरोशनचा धोका कमी करू शकतात.

**दात पोशाखांशी संबंधित समस्या काय आहेत?**
- दात घासल्यामुळे मुलामा चढवणे (सर्वात बाहेरील कठीण थर) नष्ट होते आणि डेंटिन (आंतरिक मऊ थर) च्या संपर्कात येते, ज्यामुळे दात किडण्यास आणि आणखी नुकसान होण्याची शक्यता असते. असे दात सामान्यत: तुटलेले, चिरलेले, रंग नसलेले आणि दिसायला अप्रिय असतात. वाढलेली संवेदनशीलता आणि चघळताना वेदना आणि अडचण हे अनेक वेळा जीर्ण झालेल्या दातांचे समानार्थी शब्द आहेत.

**नुकसान मर्यादित करण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी?**
- 1. आम्लयुक्त पेये टाळा, विशेषत: तोंडात द्रव धरणे. वापरत असल्यास, पेंढा वापरण्याची अत्यंत शिफारस केली जाते.
2. जेवणानंतर पातळ फ्लोराईड तोंड स्वच्छ धुवा.
3. लाळ बफर आणि ॲसिड काढून टाकण्यास मदत करते. च्युइंगम (साखरविरहित) लाळेच्या प्रवाहाला चालना देऊन दातांच्या क्षरणापासून संरक्षण करण्यास मदत करू शकते.
4. दूध आणि दही उत्पादनांचे सेवन (मिठाई न केलेले) ॲसिडचे तटस्थ करून संरक्षणात्मक प्रभाव पाडू शकते.
5. आम्लयुक्त पेये प्यायल्यानंतर एक तास दात घासणे टाळा.
6. हलक्या दाबाने मऊ ब्रिस्टल ब्रश आणि फ्लोराइडेड टूथपेस्ट वापरून दात घासणे.



**डॉ. मकरंद देशपांडे**
**रोस्टोडोन्टिक्स**
**दंत शस्त्रक्रिया तज्ञ**

**[वाकडा आणि जवळजवळ असणारे दात स्वच्छ करणे आणि निगा राखणे कठीण आहे. हे केवळ दात किडण्यास कारणीभूत नसून, हिरड्यांचे आजार आणि दात पडण्यास कारणीभूत ठरू शकते]**

**अशा स्थितीसाठी आवश्यक दंत उपचारांचे स्वरूप काय आहे?**
- वैद्यकीय व्यावसायिकांशी सल्लामसलत करणे आणि वैद्यकीय स्थिती सुधारणे, जर असेल तर, ही नेहमीच पहिली पायरी असते. गॅस्ट्रोएसोफेजल रिफ्लक्स (GERD), बुलिमिया आणि तीव्र मद्यपान या काही वैद्यकीय परिस्थिती आहेत ज्यामुळे आम्लता वाढते आणि वारंवार उलट्या होतात. सौम्य ते मध्यम दात गळत असलेल्या परंतु दातांच्या तक्रारी नसलेल्या रुग्णांचे दात गळणे प्रगतीशील आहे की नाही हे निर्धारित करण्यासाठी परीक्षण केले जाते. अशा रुग्णांना दातांच्या संरचनेत तडजोड केल्यामुळे, किडलेले, कुरूप दातांमुळे दातांच्या पुनर्संचयित गरजा असतात. पुनर्संचयित उपचार नवीन किमान आक्रमक उपचार धोरणांचा वापर करून शक्य असले पाहिजे, अशा प्रकारे नैसर्गिक दात संरक्षण जास्तीत जास्त करणे.

**क्रिएटिव्ह स्माईल डेंटल सोल्युशन्स : ४, राजश्री, राम मारुती रोड, ठाणे( प.)**
**संपर्क क्रमांक : ०२२ २५३३००११, ०२२ २५४७६२००, ०२२ २५४५७७६६, ८६५७८१३१८९**
**www.drveejaydshpandey.com www.creativesmiles.in**

Dussehra Special Menu
Wednesday 5th October 2022

Welcome Drink
Banaras Sikanji
Sweet
Puran Poli, Jalebi,
Laccha Rabdi, Kesar Rajbhog
Farsan
Cheese Kashmiri Pattice,
Panchratna Dhokla, Dahi Wada
Sabzi
Paneer Lasuni, Malai Parwal,
Dalimbi Usal,
Aloo Methi Sukha Bhaji



Roti
Puri, Phulka
Rice
Kaju Tondli Masale Bhat,
Steamed Rice, Masala Khichdi
Dal
Tadka Waran, Puneri Kadhi,
Gujrati Dal & Sol Kadhi

Plus Salad, Papad, Butter Milk & Mukhwas

Tip Top
GRAND THALI
RESTAURANT

Hotel Tip Top Plaza, L.B.S. Marg,
Near Teen Hath Naka, Thane (W).
Call from 11 am onwards :
022 40204301 / 022 40204302 / 9833378234
Menu can be changed at any time without prior notice
Order online on zomato Tip Top EXPRESS DELIVERY
Impulse/10/22

# नवरात्रौत्सवाच्या माध्यमातून वाहनचालकांना धडे

**ठाणे:** नवरात्रौत्सवाच्या माध्यमातून ठाणे वाहतूक पोलिसांनी आता वाहन चालकांना समाजमाध्यमांद्वारे वाहतूक नियमांचे धडे देण्यास सुरुवात केली आहे.

'खेळायचं असेल तर दांडिया खेळा- जिवाशी काय खेळता', कार चालविताना सिट बेल्ट वापरा- आनंदे नवरात्रीचे रंग उधळा, हेल्मेट असता शीरी- माता भवानी रक्षण करी. अशा विविध जनजागृतीचे संदेश दिले जात आहेत. हे संदेश पाहून वाहन चालकांकडून हळूहळू वाहतूक नियमांचे पालन होत असल्याचे दिसत असल्याची माहिती वाहतूक पोलिसांनी दिली.

गेल्याकाही वर्षांत ठाणे जिल्ह्यात नागरिकीकरण मोठ्याप्रमाणात वाढले आहे. घोडबंदर भाग, कल्याण-डोंबिवली, बदलापूर या भागात मुंबई आणि उपनगरात राहणारे अनेकजण वास्तव्यास येत आहेत. त्यामुळे शहरात वाहनांची संख्याही वाढली आहे. त्यातुलनेत पुरसे रुंद रस्ते नसल्याने अपघातांनाही आमंत्रण मिळत असते. अनेकदा दुचाकी चालक शीरस्त्राण (हेल्मेट) वापरत नसतात. चार चाकी चालकही आसन पट्टी वापरत नसल्याने अपघातामध्ये अनेकांना जीव गमवावे लागले आहेत. अपघात टाळण्यासाठी आणि नियमांचे उल्लंघन होऊ नये पोलिसांकडून दंडात्मक कारवाई केली जाते. परंतु मनुष्यबळाअभावी पोलिसांना सर्वच ठिकाणी कारवाई करणे शक्य होत नसते. त्यामुळे वाहन चालकांकडून नियमांचे उल्लंघन होत असतानाचे चित्र दिसते. चालकांकडून नियमांचे पालन व्हावे यासाठी ठाणे पोलिसांकडून सण-उत्सवांच्या माध्यमातून जनजागृती केली जाते. त्यामुळे यावर्षी नवरात्रौत्सवानिमित्ताने ठाणे पोलिसांच्या वाहतूक नियंत्रण कक्षाने जनजागृती करण्यास सुरुवात केली आहे.

'देवीच्या भक्तीत तल्लीन होऊनी नवरात्रिच्या रंगांची उधळन करुनी, वाहतूकीच्या नियमांकडे लक्ष देऊया-स्वत:सोबत इतरांचे जीवन सुकर करुया', 'लाल-पिवळा- हिरवा रंग आहेत तीन वाहतुकीचे नियम पाळून साजरे करुया नवरात्रिचे दि' असे वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी विविध सामाजिक संदेश ठाणे पोलिसांकडून समाजमाध्यमांवर दिले जात आहे. या संदेशांमुळे नागरिकांमध्ये जनजागृती होत असल्याची माहिती वाहतूक पोलिसांनी दिली.

# देखभालीचे काम करण्यासाठी रविवारी मेगा ब्लॉक

**ठाणे :** मध्य रेल्वे रविवारी, 2 ऑक्टोबर रोजी देखभालीचे काम करण्यासाठी उपनगरीय विभागांवर मेगा ब्लॉक परीचालीत करणार आहे.

माटुंगा-मुलुंड अप आणि डाउन जलद मार्गावर सकाळी 11.05 ते दुपारी 3.55 पर्यंत मेगा ब्लॉक असेल. छशिमट मुंबई येथून 10.25 ते दुपारी 3.35 पर्यंत सुटणा-या डाउन जलद सेवा माटुंगा आणि मुलुंड दरम्यान डाउन धीम्या मार्गावर वळवल्या जाऊन त्यांच्या संबंधित स्थानकांवर वेळापत्रकानुसार थांबतील. ठाण्याच्या पुढे जलद असलेल्या गाड्या मुलुंडहून डाउन जलद मार्गावर पुन्हा वळवण्यात येतील आणि निर्धारित वेळेच्या 15 मिनिटे उशिराने गंतव्यस्थानी पोहोचतील.

ठाणे येथून सकाळी10.50 ते दुपारी 3.46 पर्यंत अप जलद सेवा मुलुंड आणि माटुंगा दरम्यान अप धीम्या मार्गावर वळविण्यात येतील. वेळापत्रकानुसार त्यांच्या संबंधित स्थानकांवर थांबवल्या जातील. या अप सेवा जलद मार्गावर पुन्हा वळवण्यात येतील आणि नियोजित वेळेच्या 15 मिनिटे उशिराने गंतव्यस्थानी पोहोचतील.

पनवेल-वाशी अप आणि डाउन हार्बर मार्गावर सकाळी 11.05 ते सायंकाळी 4.05 पर्यंत (नेरुळ/बेलापूर-खारकोपर लाईन वगळून) पनवेल/बेलापूरहून सकाळी 10.33 ते दुपारी 3.49 पर्यंत सुटून छशिमट मुंबई/गोरेगावकडे जाणा-या अप हार्बर मार्गावरील सेवा आणि छशिमट मुंबई येथून सकाळी 9.45 ते दुपारी 3.12 या वेळेत पनवेल/बेलापूरकडे जाणा-या अप हार्बर सेवा रद्द राहतील.

पनवेल येथून सकाळी 11.02 ते दुपारी 3.53 पर्यंत ठाणेकरीता सुटणा-या अप ट्रान्सहार्बर सेवा आणि पनवेल येथून सकाळी 10.01 ते दुपारी 3.20 पर्यंत ठाण्यासाठी सुटणा-या ट्रान्सहार्बर सेवा रद्द राहतील. तथापि, ब्लॉक कालावधीत छशिमट मुंबई ते वाशी दरम्यान विशेष लोकल धावतील.

ब्लॉक कालावधीत ठाणे-वाशी/नेरुळ स्थानकांदरम्यान ट्रान्सहार्बर लाईन सेवा उपलब्ध असेल. ब्लॉक कालावधीत बेलापूर/नेरुळ - खारकोपर दरम्यानच्या उपनगरीय रेल्वे सेवा वेळापत्रकानुसार धावतील.

# दुर्गेचे सहावे रूप-कात्यायनी

**चंद्रहासोज्ज्वलकरा शार्दूल वरवाहना | कात्यायनी शुभं दद्याद्देवी दानव घातिनी ||**



दुर्गेचे हे सहावे रुप कात्यायनी या नावाने ओळखले जाते. दुर्गा पूजेच्या सहाव्या दिवशी या देवीची उपासना केली जाते. या दिवशी साधकाचे मन 'आज्ञा' या चक्रात स्थिर होते. योगसाधनेत या आज्ञा चक्राचे विशेष स्थान आहे. या चक्रात स्थिर झालेला साधक कात्यायनीच्या चरणी आपले सर्वस्व वाहून देतो. परिपूर्ण आत्मदान करणार्या भक्ताला देवी सहजपणे दर्शन देते.

दुर्गेचे नाव कात्यायनी कसे पडले यामागे एक कथा आहे. कत नावाचे एक प्रसिद्ध महर्षी होते. त्यांना कात्य नावाचा पुत्र झाला. या कात्याच्या गोत्रात प्रसिद्ध महर्षी कात्यायनाचा जन्म झाला. त्यांनी अनेक वर्ष भगवतीची कठोर तपस्या केली. भगवतीने त्यांच्या घरी जन्म घ्यावा अशी त्यांची इच्छा होती. भगवतीने त्यांच्या या प्रार्थनेचा स्वीकार केला.

काही काळानंतर जेव्हा महिषासुराचा अत्याचार पृथ्वीवर वाढला तेव्हा ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तीन देवतांनी आपल्या तेजाचा काही अंश देऊन महिषासुराच्या विनाशासाठी एका देवीला उत्पन्न केले. महर्षी कात्यायनाने या देवीची सर्वप्रथम पूजा केली म्हणून या देवीला कात्यायनी देवी असे नाव पडले. अश्विन कृष्ण चतुर्थीच्या दिवशी या देवीने महर्षी कात्यायनाच्या घरी जन्म घेतला होता. सप्तमी, अष्टमी आणि नवमी हे तीन दिवस महर्षी कात्यायन यांच्या घरी पूजा ग्रहण करून दशमीच्या दिवशी देवीने महिषासुराचा वध केला होता. अशी ही कथा पुराणात आहे.

कात्यायनी अमाप फलदायक आहे. कालिंदीच्या यमुना किनारी भगवान कृष्णाला पती रुपात प्राप्त करण्यासाठी ब्रज गोपींनी या देवीची पूजा केली होती. ही देवी ब्रजमंडळाच्या अधिष्ठात्रीच्या रुपात प्रतिष्ठित आहे. कात्यायनीचे रूप अत्यंत तेजःपुंज आहे. तिला चार भुजा आहेत. देवीचा उजव्या बाजूकडील वरचा हातात अभयमुद्रा आणि खालच्या हातात वरमुद्रा आहे. डावीकडील वरच्या हातात तलवार आणि खालच्या हातात कमळाचे फूल आहे. तिचे वाहन सिंह आहे.

कात्यायनीच्या उपासनेने मनुष्याला अर्थ, धर्म, काम आणि मोक्ष या चार फळाची सहजतेने प्राप्ती होते. तो इहलोकात राहूनही त्याला अलौकीक तेज आणि प्रभाव प्राप्त होतो. जो व्यक्ती मातेची मनापासून पूजा करतो. तो रोग, भय, दु:ख आणि संतापापासून मुक्त होतो. सात जन्माचे पाप नष्ट करण्यासाठी मातेला शरण येऊन तिची उपासना करणे आवश्यक आहे.

# अशोक शिंगारे यांनी स्वीकारला जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार

**ठाणे :** ठाणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार अशोक शिंगारे यांनी आज जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांच्याकडून स्वीकारला.



राज्य शासनाने काल जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांची बदली नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून केली. त्यांच्या जागेवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव श्री. शिंगारे यांची नियुक्ती केली. आज रात्री श्री. शिंगारे यांनी ठाणे जिल्हाधिकारी पदाचा पदभार श्री नार्वेकर यांच्या कडून स्वीकारला. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी मनीषा जायभाये, निवासी उपजिल्हाधिकारी सुदाम परदेशी, उपजिल्हाधिकारी गोपीनाथ ठोंबरे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी अर्चना कदम, तहसीलदार राजाराम तवटे, राहुल सारंग, राजेंद्र चव्हाण, ठाणे तहसीलदार युवराज बांगर आदी यावेळी उपस्थित होते.

श्री. शिंगारे हे 2009च्या बॅचचे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत. त्यांनी यापूर्वी नांदेड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक या पदावर काम केले आहे. 9 सप्टेंबर 2020 पासून ते महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव म्हणून काम पाहत होते.

## हरवलेल्या तरुणीचा शोध

**ठाणे:** ठाणे येथील कोमल बाळासाहेब वाकचौरे (17) रा. कादंबरी चाळ, जय भवानी नगर, वागळे इस्टेट, ठाणे ही तरुणी हरवल्याची नोंद वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे.

हरवलेल्या तरुणीचा रंग सावळा, चेहरा गोल, नाक चपटे, उंची 5 फुट, अंगाने बारीक, डोळे गाळे, डोक्याचे केस काळे व विरळ, अंगात काळ्या रंगाचा टॉप व निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट घातलेली आहे.

ही तरुणी जर कोणास आढळल्यास तर त्यांनी वागळे इस्टेट पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी केले आहे.

पान ३ वरुन

## ठाण्यातील पहिले हृदय प्रत्यारोपण यशस्वी

शस्त्रक्रिया यशस्वी होत असल्यामुळे दाखल केले. भिकाजी यांना तातडीने ज्युपिटरमध्ये आणल्यावर डॉ. भास्कर शहा आणि डॉ. नितीन बुरकुले यांनी त्यांच्या तपासण्या केल्या. त्याबद्दल बोलताना डॉ. बुरकुले म्हणाले,' रुग्ण आमच्याकडे आला तेव्हा त्याची स्थिती अत्यंत नाजूक होती. हृदयात रक्तपुरवठा सुरळीत होत नसल्याने प्रकृती खालावत चालली होती. आम्ही तातडीने हृदय प्रत्यारोपणाचा निर्णय घेऊन तशी रीतसर प्रक्रिया सुरु केली. भिकाजी यांच्यावर डॉ. प्रवीण कुलकर्णी आणि डॉ. सौम्य शेखर यांनी 24 ऑगस्ट रोजी शस्त्रक्रिया केली. 'रुग्णाला वैद्यकीय सल्ल्यानुसार आहार आणि व्यायाम देण्यात आले यामुळे महिनाभरात रुग्ण पूर्वीसारखा झाला. त्यांना जणू दुसरे आयुष्य मिळाले आहे,' असे डॉ. कुलकर्णी म्हणाले

कोकणातील गावकऱ्यांनी तसेच हितचिंतक आणि काही ट्रस्टच्या साह्याने 40 ते 50 लाख रुपये गोळा करण्यात आले. शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याने रुग्ण व त्याच्या कुटुंबियांनी ज्युपिटर रुग्णालयाचे आभार मानले.

भिकाजी यांच्यावरील या कठीण अशा यशस्वी शस्त्रक्रियेत ज्युपिटरचे सर्व डॉक्टर आणि कर्मचारी यांचे योगदान मोलाचे आहे, असे रुग्णालयाच्या प्रवक्त्याने सांगितले. ज्युपिटर रुग्णालयातील निष्णात डॉक्टर, तेथील अत्याधुनिक यंत्रसामुग्री रुग्णांना अनुकूल असे वातावरण आदी बाबींमुळे कठीण शस्त्रक्रियांसाठी वाढती पसंती मिळत असल्याचे सांगण्यात आले.

## वसई-विरार परिवहन बसमध्ये अग्नितांडव

विरार महापालिका अग्निशमन विभागाला मिळताच घटनास्थळी धाव घेत बसला लागलेली आग विझविण्याची कामगिरी अग्निशमन कर्मचाऱ्यांनी पार पाडली. या घटनेत बसचे पूर्ण नुकसान झाले असले तरी कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे सांगण्यात आले.

## डोंबिवलीतील २७ गावांची तहान एमआयडीसी भागवणार

महापालिका क्षेत्रातील 27 गावांमध्ये कमी दाबाने आणि कमी प्रमाणात पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी गेल्या अनेक महिन्यांपासून केल्या जात होत्या. त्यामुळे यावर तोडगा काढण्याची मागणी स्थानिकांकडून कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याकडे सातत्याने केली जात होती. यासह शहरातील पाण्याच्या अनेक समस्यांवर तोडगा काढण्यासाठी खासदार डॉ. शिंदे यांच्या पुढाकाराने शुक्रवारी मंत्रालयात राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या दालनात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

त्यावेळी लोकप्रतिनिधींनी शहरातील पाण्याच्या समस्या मांडल्या. कल्याण डोंबिवली पालिकेसाठी 105 दशलक्ष लीटर पाणी मंजूर आहे. मात्र अवघा 60 दशलक्ष लीटर पाणी प्रत्यक्षात मिळते. त्यामुळे किमान 90 दशलक्ष लीटर पाणी मिळावे अशी मागणी यावेळी करण्यात आली होती. त्यावर बोलताना मंत्री उदय सामंत यांनी तत्काळ निर्णय देत या किमान 90 दशलक्ष लीटर पाणी तेही उच्च दाबाने देण्याचे आदेश त्यांनी यावेळी दिले. तसेच एमआयडीसीकडून किती पाणी पुरवण्यात येते, त्याचा दाब किती असतो, याची माहिती मिळण्यासाठी येथे मीटर बसवण्याचे आदेशही मंत्र्यांनी दिले. अमृत योजनेत पाणी पुरवठा करण्यासाठी हेदुटने आणि कोळे येथे दोन नव्या जोडण्या देण्याची मागणी होती. त्यावर तात्काळ निर्णय उद्योग मंत्री उदयजी सामंत यांनी देत या जोडण्यांना परवानगी देण्याचे आदेश दिले.

एमआयडीसी प्रशासनाकडून उद्योगांना पाणी देण्यात येते. मात्र रहिवाशांना पिण्याचे पाणी देण्यास प्राथमिकता द्यायला हवी, असे सांगत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी उद्योगांना सांडपाणी प्रक्रिया केंद्रातून सेकंडरी प्रक्रिया केले जाणारे पाणी देण्याचा प्रस्ताव ठेवला. कल्याण पूर्वेतील पालिकेच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातून हे पाणी देण्यासाठी आणि जलवाहिन्या टाकण्यासाठी त्याचा सविस्तर अभ्यास आणि अहवाल तयार करण्याचे आदेश यावेळी उदय सामंत यांनी दिले. त्यामुळे रहिवाशांना पाणी देणे सोपे होणार आहे. तसेच एमआयडीसीने प्रक्रिया केलेले किमान 40 दशलक्ष लीटर पाणी रहिवाशांना देता येईल.

शहराजवळ सातत्याने प्रदूषणाच्या समस्या समोर येत असतात. अशा तक्रारींवर तात्काळ तपासणी होण्यासाठी एमआयडीसीच्या कार्यालयातच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला जागा द्यावी, असे आवाहन यावेळी डॉ. शिंदे यांनी केले.

## सावत्र आईच्या मारहाणीत चिमुरड्याचा मृत्यू

कार्तिकवर मारहाणीच्या वेदनादायी जखमा होत्या. रुग्णालय प्रशासनाला या मारहाणीबद्दल संशय आल्याने त्यांनी ही माहिती पोलिसांना दिली. कार्तिकवर शास्त्रीनगर रुग्णालयात आवश्यक त्या वैद्यकीय सुविधेसह उपचार होत नसल्याने त्याला कळवा येथील छत्रपती शिवाजी रुग्णालयात गुरुवारी दाखल केले. तेथे त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले.

पोलिसांनी कार्तिकच्या मृत्युची चौकशी सुरु केली. त्याला मारहाण कोणी का केली याची सखोल चौकशी करताना पोलिसांना कार्तिक हा अंतीमादेवी जैयस्वाल हिचा सावत्र मुलगा होता. ती त्याचा सतत व्देष करत होती. त्याला नियमित मारहाण करत होती. असे पोलीस तपासात निष्पन्न झाले. गुरुवारी दुपारी अंतीमादेवीने घरात कोणी नाही पाहून तीन वर्षाच्या कार्तिकला आपल्या राहत्या घरात लाथाबुक्क्यांनी, हाताने आणि घरातील तारेच्या तुकडयाने झोडपून काढले. या मारहाणीत कार्तिक गंभीर जखमी झाला. त्यातच त्याचा मृत्यू झाला, असा निष्कर्ष पोलिसांनी काढला आहे. त्यामुळे अंतीमादेवीने हिने कार्तिकला जीवे ठार मारल्याचा गुन्हा पोलिसांनी दाखल केला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश सरडे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## किमान पाच वर्षे ठामपात होणार नाही नोकरभरती

करण्यात आले. येत्या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प मांडताना तो खर्च 782 कोटी रुपये होईल, असे आयुक्तांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात प्रस्तावित केले आहे. त्यात वेतनवाढीपोटी 75 कोटी रुपये अपेक्षित आहे. परंतु आता सातव्या वेतन आयोगापोटी पालिकेच्या तिजोरीवर दरवर्षी 114 कोटी 79 लाखांचा अतिरिक्त बोजा पडणार आहे.

दरम्यान महापालिकेतून महिन्याला कधी 20 तर कधी 90 च्या आसपास कर्मचारी, अधिकारी वर्ग सेवानिवृत्त होत आहे. त्यामुळे काही अधिकाऱ्यांवर अतिरिक्त कार्यभार दिला जात आहे. त्यात मधल्या काळात 880 पदांना मंजुरी देण्यात आली. ही सर्व पदे आरोग्य विभागातील आहेत. त्यामुळे या पदांव्यतिरिक्त उर्वरीत आकृती बंध पालिकेने मंजुरीसाठी शासनाकडे पाठविला आहे, तो मंजुर होईल किंवा नाही, याबाबत पालिका अधिकाऱ्यांमध्ये संभ्रम आहे.

आजही 1120 पदे मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत तर पालिकेत आजच्या घडीला 3,836पदे रिक्त आहेत. ही पदे मंजुर करीत असतांना पालिकेचा आस्थापना खर्च हा 35 टक्यांपेक्षा कमी असावा असा नियम आहे. मात्र सध्याच्या घडीला पालिकेचा आस्थापना खर्च 42 टक्के आहे.

महापालिका कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू झालेला आहे. त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याला त्या पोटी 5,030 हजारापर्यंत वाढ मिळणार आहे. त्यातही शासनाकडे मंजुर असलेल्या पदांसाठी जो पगार अपेक्षित आहे, त्यापेक्षा पालिका कर्मचाऱ्यांचा किंवा अधिकाऱ्यांचा पगार जास्तीचा आहे. त्यामुळे सातवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर त्यात आणखी वाढ होणार आहे. त्यामुळे हा बोजा वाढल्यास आस्थापना खर्च हा 42 टक्यांवरुन थेट 65 ते 70 टक्यांच्या आसपास जाणार आहे. त्यामुळे सहाजिकच पालिकेला किमान चार ते पाच वर्ष नवीन भरती करणे शक्य होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

## मनगटावरील घड्याळ सांगणार सफाई कर्मचाऱ्यांचा ठावठिकाणा

काही कर्मचारी दुसरीकडे कामाला जात असल्याचेही दिसून येत होते. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी पालिकेने हे पाऊल उचलल्याचे बोलले जात आहे. तसेच कामगाराला कामाच्या ठिकाणी वेळेत येण्याची शिस्त देखील या माध्यमातून लागणार आहे.

कर्मचाऱ्यांवर नजर ठेवण्याबरोबरच हे ट्रॅकर कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचीही काळजी घेणार आहे. सफाई कामगार हे जीवावर उदार होऊन काम करीत असतात. त्यामुळे त्यांचे आरोग्य देखील तितकेच महत्वाचे मानले जात आहे. त्यामुळे त्यांचे आरोग्य उत्तम राहावे, त्यांना आरोग्याच्या सोयी सुविधा तत्काळ उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने देखील हे ट्रॅकर काम करणार आहे. कामाच्या ठिकाणी एखाद्या कर्मचाऱ्याला चक्कर आली किंवा काही झाले तर त्याची माहिती देखील पालिकेच्या संबंधित विभागाला तत्काळ मिळणार आहे. त्यामुळे त्याला तत्काळ मदत मिळून त्याच्यावर उपचार करणे शक्य होणार असल्याची माहिती उपायुक्त मनिष जोशी यांनी दिली.

## ठामपा आयुक्तपदी अभिजित बांगर

आहे. राजेश नार्वेकर यांची नवी मुंबई महापालिका आयुक्तपदी वर्णी लावण्यात आली असून नवी मुंबईचे आयुक्त अभिजित बांगर यांना ठाणे महापालिकेच्या आयुक्त पदाची धुरा सोपवण्यात आली आहे.

नवी मुंबई शहराचा नियोजित विकास करण्यात श्री.बांगर यांचा मोलाचा वाटा आहे. ठाणे शहरात देखील अशाच प्रकारे विकास करण्याची ग्वाही त्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर दिली आहे.

डॉ.विपीन शर्मा यांनी जून 2020 रोजी ठाणे महापालिकेच्या आयुक्त पदाचा पदभार स्वीकारला होता. कोरोनाच्या आव्हानात्मक परिस्थितीमध्ये त्यांनी आयुक्तपदाची सूत्रे हातात घेतली होती. योग्य नियोजन करून त्यांनी ठाणे शहरात अवघ्या काही दिवसांत कोरोनाचा कहर आटोक्यात आणला. मात्र अवघे दोन वर्ष तीन महिनेच ते ठाणे महापालिकेच्या आयुक्तपदी राहू शकले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मुदतवाढीसाठी त्यांचे प्रयत्नही सुरु असल्याची चर्चा होती, मात्र अखेर गुरुवारी उशिरा बदलीची ऑर्डर निघाल्यानंतर या सर्व चर्चाना पूर्णविराम मिळाला.

ठाणे शहरातील नागरिकांची सेवा करण्याची संधी मला मिळाली आहे. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांना अपेक्षित असे काम करण्याला प्राधान्य देणार आहे. यामध्ये नागरिकांची व्यावसायिक, कार्यक्षम अशी प्रतिमा निर्माण होईल या दृष्टीने प्रयत्न करणार असून नागरिकांचे सहकार्य मिळेल, असा विश्वास अभिजित बांगर यांनी व्यक्त केला.

## पप्पू कालानी यांच्या भावाची ४१ लाखाची फसवणूक

2020 ते 18 ऑगस्ट 2022 दरम्यान हॉटेलचा टॅक्स आणि जीएसटी भरण्यासाठी ॲक्सिस आणि कॅनरा बँकेचे 40 लाख 97 हजार 385 रुपयांचे धनादेश दिले होते. मात्र कृष्णकांतने हे धनादेश स्वतःच्या आणि मित्राच्या नावावर वठवून अपहार केला.

हा प्रकार नारायण कालानी यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी मध्यवर्ती पोलीस ठाण्यात कृष्णकांत फुलपारथी याच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. कृष्णकांत फरार झाला आहे. या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक मंगेश जाधव करत आहेत.

# ठाणे ते कल्याणकडे जाणा-या प्रवाशांचा श्वास घुसमटला

## ऐन गर्दीत सायंकाळी ठाणे - कांजूरमार्ग लोकल विस्कळीत



**ठाणे :** सीएसएमटीकडे जाणा-या मार्गावर शुक्रवारी सायंकाळी मोठा तांत्रिक उद्भवल्यामुळे ठाणे ते कांजूरमार्ग या मार्गावरील जलद सेवा विस्कळीत झाली होती. या घटनेमुळे सीएसएमटीहून कल्याणकडे जाणा-या आणि ठाणेहून कल्याणकडे जाणा-या लोकल वाहतुकीचे 'तीन तेरा 'वाजले.

सायंकाळी 6. 40 ते 7. 35 वाजेपर्यंत लोकल वाहतूक बराचवेळ रखडल्याने घरी परतणा-या नोकरदारांचे, चाकरमान्यांचे हाल झाले. ठाणे स्थानकातून कल्याणकडे जलद वाहतुकीने जाणारे प्रवासी बराचवेळ फलाटावर ताटकळले होते. डाऊन जलद मार्गावरुन डाऊन धिम्या मार्गावर जाणा-या रुळांच्या सांध्यामध्ये तांत्रिक दोष उद्भवल्याने जलद सेवा थांबवण्यात आली. कल्याणकडे जाणा-या काही लोकल मुलुंड स्थानकात थांबवाव्या लागल्या होत्या. हा गोंधळ रात्री 8 वाजल्यानंतर निस्तरण्यात आला. मात्र प्रवाशांचे अतोनात हाल झाले.



रेशनिंग समितीचे ठाणे शहर अध्यक्ष आमदार संजय केळकर यांच्या हस्ते रेशनिंग कार्यालयात अपंग, विधवा, आदिवासी अशा विविध स्तरातील लोकांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित "सेवा पंधरवडा" कार्यक्रमांतर्गत शिधावाटप कार्यक्रम झाला. यावेळी शिधावाटप अधिकारी सौ. चव्हाण व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.



ठाणे रेल्वे स्टेशनजवळ गिरनार चहा दुकानासमोर पदपथावर खड्डे पडले आहेत. अनेक प्रवाशांचे पाय मुरगळत आहेत. केलेल्या तक्रारींकडे दुर्लक्ष होत असल्याची माहिती उपनगरीय रेल्वे प्रवासी महासंघाचे अध्यक्ष नंदकुमार देशमुख यांनी दिली आहे.

# कोकण शिक्षक मतदारसंघासाठी मतदारयादी कार्यक्रम जाहीर

**नवी मुंबई:** कोकण विभाग शिक्षक मतदारसंघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याकरिता 1 ऑक्टोबर 2022 ते 30 डिसेंबर 2022 या कालावधीत कार्यक्रम राबविला जाणार आहे.



कोकण विभागात अर्ज दाखल करण्यासाठी एकूण 82 कार्यालये निश्चित करण्यात आली असून 82 निवडणूक अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. विभागात जिल्हानिहाय पदनिर्देशित 76 अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असल्याची माहिती कोकण विभागाचे उपायुक्त (सामान्य प्रशासन) मनोज रानडे यांनी दिली.

भारत निवडणूक आयोगाकडून कोकण विभाग शिक्षक मतदारसंघासाठी प्राप्त झालेल्या कार्यक्रमाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी कोकण भवन इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आज आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे, प्र. तहसिलदार (सामान्य प्रशासन) माधूरी डोंगरे आणि मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते.

पत्रकारांना माहिती देताना उपायुक्त श्री. रानडे म्हणाले की, भारत निवडणूक अयोगाकडून कोकण विभाग शिक्षक मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम 1 ऑक्टोबर 2022 ते 30 डिसेंबर 2022 या कालावधीत राबविण्यात येत असून हा कार्यक्रम पुढील प्रमाणे विविध टप्प्यांमध्ये राबविला जाणार आहे. 1 ऑक्टोबर शनिवार रोजी मतदार नोंदणी नियमानुसार जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात येईल. 15 ऑक्टोबर शनिवार रोजी वर्तमानपत्रातील सूचनेची पुर्नप्रसिध्दी करण्यात येईल. 25 ऑक्टोबर मंगळवार रोजी वर्तमानपत्रातील सूचनेची दूसरी पुर्नप्रसिध्दी करण्यात येईल. 7 नोव्हेंबर सोमवारपर्यंत नमुना क्र. 18 किंवा 19 व्दारे दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. 19 नोव्हेंबर शनिवार रोजी मतदार याद्यांची छपाई करण्यात येईल. 23 नोव्हेंबर बुधवार रोजी मतदार याद्या प्रसिध्द करण्यात येतील. 23 नोव्हेंबर ते 9 डिसेंबर 2022 या कालावधीत प्रसिध्द झालेल्या मतदार याद्यांवरील दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. 25 डिसेंबर 2022 रोजी दावे व हरकती निकाली काढून पुरवणी यादी छपाई करण्यात येईल. 30 डिसेंबर 2022 शुक्रवार रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येईल.

कोकण विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीसाठी मतदार नोंदणी अधिकारी म्हणून कोकण विभागीय आयुक्त यांची नेमणूक करण्यात आली आहे. कोकण विभागातील पाच जिल्हाधिकाऱ्यांची सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी म्हणून पालघर जिल्हयातील 14 ठाणे - 14, रायगड- 23, रत्नागिरी- 14, सिंधुदूर्ग- 11 अशा 76 अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

'ठाणेवैभव' हे दैनिक मालक-मुद्रक-प्रकाशक मिलिन्द बल्लाळ यांनी मिड-डे इन्फोमिडिया लि., R/847/3, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी रबाळे, नवी मुंबई-४००७०१. महाराष्ट्र येथे छापून २०३/२०४, ॲडीजोन, अल्मेडा सिग्नलजवळ, पिनॅकल हॉस्पिटल समोर, एलबीएस मार्ग, ठाणे ४०० ६०१ ठाणे (प) महाराष्ट्र -४००६०१ येथे प्रकाशित केले. दूरध्वनी नं. २५३४१५२६,२५३४८५९४ Email : thanevaibhav1975@gmail.com

**आम्हा घरी धन । शब्दांचीच रत्ने।**
**शब्दांचीच शस्त्रे । यत्ने करू।।**

# नव्या नियुक्त्या, नवी आव्हाने !

**सत्तांतर झाले की सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या होतच असतात. सरकारी कार्यपद्धतीचा तो अपरिहार्य म्हणा की अनिवार्य भाग बनून गेला आहे. एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस यांचे सरकार येऊन आता दोन महिन्यांचा काळ लोटला आहे आणि अशात 44 सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत. त्यामागे राजकीय हिशेब चुकवणे हे कारण नाही. ज्यांच्या बदल्या झाल्या आहेत त्यांनी विहीत अडीच ते तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला आहे. त्यामुळे त्यांच्या बदल्या कारवाई या सदराखाली मोडत नाही. अर्थात ज्या नवीन जबाबदाऱ्या सोपवल्या गेल्या आहेत ते त्यांची सध्याच्या पदावर बजावलेल्या कामगिरीच्या जोरावरच आहेत असे म्हणायला वाव राहतो. ठाण्याचे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर आता नवी मुंबई महापालिका आयुक्त म्हणून कार्यभार सांभाळतील. त्यांनी ठाण्यात केलेल्या कामगिरीची योग्य दखल घेतली गेली असे म्हणावे लागेल. जिल्ह्यातील असंख्य गुंतागुंतीचे प्रश्न श्री. नार्वेकर यांनी कुशलतेने हाताळले होते. हाताखालच्या कर्मचाऱ्यांकडून काम करून घेण्याचे कसब आणि आम जनतेशी सौहार्दाने वागणे हे त्यांच्या लोकप्रियतेस कारणीभूत ठरले. त्यामुळे महापालिका आयुक्तपदाची जबाबदारी त्यांना सोपवली गेलेली दिसते.**

**ठाण्याचे आयुक्त डॉ.विपीन शर्मा यांना मऔविमच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी काम करण्याची संधी मिळाली आहे. आयुक्त म्हणून जनतेशी असलेला संपर्क त्यांना नवीन जबाबदारीमुळे मिळणार नाही, परंतु उद्योगासारख्या महत्वाच्या क्षेत्रात ठसा उमटवण्याची संधी त्यांना मिळाली आहे.**

**नवी मुंबई महापालिकेत चांगली कामगिरी बजावून अभिजीत बांगर ठाण्याच्या आयुक्तपदाची धुरा सांभाळणार आहेत. महापालिकेचा अनुभव असल्यामुळे श्री. बांगर यांना ठाण्यात काम करणे सोपे जावे. ठाण्यात असंख्य नागरी प्रकल्प पूर्णत्वाकडे चालले आहेत तर काही महत्वाकांक्षी कामांचे नियोजन सुरु आहे. नवी मुंबई महापालिकेचा कारभार हा नेहमीच अन्य महापालिकांसाठी मापदंड ठरत आला आहे. येथील रुंद रस्ते असोत की स्वच्छता, उद्यानांची देखभाल असो की वाहतुकीचे नियंत्रण, नवी मुंबई महापालिकेचे कौतुकच होत आले आहे. श्री. बांगर यांनी ठाण्यात या आघाड्यांवर जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करावी ही आशा असणार. नवी मुंबई परिवहन सेवेचा कारभार ठाणे परिवहन सेवेच्या तुलनेत सरस आहे. साहजिकच प्रवासी जनता बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली टीएमटीला उभारी मिळेल अशी आशा बाळगणार.**

**ठाणे महापालिकेची प्रशासकीय घडी विस्कटल्याचा अनुभव जनतेला वारंवार येत असतो. कोरोना हे एक कारण दिले जात असले तरी अकार्यक्षमता झाकण्यासाठी ही सबब लंगडी ठरणार आहे. श्री. बांगर यांना प्रशासनातील ढिसाळपणावर इलाज करावा लागेल. स्मार्ट-सिटीच्या योजनांबाबत सावळा गोंधळ आहे, क्लस्टर योजना वाट पाहत आहे. शहरातील 'मिसिंग लिंक' रस्ते तयार करायचे आहेत, पार्किंग तसेच फेरीवाले धोरण बनवायचे आहे. अशी कामांची लांबलचक यादी श्री. बांगर यांची वाट पाहत आहे. ही आव्हाने ते कशी पेलतात याकडे सर्वांचे लक्ष आहे. मुख्यमंत्र्यांचे वास्तव्य असलेल्या गावाचे आयुक्त होण्याचा मान मिळणे आनंदाची बाब असली तरी ही संधी आव्हानात्मक आहे, हे विसरता कामा नये! त्याकरिता त्यांना शुभेच्छा.**

# भिवंडी: स्मृतींची चाळता पाने

**उद्या रविवार 2 ऑक्टोबर 2022 रोजी मुंबई दूरदर्शन केंद्राला 50 वर्षे पूर्ण होत आहेत. या सुवर्ण महोत्सवी वाटचालीच्या पार्श्वभूमीवर मुंबई दूरदर्शन वर्धापन दिन 'मंतरलेले दिवस' हा विशेष कार्यक्रम आज शनिवार 1 ऑक्टोबर रोजी संध्याकाळी 5 वाजता 'मुंबई मराठी पत्रकार संघा'त होणार आहे. मुंबई मराठी पत्रकार संघाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमात मुंबई दूरदर्शनचे पहिले वृत्तनिवेदक, ज्येष्ठ लेखक, पत्रकार, संपादक आणि आकाशवाणी दूरदर्शनमधील ज्येष्ठ प्रसारण तज्ज्ञ डॉ.विश्वास मेहेंदळे यांच्या 'स्मृतींची चाळता पाने' या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. यानिमित्ताने या पुस्तकातील भिवंडी या लेखाचा काही अंश वाचकांच्या भेटीसाठी.....**

हा प्रसंग आहे 1984 मधला. इंदिरा गांधी यांची त्या पंतप्रधान असताना 31 ऑक्टोबर रोजी सकाळी 10च्या सुमारास त्यांच्या दिल्लीतल्या निवासस्थानी त्यांच्याच अंगरक्षकांनी - सुरक्षारक्षकांनी गोळ्या घालून हत्या केली हे आपल्या सर्वांना ठाऊक आहे. त्याच वर्षात ठाणे जिल्ह्यातल्या भिवंडी या गावात हिंदू-मुसलमानांच्या आपसात खूप दंगली झाल्या आणि दोन्ही समाजातले बरेच लोक त्या दंगलीमध्ये मारले गेले. अर्थात या दंगली आणि इंदिराजींची हत्या यांचा परस्पर संबंध नाही. त्याच वर्षात इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर मात्र राजधानी दिल्ली, पंजाब आणि आसपासच्या भागात दंगलींचा डोंब उसळला होता आणि अनेक शीख आणि हिंदूही मारले गेले होते. अशा काही घटना-घडामोडी घडल्या की त्यांचं वार्तांकन करण्याची वा व्ही.व्ही.आय.पी.च्या दौऱ्यांचं वार्तांकन करण्याची जबाबदारी ज्येष्ठ वार्ताहर म्हणून माझी असायची.

भिवंडीमधील दंगे हे जवळपास नित्याचेच झालेले होते. वरळीपासून भिवंडी साधारण पन्नास किलोमीटरवर, ठाणे जिल्ह्यात मोडणारं, तालुक्याचं आणि मुख्य म्हणजे घरटी हातमाग असणारं आणि बाजारपेठेचं गाव. वस्ती खूप दाट. मी आणि माझे कॅमेरामन काही दिवस जवळपास दररोजच भिवंडीला जायचो. कारण दंगे तर व्हायचेच, पण त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री पी.सी. सेठी (त्या वेळचे) आणि अनेक केंद्रीय तसंच प्रादेशिक नेते या गावाला वारंवार भेट द्यायला यायचे. अगदी राजीव गांधीसुद्धा त्या काळात भिवंडीत आलेले होते. त्यांच्यापैकी काही नेत्यांच्या, तसंच दंगलींवर नियंत्रण ठेवण्याचं काम करणाऱ्या काही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या, त्याचप्रमाणे काही सामाजिक राजकीय नेत्यांच्या मुलाखती घेण्याचंही काम मी करीत असे.

भिवंडीला जाणं हे नित्यनियमाचं झालेलं होतं. त्या दिवशी माझ्या टीममध्ये तरणाबांड आणि नुकताच विवाह झालेला छायाचित्रकार अनिल साळवी होता. ध्वनिमुद्रणासाठी त्याच दिवशी नोकरीत रुजू झालेला आणि बंगळूरच्या 'फिल्म ट्रेनिंग इंस्टिट्यूट'मधून शिकून बाहेर पडलेला जेमतेम वीस वर्षांचाच असणारा राजन् हेगडे होता. विश्वनाथ आणि नरसिंग हे दोन दाक्षिणात्य तरुण लाइटिंग असिस्टंटस् आणि बाहेरुन बुक केलेली टॅक्सी आणि ती चालवणारा पण आमचा स्टाफ नसलेला ड्रायव्हर अशी 5-6 जणांची टीम होती. सरकारी गाडीचं नुकसान होऊ नये म्हणून खाजगी टॅक्सीची व्यवस्था केली जायची. त्या टॅक्सी खाजगीच असत पण दूरदर्शनचा बॅच लावून त्या सरकारी असल्याचा आव आणीत. त्या काळात इ.एन.जी. म्हणजे 'इलेक्ट्रॉनिक न्यूज गॅदरिंग' या नावाचा आऊटडोअर शूटिंग करु शकणारा कॅमेरा नव्यानंच वरळीच्या केंद्रात रुजू झाला होता. त्यामुळे हळूहळू का होईना, पण बाहेर आयोजित होणाऱ्या अनेक सभा-सम्मेलनांचं, घटना-घडामोडींचं कव्हरेज-वृत्तांकन दाखवणं हे दूरदर्शनला शक्य होत होतं.

त्या दिवशी मी, अनिल साळवी, राजन हेगडे, विश्वनाथ, नरसिंग, तो ड्रायव्हर आणि बाहेरची ती टॅक्सी असे सगळे दहा-साडेदहाच्या सुमारास वरळी केंद्रातून भिवंडीला जाण्यासाठी बाहेर पडलो. दुपारी बाराच्या सुमारास आम्ही भिवंडीला पोहोचलो. कॅमेरा आणि ध्वनीमुद्रण सज्ज ठेवलेलं होतं. प्रथम पोलीस मुख्यालयात जायचं, काय नवी-जुनी बातमी आहे का वगैरे विचारायचं आणि मग गावात फेरफटका मारुन परिस्थिती कॅमेऱ्यात टिपायची. भिवंडीच्या पोलीस मुख्यालयात ठाणे जिल्ह्याचे पोलीस दल प्रमुख डी.एस.पी. माझ्या आठवणीप्रमाणे त्यांचं नाव उल्हास जोशी असावं फोनवर कुणाशी तरी बोलत होते. मी त्यांना नमस्कार करून म्हटलं, 'काय साहेब, काही विशेष.' त्यांनी पटकन् फोन खाली ठेवला. मला म्हणाले, "अहो विश्वासराव, बरं झालं तुम्ही आलात ते. इथून जवळच 'अन्सारी बाग' म्हणून एक ठिकाण आहे. अन्सारी या माणसाचीच ती बाग आहे. तो आणि त्याचे कुटुंबीय या बागेत राहतात. तिथं मध्यरात्री-पहाटे काही दंगा झाल्याची आणि बरीच माणसं त्या दंग्यात मारली गेल्याचा अंदाज आहे. दंगा अगदी ताजा आहे. मी तुम्हाला पोलीस संरक्षण वगैरे मात्र देऊ शकणार नाही. पण तुम्ही तुमच्या जबाबदारीवर जात असाल तर .....". मी अनिल साळवी आणि राजन हेगडे यांच्याबरोबरच विश्वनाथ आणि नरसिंग यांना तर इशारा केलाच, पण त्याचबरोबर त्या ड्रायव्हरलाही विचारून घेतलं.




आता अशा चॅलेंजिंग कव्हरेजच्या वेळी फारसं कोणी कच खात नाही. उलट टीममध्ये एक प्रकारची चेतना निर्माण होते. त्याप्रमाणे उल्हास जोशी यांच्याकडे 'अन्सारी बाग' घटना आणि त्या बागेच्या पत्त्याविषयी अधिक माहिती घेतली आणि आमची गाडी त्या दिशेनं निघाली. साधारण 4-5 किलोमीटर अंतरावर आमच्या गाडीत पुढे बसलेल्या विश्वनाथ आणि नरसिंग या अतिउत्साही तरुण मंडळींना एक कमान दिसली आणि कमानीवर 'अन्सारी बाग' लिहिलेलं आणि त्या कमानीचे बऱ्याच प्रमाणात तोडमोड केली असल्याचे दिसले. ते दोघं एकदमच ओरडले, 'सर, यह देखो अन्सारी बाग.' आमची गाडी थांबली. अनिल साळवी आणि राजन् हेगडे यांना मी सांगितलं होतं आता परत निघेपर्यंत एक सेकंदही कॅमेरा बंद ठेवणं नाही. मी म्हणालो, मिळेल ते दृश्य आणि आवाज रेकॉर्ड करीत रहायचं. आम्ही गाडीच्या खाली उतरलो. अनिल आणि राजन् दोघंही सांगितल्याप्रमाणे दृश्य आणि ध्वनी रेकॉर्ड करीतच गाडीच्या खाली उतरले. तो ड्रायव्हरही गाडी तिथंच बंद करून आमच्याबरोबर चालायला लागला. 'अन्सारी बागे'चा बोर्ड किंवा ती कमान जिथं होती त्यापेक्षा बरीच आत अन्सारी बाग होती. आम्ही सारे जण शूटिंग करीतच आत आत चाललो होतो इतक्यात.....(त्या काळात कॅमेरा आणि साऊंड स्वतंत्रपणे रेकॉर्डिंग करीत.) विश्वनाथचा जोरात ओरडण्याचा आवाज आला. तो म्हणाला, 'अहो साहेब, ही बघा डेडबॉडी. तेवढ्यात नरसिंग, ड्रायव्हर, राजन हेगडे आणि मलाही बऱ्याच डेड बॉडी दिसल्या होत्या. आमच्या साऱ्या आवाजांसकट नरसिंग-विश्वनाथ यांनी जवळपास तीस पस्तीस डेड बॉडीज् मोजल्या होत्या. आमचं बागेत आत आत जाणं चालूच होतं. इतक्यात आग लागलेला एक बंगला समोर आला. त्या बंगल्यातून तीन व्यक्ती बाहेर येताना दिसल्या. चित्रपट अभिनेते डेव्हिड आणि त्यांच्याबरोबर त्यांची मिथुन चक्रवर्ती या अभिनेत्यासारखी दिसणारी दोन मुलं त्यांच्या दोन्ही बाजूला, त्यांच्या हातात शस्त्रं, ते दृश्य बघून आम्हाला घाम फुटला होता. तेवढ्यात तो डेव्हिडसारखा दिसणारा माणूस म्हणाला, 'आइये आइये मेहेंदळेसाहब. आप बडे मौके पे आये है। देखो क्या सत्यानाश कर दिया मेरा!'



अन्सारीनं आम्हाला त्याच्या बंगल्यात येऊन त्या बंगल्याचीही कशी दुर्दशा करण्यात आली आहे त्याचं चित्रिकरण करण्याची विनंती केली. आम्ही त्या अन्सारीबरोबर त्याच्या बंगल्यात गेलो. त्याचा बंगला तर आगीत भस्मसात होत होताच पण त्याच्या बंगल्यातलं फर्निचर, चीजवस्तू सारं बेचिराख होताना दिसत होतं. तेवढ्यात एका बेडच्या खालून आवाज आला, "या अल्ला मैं तो मर गया." खाली वाकून बघितलं, तर एक मध्यमवयीन माणूस विव्हळताना दिसत होता. मी राजन् हेगडेकडे मायक्रोफोनची मागणी केली आणि त्याची मुलाखत घ्यायला सुरुवात केली. ते दृश्य बघून माझ्या पोटातही खूप कालवाकालव झाली. पण कव्हरेज झालं होतं. मी पटकन् ओरडलो --पॅकअप. सगळं आटपून वरळीला जायला निघालो. भिवंडी ते वरळी असा तासाभराचा प्रवास पूर्ण केला. गाडी पोर्चमध्ये आली. माहिती आणि ध्वनिक्षेपण खात्याचे त्या काळात सचिव आणि नंतर 'प्रसार भारती'चे प्रमुख म्हणूनही काम केलेले एस.एस. गिल आमची वाट पहात पोर्चमधल्या पायऱ्यांवर उभे होते. त्यांच्या बरोबर केंद्र संचालक, बी.पी. सिंग (जे सध्या एफ्.टी.आय.आय. या संस्थेचे अध्यक्ष आहेत) नंदू वाडदेकर, अजित नाईक, सतीश भाटिया, वेंकट असे एकेक दिग्गज कॅमेरामेन आणि डॉ. गोविंद गुंठे सारखे बरेच निर्माते ते कव्हरेज बघायला जमले. विनोद गणात्रा या आमच्या मित्र आणि अतिशय उत्साही फिल्म एडिटरनं ते कव्हरेज सर्वांना दाखवलं.

माझं आणि माझ्या टीमचं खूप कौतुक करण्यात आलं. बी.पी.सिंग तर त्याच्या नेहमीच्या पद्धतीनं दाद देत "ढासू कव्हरेज विश्वासराव" असं म्हणाल्याचं मला आजही 30-40 वर्षांनंतर चांगलं स्मरतं आहे. "बी.बी.सी."च्या तोंडात मारणारं कव्हरेज तुम्ही केलं आहे जीव संकटात घालून." असं जवळपास प्रत्येक जणच म्हणाला. हे एकीकडे चालू असताना सचिव गिल मात्र मला बाजूला घेऊन हे सांगत होते की, "इसको कॉपी वगैरे मत होने देना. यह अनएडिटेड कव्हरेज मेरे पास दे दो. मै इसको दिल्ली ले जाता हूँ. इस को इमिजेटिली पॅक करो". आणि खरोखरीच अन्य कुणाच्याही हाती पडणार नाही याची दक्षता घेत स्वत: एस.एस.गिल यांनी ते त्यांच्या हातानी त्यांच्या बॅगेत टाकलं आणि संध्याकाळच्या विमानानं ते मुंबईहून दिल्लीला रवाना झाले. आमचे तेव्हाचे केंद्र संचालक व्ही.एस.शास्त्री तर त्या कामगिरीबद्दल वारंवार गौरवोद्गार काढत.

माझ्या भिवंडीच्या वाऱ्या काही संपल्या नाहीत वा संपत नव्हत्या. अशाच एका वारीच्या वेळी तत्कालीन गृहमंत्री दस्तुरखुद्द पी.सी.सेठी भिवंडीत येणार अशी बातमी मिळाली. आमची स्वारी भिवंडीत दाखल झाली. तिथं पोहोचतो, कॅमेरा सेटअप् लावतो तो काय आश्चर्य! पी.सी.सेठी यांच्याबरोबरच, काँग्रेस पक्षाचे तत्कालीन सरचिटणीस राजीव गांधी त्या ठिकाणी हजर झाले. पी.सी. सेठींची मुलाखत घेताना ते सहजपणे बोलून गेले, "एक दोन दिवसात खुद्द पंतप्रधान इंदिरा गांधीही भिवंडीला भेट देऊन पाहणी करणार आहेत. खल्लास. मोठीच बातमी मिळाली. पी.सी.सेठी, राजीव गांधी यांच्या मुलाखती संपवून आम्ही केंद्रात परत आलो आणि पंतप्रधानांच्या भिवंडी भेटीच्या दृष्टीनं काय काय तयारी करायला हवी त्याचा विचार करु लागलो. दरम्यान कामानिमित्त देशविदेश दौऱ्यावर गेलेल्या अति महत्त्वाच्या काही व्यक्तींच्या दौऱ्यांचं वार्तांकन करण्याची संधी मला मिळाली.

काही दिवसातच पंतप्रधान इंदिरा गांधी त्यांच्या अत्यंत व्यस्त अशा वेळापत्रकातून वेळ काढून भिवंडीला आल्या. ज्यांचं दंगलीमध्ये नुकसान झालेलं होतं त्यांची त्यांनी विचारपूस केली. आणि भिवंडीमधल्या सर्किट हाऊसवर त्यांनी भिवंडीतल्या काही प्रतिष्ठित मंडळींची एक सभा बोलावली. इंदिराजींनी सर्वांना आवाहन करुन, काय काय नुकसान झालं आहे ते कथन करा असं सभेसाठी जमलेल्यांना सांगितलं. आणि एका मागून एकेकानं आपलं गाऱ्हाणं सांगायला सुरुवात केली. त्यात दोन्ही समाजातील लोक होते. हिंदूही होते, मुसलमानही होते. एकेकाच्या करुण कहाण्या कानावर पडत होत्या आणि अनिल साळवी, राजन हेगडे यांचं त्या कहाण्या रेकॉर्ड करून घेण्याचं काम सुरु होतं. इंदिराजी शांतपणानं प्रत्येक व्यक्तीचं म्हणणं ऐकून घेत होत्या. कुणालाही थांबवित नव्हत्या. साऱ्यांची दुःखं एकाग्र चित्तानं मनात साठवीत होत्या. अचानक अन्सारीचा नंबर लागला. तो त्या सभेत ताडकन् उठून उभा राहिला. ओक्साबोक्शी रडायला लागला. एकदम ओरडला, "मॅडम मेरा तो सत्यानाश हो गया. पुरा अन्सारी बाग इन लोगोंने उजाड दिया." असं सांगताना त्याचं ओक्साबोक्शी रडणंही एकीकडे चालूच होतं. मध्येच तो थांबला आणि माझ्याकडे आणि आमच्या शूटिंग करणाऱ्या टीमकडे बघत म्हणाला, "मॅडम इन लोगोंसे पुछिये, यह दूरदर्शनवाले लोग उस दिन आये थे. उन्होंने उस दिन शूटिंग किया है. उससे पता चलेगा मेरा कितना नुकसान हुआ है और कितने लोग और किस तरहसे मारे गये है." सारी सभा एकदम स्तब्ध होऊन त्या अन्सारीचं पंतप्रधानांसमोर होत असलेलं निवेदन शांतपणे ऐकत होती. इंदिराजी शांतपणे काहीतरी पुटपुटल्या. मनात बोलावं तशा त्या बोलल्या. त्यांच्याबरोबर दिल्लीहून आलेल्या माणसांपैकी एकाला बाजूला घेऊन मी विचारलं, "काय म्हणत होत्या पंतप्रधान!" त्यावर तो माझ्या कानात सांगायला लागला, "पंतप्रधान म्हणाल्या हो. हो. मला ठाऊक आहे आणि ते कव्हरेज बघूनच मी इथं पाहणी करण्यासाठी आले आहे."

मित्र हो, या घटनेला आता 35-40 वर्ष झाली पण पंतप्रधान जर त्याक्षणी खरोखरीच असं काही म्हणाल्या असतील, तर आम्हाला म्हणजे खास करुन, आमच्या त्या टीमला, आपल्या कामाचा गौरव झाल्याची किंवा आम्हाला पद्मश्री मिळाल्याची भावना झाली आणि आज 35-40 वर्षांनंतरही तीच भावना कायम आहे. कव्हरेज केलं आणि त्या दिवशी ते दाखवलं गेलं नाही (म्हणजे दाखवणं शक्यच नव्हतं, दंगा अधिक भडकला असता) याचं जेवढं वाईट वाटलं होतं त्यापेक्षा कितीतरी पटींनं आपण केलेलं कव्हरेज खुद्द पंतप्रधान आणि त्यांच्या कचेरीनं बघितलं आणि ते पाहून पंतप्रधान दिल्लीहून भिवंडीला सारी परिस्थिती बघायला आल्या याचं समाधान आणि आनंद खूपच मोठा होता. 'अन्सारी बाग' आणि तिथं उसळलेली दंगल आणि त्या अनुषंगानं करायला मिळालेलं कव्हरेज-वार्तांकन आणि इंदिराजींनी ते कव्हरेज पाहिलं असण्याची शक्यता अशा गोष्टी नोकरीच्या करियरमध्ये क्वचितच घडणाऱ्या असतात. पण त्या तुमच्या करियरमधल्या महत्त्वाच्या टप्प्यांपैकी एक असतात.

■■■

# तिमिरातून ...तेजाकडे नेणारी सरस्वती : डॉ. सुखदा बाळासाहेब म्हात्रे -चिराटे



**अपूर्णाला पूर्ण करणारी**
**शब्दांनी ज्ञान वाढवणारी**
**जगण्यातून जीवन घडविणारी**
**तत्त्वातून मूल्ये फुलविणारी**
**ज्ञानरुपी झरा!**

स्मित हास्याने स्वागत करणारी गुणवंत, ज्ञानवंत विक्रोळी, पूर्व येथील संदेश विद्यालय ॲन्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्सच्या प्राचार्य म्हणजे डॉ. सुखदा बाळासाहेब म्हात्रे -चिराटे. ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष आणि प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे यांचे शेंडेफळ म्हणजे डॉ. सुखदा. त्या इतिहास आणि राज्यशास्त्र विषय घेऊन निष्णात पदवी, तर सेट एज्युकेशन, डॉक्टरेट पदवीने सन्मानित आहेत तसेच त्यांनी डीसीएम आणि डीसीपी पदवी प्राप्त केलेली आहे.

शिक्षणाची गंगा ज्या घरात वाहते अशा सरस्वतीचा वरदहस्त असणाऱ्या शिक्षणप्रेमींच्या घरात जन्मलेल्या सुखदा ताई सांगतात, घरात आधी सहा शिक्षक होते. त्यांच्याकडे पाहताना सतत वाटायचे आपल्यालाही मुलं घडवायची आहेत. शिक्षणाचा प्रसार करायचा आहे. पण मनात यायचं शिक्षक हा फार कडक शिस्तीचा असतो. आपल्याला जमेल का शिक्षक होणं?

**नवदुर्गा लेख**

आई-वडिलांच्या शिकवणीने सांगितलं, 'मुलांना आपलंसं करणारा शिक्षक हा त्याच्या वयाने नाही तर त्यांनी मनापासून, निस्वार्थीपणे केलेल्या शिक्षण सेवेतूनच आपलासा होतो'. हे वाक्य कायम मनावर कोरले गेले आणि वयाच्या विसाव्या वर्षी शिक्षक झाले. हे सांगताना आदर्श शिक्षकाच्या आदर्श कन्या आहेत हे जाणवले. लागलीच शिक्षण क्षेत्राची समाजसेवा करण्यास सुरुवात केली आणि माझ्या समोरची सगळी मुलं माझी लेकरं कधी झाली मला कळलंच नाही. हे सांगताना त्या खूप भावूक झाल्या.

याची एक आठवण त्या सांगतात, लोकलने प्रवास करताना एक क्लिप विकणारी मुलगी ट्रेनमध्ये भेटली. ताईंनी तिला प्रश्न विचारला तुझं शिक्षण किती झाले? तिच्या बोलण्यातून कळलं तिला शिक्षणाची आवड होती. मग काय घेऊन आल्या तिला आपल्या नाईट कॉलेजमध्ये. यावरून त्यांचा प्रेमळपणा हा गुण दिसून येतो. विद्यार्थ्यांच्या आठवणींना उजाळा देत त्या बोलल्या, मुलांचे पालक होत होत आपण आदर्श कधी बनतो हे कळतच नाही. हे उद्गार त्यांनी नकळत काढले.

सूर्यनगरमधील झोपडपट्टी वस्तीमध्ये शैक्षणिक प्रवासाला सुरुवात झाली. शाळेत येताना मुलं दारूच्या बाटलीत पाणी आणायचे. शिकवत असताना आई रडत-रडत यायची 'मॅडम मुलांना सोडा. याचा बाप मारायला आलाय' अशा परिस्थितीत शिक्षणाची उभारणी आम्ही आमच्या संस्थेतून केली, असे सुखदाताईंनी सांगितले. यातून त्यांच्या संघर्षाची जाणीव दिसून येते. फक्त मुलांचे शिक्षण नाही तर पालकांचे उद्बोधन करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. हे सारं निष्ठेने केले; कारण या मुलांची गुणवत्ता कमाल होती फक्त त्यांना सोबतीची गरज होती. आज ही मुलं मोठ्या पदावर काम करताना पाहताना माझ्या वडिलांनी झोपडपट्टीमध्येच शाळा का सुरु केली याचे उत्तर मिळते आणि त्याचबरोबर समाधानही मिळते. त्यांचे हे धाडस वाखाणण्याजोगे होते, असे त्या सांगतात.

मुलांना शिकवत असताना माझे स्वतःचे शिक्षणही सुरु ठेवायचे हे ठरलं होतं. लग्नानंतर पतीची साथ खूप छान लाभली. त्यामुळे आजही मी माझे शिक्षण सुरुच ठेवले आहे आणि ते निरंतर राहील. हे त्या आनंदाने सांगत होत्या. आपल्या शिक्षणाने, वाचनाने, माणसांना भेटण्याने तुम्ही प्रगल्भ होत राहता. अशी शिकवण त्यांनी सांगितली. आपलाच विद्यार्थी आपल्या सोबत प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे हे सांगताना त्यांचा उर समाधानाने भरून आला. त्या पुढे म्हणाल्या, शिक्षण क्षेत्रातील गंमतच ही आहे की तुमच्यासोबत अनेक लोक तुमच्या कार्यात जोडले जातात. तुम्ही विद्यार्थ्यांचे पालक बनत जाता आणि तुमच्या विद्यार्थ्यांना पोटच्या गोळ्याप्रमाणे सांभाळता. आपल्या क्षेत्राची योग्य निवड याविषयीचा अभिमान त्यांच्या चेहऱ्यावर झळाळी आणत होता.

मला वेळोवेळी शिक्षण क्षेत्राचे ज्ञान देणाऱ्या वडिलांचे दोन वर्षांपूर्वी निधन झाले. हे सांगतना सुखदाताईंचे डोळे पाणावले परंतु लागलीच त्यांनी लावलेला ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेचा वटवृक्ष आज सारं कुटुंब आनंदाने बहरवत आहोत हे सांगितले. आज या शिक्षण संस्थेत 27 हजार मुलं शिकत आहेत. सारं कुटुंब नेहमी या शिक्षण प्रवाहात मला मार्गदर्शक आहेत हे त्या विनम्रपणे सांगतात, 'तुम्ही ठरवलं की तुमच्यासाठी कठीण असं काहीच नसतं; तुम्ही फक्त चालत राहायचं, प्रचंड आत्मविश्वासाने आणि इच्छाशक्तीच्या बळावर. तुमची वाट स्वतः तयार करायची'. शिक्षण क्षेत्रातील मुलांची प्रगती हेच ध्येय समोर ठेवून गेली वीस वर्षे मी वाटचाल करीत आहे. हे सांगताना त्यांच्या सचोटी या गुणाची झालर दिसून आली.

2022 मधील 'सक्षम महिला' पुरस्कार आणि 'विक्रोळी रत्न' पुरस्कार, 'सुवर्ण कन्या' पुरस्काराच्या मानकरी, लोकमत वृत्तपत्र समुहाचा शिक्षक गौरव पुरस्कार मिळालेल्या सुखदाताई निस्पृहपणे आपले समाजकार्य करीत आहेत. यासाठी त्यांना त्रिवार वंदन !

समाजातील प्रत्येक स्तरातील व्यक्तीपर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे हा ध्यास असलेल्या सुखदाताईंना ते पूर्ण करण्याचे बळ बाप्पा सतत देत राहो हीच श्री सिध्दिविनायक चरणी मी प्रार्थना करते. ताईंचा हा प्रवास ऐकताना माझ्या तोंडून निघाले, 'दिव्यत्वाची जेथे प्रचीती, तेथे कर माझे जुळती'!!

**- श्रीम. मनीषा रामचंद्र कदम**
**बृहन्मुंबई महानगरपालिकेचे**
**श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी संचलित सार्वजनिक ग्रंथालय/वाचनालय,**
**प्रभादेवी, मुंबई 400025**
**मोबाईल 7506027287**

# आम्ही म्हातारे नव्हे, तर महा..तारे आहोत

भारतीय संस्कृतीत ज्येष्ठ नागरिकांचे स्थान नेहमीच मानाचे-आदराचे राहिले आहे. या पार्श्वभूमीवरच म्हटलं जातं ना, मातृ देवो भव: पितृ देवो भव:! ज्येष्ठ नागरिक हा प्रत्येक कुटुंबाचा अनमोल ठेवा असून, तो खऱ्या अर्थानं कुटुंबाचा आधारवड असतो. वास्तवात ज्येष्ठ नागरिक हे जीवनाच्या प्रारंभीच्या काळात हाडाचा बोरू तर, रक्ताची शाई करुन मुलांचे भवितव्य घडवतात. धाडसीवृत्ती, सहनशिलता, कर्तव्यपरायणता, समर्पणवृत्ती, निष्ठा हेच त्यांच्या जीवनाचे पंचपैलू होत.

आपल्या मुला -मुलींच्या भवितव्याला सुयोग्य आकार देण्यासाठी उभ्या आयुष्यात त्यांनी अनेक उन्हातान्हाचे घाव सहन केल्याने त्यांची उतारवयातली प्रकृती बरीचशी खिळखिळी झालेली असते. त्यामुळे त्यांच्या आयुष्याच्या सेकंड इनिंगमध्ये मधुमेह, ब्लडप्रेशर, हृदयविकार, किडनीचे आजार, दमा, बहिरेपणा, गुडघ्यांची समस्या, मोतीबिंदू असे विविध आजार जडतात. तरी देखील स्वतःला परिवाराचे आधारस्तंभ म्हणून भूमिका बजावत आम्ही म्हातारे झालोत, म्हणून आम्हाला आधार द्या,असे कधीच ते विनवण्या करताना आढळत नाहीत. कारण स्वाभिमानाने जगणं, हा त्यांच्या जीवनाचा मूलमंत्रच आहे. 'मोडेन पण वाकणार नाही' हा बाणा आयुष्यभर जपणारे हे ज्येष्ठ नागरिक.




**जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन**

अमेरिकेचे माजी प्रेसिडेंट रोनाल्ड रिगन यांनी 14 डिसेंबर 1990 रोजी युनोच्या महासभेत प्रस्ताव मांडला आणि त्यास सर्वानुमते मान्यता मिळून 1 ऑक्टोबर 1991 पासून जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन साजरा होऊ लागला आहे. जगात ज्येष्ठ नागरिकांशी होणारे गैरवर्तन व अन्यायाला पायबंद घालण्यासाठी आणि त्यांच्याविषयी आदराची भावना निर्माण व्हावी, या प्रांजळ उद्देशाने युनोने ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करण्यासंदर्भात निर्णय घेतला. जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचा हा 33 वा वर्धापन असून यादिनी सरकारी यंत्रणा, ज्येष्ठांच्या सेवाभावी संस्था तसेच परिवारांनी वडीलधारी सदस्यांचा छोट्याखानी घरगुती कार्यक्रमामध्ये सत्कार करून सन्मानित करावे, असे आवाहन करण्यात येते.

ज्येष्ठ नागरिकांच्या पालनपोषणाची तसेच आरोग्याची काळजी घेण्याची जबाबदारी पाल्यांना व समाजाला कळावी, या उद्देशाने केंद्र सरकारने आईवडील, ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम - 2007 हा कायदा पारित करून तो त्वरेने लागू केला आहे. वृद्धांची छळवणूक अन् सांभाळ न करणाऱ्या खट्याळ मुलांनी आपल्या पालकांना कमाल 10 हजार रुपये पोटगी रुपात अदा करावेत, अशी कायद्यात तरतूद करण्यात आली आहे. एकत्र कुटुंबात ज्येष्ठांची मानसिक-शारीरिक छळवणूक होत असेल, तर त्याची गंभीर दखल घेऊन कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा अंतर्गत पोलीस स्टेशनला जाऊन संबंधित मुलावर गुन्हा नोंदवावा. दरम्यान आरोप सिद्ध झाल्यास गुन्हेगाराला 3 महिन्याची शिक्षा अन् 5 हजार रुपये दंडाची तरतूद केली आहे. संबंधित ज्येष्ठ नागरिकांना न्याय मिळावा अन् आरोपीला शिक्षा व्हावी, यासाठी त्या त्या ठिकाणचे ज्येष्ठ नागरिक संघ अन् महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ लि. (फेस्कोम)ने त्या पिडीत ज्येष्ठ नागरिकाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून, त्याला कोर्टकचेरीच्या कार्यवाहीत मदत करावी. जेणेकरुन त्याला न्याय मिळेल तर, दोषीला अद्दल घडेल.

राज्यातल्या अनाथ,निराधार ज्येष्ठ नागरिकांसाठी सन 1963 मध्ये वृध्दाश्रमची व्यवस्था केली आहे. वृध्दाश्रम हे स्वयंसेवी संस्थांमार्फत अनुदान तत्वावर चालविली जातात. तसेच राज्याच्या सामाजिक न्याय विभागाकडून सन 1995 मध्ये मातोश्री वृध्दाश्रम सुरु केले असून, सध्या राज्यात 23 वृद्धाश्रम कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे श्रावण बाळ योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजनेतून गरजू वृद्धांना अर्थसहाय्य दिले जाते. दारिद्र्य रेषेखालील ज्येष्ठांना अन्नपूर्णा आणि अंत्योदय योजनेद्वारे अल्प दरात धान्य पुरवठा केला जातो.

एस.टी.बस मधून प्रवास करताना 65 वर्षांवरील वयाच्या ज्येष्ठ स्त्री पुरुषांना 50 टक्के भाड्यात सवलत दिली असून, त्याचे स्मार्ट कार्ड देखील वितरित करण्यात आले आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 75 वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठांना एस.टी. बसेसचा प्रवास मोफत केला आहे. इतकेच नव्हे तर, वयाची 95 वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांना देशांतर्गत विमान सेवा प्रवास मोफत करण्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलं आहे. शिंदे सरकारने उत्पन्नाची अट न लावता राज्यातील ज्येष्ठ स्त्री पुरुषांना शासकीयसह पंचतारांकित खाजगी हॉस्पिटल्समध्येही मोफत औषधोपचार करण्याची कायदेशीर तरतूद करावी, ही फेस्कॉमतर्फे मागणी करण्यात येत आहे.

आपली प्रकृती निरोगी व सुदृढ राहावी,यासाठी ज्येष्ठांनी आपले उर्वरित आयुष्य आनंदात घालवावे. नियमित व्यायाम(फिरणे, योगा वगैरे),चौरस आहार, पुरेशी झोप या त्रिसुत्री कार्यक्रमाचे उत्तमरित्या नियोजन करावे, म्हणजे आपली प्रकृती सुदृढ राहण्यास मदत होईल. नित्यनेमाने वाचन करावे, जेणेकरुन आपणास स्मृतीभृंश आजार होणार नाही. शेवटी ज्येष्ठांचे उर्वरित जीवन सुसह्य, समाधानी, आनंदमय, आरोग्यदायी व सुरक्षित रहावे, हाच मानस आहे. आपणा सर्वांना पुनश्च ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा! आपणास आरोग्यदायी असं दीर्घायुष्य लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

*या जन्मावर,या जगण्यावर शतदा प्रेम करावे*

**लेखक/ ज्येष्ठ पत्रकार- रणवीर राजपूत, ठाणे**
**माजी सहसचिव,महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ(को. वि.)**

# मुख्यमंत्रीसाहेब डोंबिवलीत या, आपल्या येण्याने झोपलेले प्रशासन जागे होईल !

## मनसेची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विनंती



**डोंबिवली :** सामान्य जनतेसठी कार्यरत असणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना डोंबिवली शहाराबद्दल नितांत प्रेम आहे. मुख्यमंत्री रात्रीही अगदी होडीने प्रवास करीत डोंबिवलीत येतात. आताही नवरात्र उत्सवासाठी येणार आहेत. पण त्यांनी यावेळी कोणत्याही एकाच उत्सवाला भेट न देता गल्लीबोळातील उत्सवांना भेटी द्याव्यात. आपल्या भेटीमुळे तरी प्रशासन जागे होईल आणि रातोरात शहरातील खड्डेमय रस्ते चकाचक होतील. शहरातील खड्डेमय रस्त्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनाला मुख्यमंत्र्यांच्या येण्याने रस्त्यांची कामे करता आली तर ते डोंबिवलीकरांना फायद्याचे ठरेल अशी विनंती वजा प्रशासनावरील कडवट टीका मनसेचे डोंबिवली शहरप्रमुख मनोज घरत यांनी केली.

पूर्वेकडील पाथर्ली येथे मनसेच्या माध्यमातून नवरात्र उत्सव आयोजित केला आहे. दरम्यान आर्थिकदृष्ट्या मागास कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी डोळे, दंत आणि ज्येष्ठांसाठी संधिवात तपासणी आणि उपचार शिबीर स्वयंवर सभागृहात आयोजित करण्यात आले होते. "नवरात्री उत्सवात आरोग्य उत्सव" या घोषवाक्यानुसार मोफत आरोग्यसेवा अंतर्गत चार शाळेतील शेकडो विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. यावेळी रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत झालेल्या चर्चेत त्यांनी पालिका प्रशासनाच्या कारभारावर टिपणी करताना अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली.

याविषयी त्यांनी सांगितले की, पालिका आयुक्त, आमदार, खासदार ज्या - ज्या ठिकाणी भेटी देतात त्या परिसरातील खड्डे बुजवून डांबरीकरण व स्वच्छता करण्यात येते. परंतु इतर रस्त्यांच्या बाबतीत चालढकल होते. हा प्रकार कुठे तरी थांबला पाहिजे. फक्त मंत्र्यांना दाखवण्यापुरते काम करायचे असेल तर मग विकासाच्या गप्पा मारु नका. पालिकेतील अधिकारी फक्त मलमपट्टी काम करतात. ज्या ठिकाणी खड्डे बुजवून डांबरीकरण होते तो रस्ता चार दिवसात उखडून जातो याचे व्हिडीओ सोशल मीडियावर प्रसारित होत आहेत. अशा ठेकेदारांवर कारवाई करून त्यांना काळ्या यादीत टाकावे. आता डोंबिवलीकरांची सहनशीलता संपत आली आहे. कधीतरी स्फोट होऊन एका तीव्र आंदोलनाला प्रशासनाला सामोरे जावे लागेल. हा प्रकार होऊ नये म्हणून मुख्यमंत्रीसाहेब या डोंबिवलीत, आपल्या येण्याने झोपलेले प्रशासन जागे होईल असे मनसेला वाटत असेल.

## आत्मा मालिक इन्स्टिट्यूटमध्ये अभियांत्रिकी सप्ताहाचे आयोजन




**वासिंद :** येथील मोहिली-अघई आत्मा मालिक इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च अँड टेक्नॉलॉजीमध्ये अभियांत्रिकी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी व स्थानिक व्यवस्थापन समितीचे कार्याध्यक्ष उमेश जाधव यांच्या मार्गदर्शनाने आयोजित या सप्ताहात मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी टेक्निकल क्विझ, वॉटर रॉकेट कॉम्पिटिशन, नट बॅलन्सिंग गेम, सिव्हिल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी ब्रिज बनवणे, बिल्डिंग बनवणे तसेच कॉम्प्युटर विभागातील विद्यार्थ्यांसाठी स्पीड टायपिंग टेस्ट, आयडेंटिफाय लँग्वेज बेस ऑन सेन्टेन्स स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये पदवी व पदवीका या अभ्यासक्रमातील कॉम्प्युटर इंजीनियरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन्स या विषयाचे अध्यापन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी याविषयीचे प्रात्यक्षिक सादर करीत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. तर अभियांत्रिकी अभ्यासक्रमाबरोबर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंटची सुविधा देण्यात येते, यामुळे अनेक विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आलेल्या असल्याचे इन्स्टिट्यूटचे प्राचार्य डॉ डी. डी. शिंदे यांनी म्हटले आहे.

याप्रसंगी प्राचार्य आशिष काटे, प्रा.कैलास थोरात, शैक्षणिक व क्रीडा संकुलाचे रजिस्ट्रार गुलाब हिरे, व्यवस्थापक महेश रत्नपारखी आदी मान्यवर उपस्थित होते. तर मेकॅनिकल प्रमुख प्रा. उल्हास पाटील, सिव्हील प्रा. समृद्धी शेलवले, इलेक्ट्रॉनिक अँड कम्युनिकेशन प्रा. सुमित कुमार, कम्प्युटर प्रा वैशाली शिंदे यांनी प्रात्यक्षिके सादरीकरणासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी, प्राध्यापक व इतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

## नियमित कर्जफेड करणारे शेतकरी अनुदानाच्या प्रतीक्षेत

**मुरबाड :** तालुक्यात सेवा सोसायटीच्या माध्यमातून खरीपाच्या हंगामात सर्व शेतकरी कर्ज घेतात. घेतलेल्या संबंधित कर्जाची मुदतीत परत फेड केल्यास कर्जावरील व्याज आकारले जात नाही. परिणामी सोसायटीचे सभासद खरीपाच्या हंगामासाठी आवर्जून कर्ज उचलुन मुदतीत परत फेड करतात मात्र शासनाने थकबाकीदार शेतकऱ्यांना कर्जमाफी केल्याने नियमित कर्जफेड करणारे शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहतात.

एक प्रकारे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय होतो. अशा शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून शासनाच्या माध्यमातून पावसाळी अधिवेशनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या बँकखात्यात थेट अनुदानीत रक्कम जमा होईल अशी घोषणा केली मात्र सप्टेंबर महिना संपत आला तरी शेतकऱ्यांच्या खात्यात एक दमडीही जमा झाली नाही. म्हणजेच राज्य सरकारने एक प्रकारे शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. अशी संतप्त प्रतिक्रिया नियमितपणे परतफेड करत असलेल्या शेतकरी वर्गाकडून उमटत असतानाच अजुनपर्यंत तरी राज्य शासनाच्या माध्यमातून कुठलेही स्पष्टीकरण देण्यात आले नाही. तरी शासनाने शेतकऱ्यांचा जास्त अंत न पहाता तात्काळ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अनुदानाची रक्कम जमा करावी अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते रमेश हिंदुराव यांनी दिला आहे.

## पडघ्यातील रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**पडघा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतात सेवा पंधरवडा साजरा होत असून ठाणे जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती श्रेया गायकर यांनी भोईरपाडा येथील संपर्क कार्यालयात एका रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.

दात्यांना रक्तदान करण्याकरिता रक्तपेढीच्या एका विशिष्ट पद्धतीने तयार केलेल्या बसमध्येच रक्तदान करण्याची सोय करण्यात आली होती. यावेळी आयोजक श्रीकांत गायकर यांनी प्रथम रक्तदान करून शिबिराचे उद्घाटन केले. याप्रसंगी 54 दात्यांनी रक्तदान करून आपले कर्तव्य बजावले. तर संकलित झालेल्या रक्तपिशव्या मुंबईतील पल्लवी रक्तपेढीत जमा करण्यात आल्या आहेत. यावेळी भाजपाचे युवा मोर्चाचे माजी जिल्हाध्यक्ष श्रीकांत गायकर, केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांचे स्वीय सहाय्यक राम माळी, माजी सभापती अशोक शेरेकर, दिनेश गंधे, पंचायत समिती सदस्य गुरुनाथ जाधव, पडघ्याचे उपसरपंच अभिषेक नागवेकर, निळकंठ विशे, जगदीश कोर, पंकज देसले, कुकसे सरपंच मनोहर भोईर, माजी सरपंच भरत पाटील, तुकाराम फिरंगे, विवेक शेलार, संदीप विशे, राजेश जाधव, माजी सरपंच विश्वास माघे, भानुदास गायकर, एकनाथ गायकर आदींनी उपस्थिती लावली.

## केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी घेतले क्षयरोग रुग्णांना दत्तक

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेकडून क्षयरोगावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची कार्यवाही सुरु आहे. प्रधानमंत्री क्षयरोग (टीबी) मुक्त भारत अभियान या कार्यक्रमांतर्गत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमीत्ताने केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल मोरेश्वर पाटील यांनी क्षय मित्र म्हणून भिवंडी मनपा क्षेत्रातील 100 क्षयरुग्णांना दत्तक घेतले आहे. या प्रसंगी आमदार महेश चौघुले व माजी नगरसेवक संतोष शेट्टी उपस्थित होते.

भिवंडी मनपा कार्यक्षेत्रात झोपडपट्टी बहुल भाग असून या भागामध्ये गरीब व गरजू लोक वास्तव करीत आहेत. अशी माहिती देत मनपाचे वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल मोरेश्वर पाटील यांची समक्ष भेट घेतली. त्यावेळी त्यांनी उपरोक्त 100 क्षयरुग्णांसह महानगरपालिका कार्यक्षेत्रातील उर्वरित 2354 असे एकूण 2454 क्षयरुग्णांना दत्तक घेतले आहे.

मंत्री कपिल मोरेश्वर पाटील यांच्याकडून मनपा कार्यक्षेत्रातील क्षयरुग्णांना पुढील 6 महिने पोषण आहार पुरविणेत येणार आहे. प्रधानमंत्री क्षयरोग (टीवी) मुक्त भारत अभियान या कार्यक्रमांतर्गत त्यांचे मोलाचे योगदान प्राप्त झाले आहे. या प्रसंगी वैद्यकीय आरोग्य अधिकारी बुशरा सय्यद व वैद्यकीय अधिकारी कर्मचारी, क्षयरोगी व नागरिक उपस्थित होते.

## मुरबाड तालुक्यातील सोनगाव येथे ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे नरबळीचा प्रयत्न फसला

**मुरबाड :** तालुक्यातील टोकावडे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे सोनगाव येथील ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे नरबळीचा प्रयत्न फसला असून नरबळी व अघोरी प्रथा जादूटोणा करणाऱ्या 9 जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत गु.र.क्र. 157/2022 भा. दं. सं. कलम 34, सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम 2013 चे कलम 3(2), 3(3) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

फिर्यादी नामे संजय लक्ष्मण भोईर, वय 40 वर्ष, व्यवसाय- शेती, तालुका मुरबाड यांनी फिर्याद दिली की, त्यांच्या गावातील ग्रामस्थ बाळू हरी भोईर व इतर यांनी तक्रारदार यांची पत्नी गावच्या पोलीस पाटील असल्याने कळविले की, गावातील इसम नामे रशीद फकीर शेख याच्या बंद घरामध्ये आपल्या गावातील ईसम नामे 1) काजी दाउद शेख , 2) बंधू तुकाराम वाघ, 3) विजय बंधू वाघ व इतर काही लोक हे घराचा दरवाजा बंद करून जादूटोणा वगैरे प्रकार करीत आहेत अशी माहिती सांगितली. यातील पहिल्या दोन इसमांवर सन 2009 मध्ये नरबळीचा गुन्हा नोंद आहे. घरामध्ये आत प्रवेश केला असता पूजेसाठी असणारे साहित्य लिंबू , मिरची, अगरबत्ती, नारळ वगैरे असे साहित्य घरात दिसून आले. तसेच तेथे वर नमूद तीन इसमांसह इतर चार पुरुष व दोन मुली सुद्धा होत्या. मुलींकडे त्यांनी चौकशी केली असता एकीने तिला कोणीतरी करणी केली असून ती उतरवण्यासाठी आले असल्याचे सांगितले व दुसरीने तिला भूत लागले असून ते उतरवण्यासाठी आले असल्याचे सांगितले. यावरुन अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा अशा प्रकारची कृती व त्यासाठी सहकार्य करण्यासाठी एकत्र जमले असल्याने त्यांच्या विरुद्ध दिलेल्या तक्रारी नुसार वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास संतोष दराडे,सहा. पोलीस निरीक्षक टोकावडे पोलीस स्टेशन हे करित आहेत.


### जाहीर नोटीस

सुचना देण्यात येते की, श्री. नरेंन्द्र रा. बर्डे (एच यु एफ) हिंदु अविभक्त कुटूंबा तर्फे कर्ता श्री. नरेंन्द्र रा. बर्डे., वय-सज्ञान, राहणार सदनिका क्र. ४०३, इमारत क्र. ४, विमब्लंडन पार्क को. ऑप. सो., सिंघानीया शाळेसमोर, समता नगर, ठाणे (प) ४००६०६. ह्यांच्या हिंदु अविभक्त कुटुंबाचे मालकी हक्कात असलेली खालील परिशिष्टात वर्णन केलली जागा मिळकत (यापुढे जीचा उल्लेख '**सदरहु मिळकत**' असा केला आहे)

सदरहू मिळकती बाबत विक्री, गहाणखत, भाडेकरार, अभिहस्तांतरण, न्यास नोंदणी लिअन हवाला ताबा सुविधाधिकार वारसहक्क याव्दारे किंवा अन्यथाः कशाही प्रकारे उक्त मालमत्तेत किंवा त्यावर तिच्या कोणत्याही भागावर कोणताही हक्क, हितसंबंध दावा किंवा मागणी असणाऱ्या सर्व व्यक्तिंना तो लेखी स्वरुपात संबंधित कागदपत्रासहित खालील निम्नस्वाक्षरिकाकडे वैभव अपार्टमेंट, ४था मजला, नगरपालिका शाळा नं.१ जवळ, कलेक्टर ऑफीस, टेंभी नाका, ठाणे (प.)४००६०१ येथे आमच्या प्रसिद्धीच्या तारखेपासुन १४ दिवसात कळविण्याची विनंती करण्यात येते. तसे न झाल्यास असा कोणताही हक्क, हितसंबंध, दाद किंवा मागणी झाल्यास ती सोडून दिल्याचे किंवा मागे घेतल्याचे समजण्यात येईल.

**परिशिष्ट**

मौजे कुकसे ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्वे क्र. ८०/४ (जुना २३/४) आणि सर्वे क्र. ८१/७ (जुना २८/७) या जमिन मिळकतीवरील अस्तित्वात असलेल्या सुमीत लॉजिस्टीक ॲण्ड इंडस्ट्रीयल पार्क मधील इमारत क्र. एच ५ मधील गाळा क्र. ५ बी ज्याचे क्षेत्रफळ ६२५० चौ.फूट (म्हणजेच ५००० चौ. फूट बांधीव क्षेत्र) असून त्या गाळ्या खालील जमीन व सर्वे क्र. ८०/४ (जुना २३/४) वरील जमिनीवर बांधकाम करण्याचे हक्क प्राप्त आहेत, सदर मिळकत कुकसे ग्रामपंचायत, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे, सब रजिस्ट्रार साहेब ठाणे यांचे हद्दीत व अधिकार क्षेत्रात आहे.

**दिनांक** : ०१/१०/२०२२

सही/-
**ॲड. सुजित भ. बोरकर**
मो. ९८१९१००९२०

### जाहीर नोटीस

याद्वारे नोटीस दिली जाते श्री. अभयकीर्ती अंबरीश रणदिवे यांच्याकडे सदर नोंदणीकृत निवासी सदनिका क्रमांक-०३, तळमजला, क्षेत्रफळ-४३० चौ.फूट, (बिल्ट-अप)श्री. पुंडलिक को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेड , (जुना सर्व्हे क्रमांक- ११५) नवीन सर्व्हे नंबर- २६, हिसा नंबर- ५, गाव डोंबिवली (जुनी), तालुका- कल्याण, जिल्हा-ठाणे, राज्य- महाराष्ट्र, विद्या अंबरीश रणदिवे हयांच्याकडून बक्षिसे पत्राद्वारे नोंदणीकृत केला आहे सदर नोंदणीकृत दस्त क्रमांक-१४८७९/२०१९ दिनांक २७/११/२०१९, दुय्यमनिबंधक कल्याण-४ येथे नोंद झाला आहे, विद्या अंबरीश रणदिवे यांनी चंदू बी. सेजवानी यांच्याकडून फ्लॅट खरेदी केला होता सदर नोंदणीकृत दस्त क्रमांक १०३४/१९९९ दिनांक-२६/०३/१९९९ कल्याण-३ येथे नोंद झाला आहे, श्री. चंदू बी. सेजवानी यांनी शंकर के. पुजारी यांच्याकडून फ्लॅट खरेदी केला होता सदर नोंदणीकृत दस्त क्रमांक १०७/१९९८ दिनांक १५/०१/१९९८ कल्याण-३ येथे नोंद झाला आहे, शंकर के. पुजारी यांनी पी.एम. बदनापूरकर पाटील कन्स्ट्रक्शन कडून फ्लॅट खरेदी केला होता. परंतु पी.एम. बदनापूरकर पाटील कन्स्ट्रक्शन आणि शंकर के पुजारी यांचा मध्ये झालेला मूळ करार गहाळ झाला आहे, म्हणून, सदर नमूद सदनिकेच्या संदर्भात कोणत्याही व्यक्तीचा विक्री, भेट, अदलाबदल, तारण, भार, भाडेपट्टा, धारणाधिकार, वारसा किंवा या सारख्या अन्य कोणत्याही प्रकारे दावा, अधिकार, नाम निर्देश आणि स्वारस्य असल्यास येथे खाली दिलेल्या पत्त्यावर या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह कळवावे.

**दिनांक** : ०१/१०/२०२२

**पत्ता** : ऑफिस नं.-२१२, दुसरा मजला, कृष्णा कॉम्प्लेक्स, मोरया बॅनक्वेट हॉलच्याजवळ, कल्याण (प), जि. ठाणे, मो.८०९७१३३२३६

सही/-
**ॲड. प्रेक्षा गोर**

### जाहिर नोटीस

**उल्हासनगर येथिल मे. उपविभागीय अधिकारी साहेब, उपविभाग उल्हासनगर यांचे न्यायालयात**

आर. टी. एस. अपिल क्र. २५/२०२२

श्रीम. बारकुबाई शंकर फुलोरे व इतर ...अपिलार्थी

विरूध्द

श्री. बाळकृष्ण महादु वायले व इतर ...सामनेवाले

ज्याअर्थी अपिलार्थी श्रीम. बारकुबाई शंकर फुलोरे व इतर, राहणार - मु. वसार गाव, ता. अंबरनाथ, जि. ठाणे यांनी उल्हासनगर येथिल मेहरबान उपविभागीय अधिकारी साहेब उपविभाग, उल्हासनगर यांचे न्यायालयात जमीन महसुल अधिनियम १९६६, चे कलम २४७ अन्वये सर्वे क्र. ५८ हिस्सा क्र.१ आणि सर्वे क्र.५७ हिस्सा क्र. १ या जमीन मिळकतीबाबत फेरफार क्र.१७९५ च्या विरूध्द आर. टी. एस. अपिल क्र. २५/२०२२ हा दाखल केलेला आहे. सदर आर. टी. एस. अपिल विलंब माफीच्या अर्जावर दिनांक. १९/१०/२०२२ रोजी उल्हासनगर येथिल मेहरबान उपविभागीय अधिकारी साहेब उपविभाग, उल्हासनगर यांचे न्यायालयात सकाळी ११.३० वाजता सुनावणी आयोजित केलेली आहे.

ज्याअर्थी ज्या कोणाला अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या आर. टी. एस. अपिल क्र. २५/२०२२ यांस हरकत असेल त्यांनी उल्हासनगर येथिल मेहरबान उपविभागीय अधिकारी साहेब उपविभाग, उल्हासनगर यांचे न्यायालयात सुनावणीस दिनांक १९/१०/२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता स्वत: अगर आपले कायदेशीर प्रतिनिधीमार्फत हजर राहुन आपले म्हणणे दाखल करावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**पत्ता** : फ्लॅट नं. ००१, वेदांत गार्डन जवळ, अष्टविनायक कॉम्पलेक्स, कात्रप, बदलापुर (पुर्व) ता. अंबरनाथ, जि. ठाणे

सही/-
**ॲड. राजेंद्र धारवणे**

### जाहीर नोटीस

प्रोसेस फी जमा रु. **ॲड. श्री. जे. डी. म्हात्रे**

**ठाणे येथील मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात,ठाणे**

फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २२४७/२०२२

**श्रीमती श्वेता संदिप भडवळकर.**, वय ४३ वर्षे, व्यवसाय- नोकरी
रा.रूम.नं.७, शिवशक्ती चाळ नं. २, दिवा आगासन रोड,
गणेश नगर, दिवा (पू) ता. जि. ठाणे-४००६१२ **...अर्जदार**

**विरूध्द**

**ठाणे महानगरपालिका ठाणे**
महानगरपालिका भवन,डॉ. अल्मेडा रोड, चंदनवाडी,
पाचपाखाडी, ठाणे (प) ४००६०२ **...सामनेवाले**

**तमाम जनतेस सदर नोटीशीद्वारे सुचीत करण्यात येत आहे ते येणेप्रमाणे.**

**१)** उपरोक्त अर्जदार यांचा मुलगा **कु. प्रणय संदिप भडवळकर ह्याला दि.१२/०१/२०१३** रोजी अर्जदार यांनी त्यांच्या राहत्या घरी म्हणजेच **रूम. नं. ७, शिवशक्ती चाळ नं.२, दिवा आगासन रोड, गणेश नगर, दिवा (पू) ता. जि. ठाणे - ४००६१२ येथे डॉ.सुनिल शेळके यांच्या देखरेखी खाली/ समक्ष जन्म दिला.** अर्जदाराकडुन काही अपरिहार्य कारणांमुळे तसेच अनवधानाने सदर जन्माची नोंद **दिवा प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे** यांचे दप्तरी करून जन्माचा दाखला प्राप्त करून घ्यावयाचा राहिला होता. अर्जदार यांना त्यांच्या मुलाच्या शैक्षणीक कारणास्तव त्यांच्या मुलाच्या जन्माच्या दाखल्याची आवश्यकता आहे.

**२)** महाराष्ट्र शासनाच्या/Government of Maharashtra Law and Judiciary Department Mantralay, Mumbai-400032, Circular No. 59-12/Misc./2013/A Branch Date 31/12/2013 परिपत्रकानुसार उशिरा जन्म दाखला हा मा. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयातुन प्राप्त करून घ्यावयाचा असल्यामुळे सदर न्यायालयात **फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २२४७/२०२२** दाखल केला आहे.

**३)** सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत न्यायालयात दाखल करावी. वरील मुदतीत कोणी हरकत न दाखल केल्यास सदर अर्जासोबत कोणाचीही हरकत नाही असे समजण्यात येईल.

**४)** आज दि. २९/०९/२०२२ रोजी माझ्या सहीने व शिक्याने दिले.

| ३५ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.राहूल मुंडके | उपविभागीय अधिकारी,पनवेल | उपविभागीय अधिकारी कार्यालय, पनवेल | ०२२-२७४५२३२८ | पनवेल व उरण तालुका |

पान 9 वर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३६ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.अजित नेराळे | उपविभागीय अधिकारी, कर्जत | उपविभागीय अधिकारी कार्यालय, कर्जत | ०२१४८-२३३४९९ | कर्जत व खालापूर तालुका |
| ३७ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.उमेश बिरारी | उपविभागीय अधिकारी,माणगाव | उपविभागीय अधिकारी कार्यालय, माणगाव | ०२१४०-२६३१४१ | माणगाव व तळा तालुका |
| ३८ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.विठ्ठल इनामदार | उपविभागीय अधिकारी, पेण | उपविभागीय अधिकारी कार्यालय,पेण | ०२१४३-२५३००० | पेण तालुका |
| ३९ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.प्रशांत ढगे | उपविभागीय अधिकारी,अलिबाग | उपविभागीय अधिकारी कार्यालय, अलिबाग | ०२१४१-२२४४३४ | अलिबाग व मुरुड तालुका |
| ४० | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.अमित शेडगे | उपविभागीय अधिकारी, श्रीवर्धन | उपविभागीय अधिकारी कार्यालय, श्रीवर्धन | ०२१४७-२२२४३५ | श्रीवर्धन व म्हसळा तालुका |
| ४१ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्रीम.प्रतिमा पुदलवाड | उपविभागीय अधिकारी,महाड | उपविभागीय अधिकारी कार्यालय, महाड | ०२१४५-२२२१३६ | महाड व पोलादपूर तालुका |
| ४२ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.विठ्ठल इनामदार | उपविभागीय अधिकारी, रोहा | उपविभागीय अधिकारी कार्यालय,रोहा | ०२१९४-२३५९५४ | रोहा व सुधागड तालुका |
| ४३ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री. विजय तळेकर | तहसिलदार पनवेल | तहसिलदारकार्यालय, पनवेल | ०२२-२७४५२३९९ | पनवेलतालुका |
| ४४ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | डॉ.शितल रसाल | तहसिलदारकर्जत | तहसिलदारकार्यालय, कर्जत | ०२१४८-२२२०३७ | कर्जत तालुका |
| ४५ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री. आयुब तांबोळी | तहसिलदारखालापूर | तहसिलदारकार्यालय, खालापूर | ०२१९२-२७५०४८ | खालापूर तालुका |
| ४६ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.भाऊसाहेब अंधारे | तहसिलदार उरण | तहसिलदारकार्यालय, उरण | ०२२-२७२२२३५२ | उरण तालुका |
| ४७ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्रीम.स्वप्नाली डोईफोडे | तहसिलदार पेण | तहसिलदारकार्यालय, पेण | ०२१४३-२५२०३६ | पेण तालुका |
| ४८ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्रीम. कविता जाधव | तहसिलदार रोहा | तहसिलदारकार्यालय, रोहा | ०२१९४-२३३२२२ | रोहा तालुका |
| ४९ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.दिलीप रायण्णावार | तहसिलदारसुधागड | तहसिलदारकार्यालय, सुधागड | ०२१४२-२४२६६५, २२४६९४ | सुधागड तालुका |
| ५० | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्रीम.मिनल दळवी | तहसिलदार अलिबाग | तहसिलदारकार्यालय, अलिबाग | ०२१४१-२२२०५४ | अलिबाग तालुका |
| ५१ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.रोहनशिंदे | तहसिलदार मुरुड | तहसिलदारकार्यालय, मुरुड | ०२१४४-२७४०२६ | मुरुड तालुका |
| ५२ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.सचिन गोसावी | तहसिलदार श्रीवर्धन | तहसिलदारकार्यालय, श्रीवर्धन | ०२१४७-२२२२२६ | श्रीवर्धन तालुका |
| ५३ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्रीम. प्रियंका आयरे | तहसिलदार माणगांव | तहसिलदारकार्यालय, माणगाव | ०२१४०-२६२६३२ | माणगाव तालुका |
| ५४ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री. समीर घारे | तहसिलदार म्हसळा | तहसिलदारकार्यालय, म्हसळा | ०२१४९-२३२२२४ | म्हसळा तालुका |
| ५५ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.अण्णप्पा कनशेट्टी | तहसिलदारतळा | तहसिलदारकार्यालय, तळा | ०२१४०-२६९३१७ | तळा तालुका |
| ५६ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री. सुरेशकाशिद | तहसिलदार महाड | तहसिलदारकार्यालय, महाड | ०२१४५-२२२१४२ | महाड तालुका |
| ५७ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्रीम. दिप्ती देसाई | तहसिलदार पोलादपूर | तहसिलदारकार्यालय, पोलादपूर | ०२१९१-२४००२६ | पोलादपूर तालुका |
| ५८ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.शरद पवार | उपविभागीय अधिकारी, दापोली | उपविभागीय अधिकारी कार्यालय,दापोली | ०२३५८-२८२०३१ | मंडणगड व दापोली तालुका |
| ५९ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्रीम.राजश्री मोरे | उपविभागीय अधिकारी,खेड | उपविभागीय अधिकारी कार्यालय,खेड | ०२३५६-२६४८८८ | खेड तालुका |
| ६० | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.प्रविण पवार | उपविभागीय अधिकारी, चिपळूण | उपविभागीय अधिकारी कार्यालय, चिपळूण | ०२३५५-२५२०४६ | चिपळूण व गुहागर तालुका |
| ६१ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री विकास सुर्यवंशी | उपविभागीय अधिकारी, रत्नागिरी | उपविभागीय अधिकारी कार्यालय, रत्नागिरी | ०२३५२-२२२४२२ | रत्नागिरी व संगमेश्वर तालुका |
| ६२ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्रीम.वैशाली माने | उपविभागीय अधिकारी, राजापूर | उपविभागीय अधिकारी कार्यालय,राजापूर | ७५०७४८८८१९ | राजापूर व लांजा तालुका |
| ६३ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.दत्तात्रय बेर्डे | निवडणूक नायबतहसीलदार/ प्रभारी तहसीलदार मंडणगड | तहसिलदार कार्यालय, मंडणगड | ०२३५०-२२५२३६ | मंडणगड तालुका |
| ६४ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्रीम.वैशाली पाटील | तहसिलदार दापोली | तहसिलदार कार्यालय, दापोली | ०२३५८-२८२०३६ | दापोली तालुका |
| ६५ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्रीम.प्राजक्ता घोरपडे | तहसिलदार खेड | तहसिलदार कार्यालय, खेड | ०२३५६-२६३०३१ | खेड तालुका |
| ६६ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्रीम.प्रतिभा वराळे | तहसिलदार गुहागर | तहसिलदार कार्यालय, गुहागर | ०२३५९-२४०२३७ | गुहागर तालुका |
| ६७ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.तानाजी शेजाळ | निवासीनायब तहसिलदार / प्रभारीतहसिलदार, चिपळूण | तहसिलदार कार्यालय, चिपळूण | ०२३५५-२५२०४४ | चिपळूण तालुका |
| ६८ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.सुहास थोरात | तहसिलदार संगमेश्वर | तहसिलदार कार्यालय, संगमेश्वर | ०२३५४-२६००२४, | संगमेश्वर तालुका |
| ६९ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.शशिकांत जाधव | तहसिलदार रत्नागिरी | तहसिलदार कार्यालय, रत्नागिरी | ०२३५२-२२३१२७, | रत्नागिरी तालुका |
| ७० | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.प्रमोद कदम | तहसिलदार लांजा | तहसिलदार कार्यालय, लांजा | ०२३५१-२३००२४, | लांजा तालुका |
| ७१ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्रीम.शीतल जाधव | तहसिलदार राजापूर | तहसिलदार कार्यालय, राजापूर | ०२३५३-२२२०२७, | राजापूर तालुका |
| ७२ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्रीम.वैशाली मोहन राजमाने | उपविभागीय अधिकारी, कणकवली | उपविभागीय अधिकारी कार्यालय, कणकवली | ०२३६७-२३२०९२ | देवगड, वैभववाडी व कणकवली तालुका |
| ७३ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्रीम.वंदना मधुकर खरमाळे | उपविभागीय अधिकारी, कुडाळ | उपविभागीय अधिकारी कार्यालय,कुडाळ | ०२३६२-२२३३२५ | मालवण व कुडाळ तालुका |
| ७४ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.प्रशांत शांताराम पानवेकर | उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी | उपविभागीय अधिकारी कार्यालय, सावंतवाडी | ०२३६३-२७३०२९ | वेंगुर्ला, सावंतवाडी व दोडामार्ग तालुका |
| ७५ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.श्रीकृष्ण शंकर ठाकूर | तहसिलदार देवगड | तहसिलदार कार्यालय, देवगड | ०२३६४-२६२२०४ | देवगडतालुका |
| ७६ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.शिवाजी राठोड | तहसिलदार वैभववाडी | तहसिलदार कार्यालय, वैभववाडी | ०२३६७- २३७२३९ | वैभववाडी तालुका |
| ७७ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री. रमेश जेठया पवार | तहसिलदार कणकवली | तहसिलदार कार्यालय, कणकवली | ०२३६७-२३२०२५ | कणकवली तालुका |
| ७८ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री अजय केशवराव पाटणे | तहसिलदार मालवण | तहसिलदार कार्यालय,मालवण | ०२३६५- २५२०४५ | मालवण तालुका |
| ७९ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री. अमोल भागचंद पाठक | तहसिलदार कुडाळ | तहसिलदार कार्यालय, कुडाळ | ०२३६२- २२२५२५ | कुडाळ तालुका |
| ८० | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.प्रविण अबाजी लोकरे | तहसिलदार वेंगुर्ला | तहसिलदार कार्यालय,वेंगुर्ला | ०२३६६- २६२०५३ | वेंगुर्ला तालुका |
| ८१ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री.श्रीधर बाजीराव पाटील | तहसिलदार सावंतवाडी | तहसिलदार कार्यालय, सावंतवाडी | ०२३६३- २७२०२८ | सावंतवाडी तालुका |
| ८२ | पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी | श्री अरुण आत्माराम खानोलकर | तहसिलदार दोडामार्ग | तहसिलदार कार्यालय, दोडामार्ग | ०२३६३ -२५६५१८ | दोडामार्ग तालुका |

**मतदार नोंदणी अधिकारी**
**कोकण विभाग शिक्षक मतदार संघ**

## नमुना - १९

नियम ३१ पहा

**भारत निवडणूक आयोग**

**शिक्षक मतदार संघासाठी मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठीचा दावा**

प्रति,
मतदार नोंदणी अधिकारी
———————— शिक्षक मतदार संघ

महोदय,
मी विनंती करतो/करते की, माझे नाव ............................ या (शिक्षक) मतदारसंघाच्या मतदार यादित समाविष्ट करण्यात यावे.

१ तपशील असे आहेत

पूर्ण नाव ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ लिंग ________

वडील/आई/पतीचे पूर्ण नाव ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

घरचा पत्ता (सर्वसाधारण निवासाचे ठिकाण)

| | |
|---|---|
| घर/इमारत/सदनिका क्रमांक | रस्ता/मोहल्ला |
| शहर/गाव | टपाल कार्यालय |
| पोलीस स्टेशन/तहसिल/तालुका/मौज | |
| जिल्हा | राज्य |

वय ☐ वर्ष ☐ महिने जन्मतारीख ☐☐/☐☐/☐☐☐☐

अपंगत्व असल्यास- श्रेणी (वैकल्पिक) (योग्य ठिकाणी खूण करा)

☐ दृष्टी दोष ☐ कर्ण व मुकबधीर ☐ लोकोमोटोर ☐ इतर

कोणत्याही विधानसभा मतदार संघासाठी मतदार म्हणून नोदणी झाली आहे काय
असल्यास खालील गोष्टी नमूद करा

(अ) विधानसभा मतदार संघाचा क्रमांक आणि नाव ____________

(ब) भाग/मतदान केंद्र क्रमांक (माहिती असल्यास)

(क) जन्मतारीख (दिनांक/महिना/वर्ष) ☐☐☐☐☐☐☐☐☐☐

(ड) मतदार ओळखपत्र (असल्यास) ☐☐☐☐☐☐☐☐☐☐

आधार तपशील (कृपया योग्य चौकोनात खूण करा)

(अ) ☐ आधार क्रमांक ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ किंवा

(ब) ☐ मी आधार क्रमांक देऊ शकत नाही कारण माझ्याकडे आधार क्रमांक नाही

संपर्क क्रमांक :-

मोबाईल क्रमांक (वैकल्पिक) ☐☐☐☐☐☐☐☐☐☐

दुरध्वनी क्रमांक ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

ई-मेल पत्ता (असल्यास) ____________

२. मागील सहा सहा वर्षात मी तीन वर्षांहून अधिक काळ शिक्षक म्हणून कार्यरत आहे. त्याचे तपशील खालीलप्रमाणे

| शैक्षणिक संस्थेचे नाव | पासून (तारीख) | पर्यंत (तारीख) | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |

या दाव्याच्या पुष्टयर्थ, मी पुढीलप्रमाणे सादर करीत आहे ..........................................

**३ * माझे नाव या किंवा अन्य कोणत्याही शिक्षक मतदार संघाच्या मतदार यादीत समाविष्ट नाही.**

किंवा

*** माझे नाव ....................... शिक्षक मतदार संघाच्या मतदार यादीमध्ये खालील नमुद पत्त्यावर समाविष्ट आहे आणि त्या मतदार यादीमधून ती नोंद वगळण्याची माझी विनंती आहे.**

**४ मी घोषित करतो की, मी भारताचा नागरिक आहे आणि वर दिलेले सर्व तपशील माझ्या समजुतीने आणि विश्वासानुसार बरोबर आहेत.**

**ठिकाण**

**तारीख** **दावेदाराची स्वाक्षरी**

**नोंद : कोणतेही व्यक्ती जी खोटे निवेदन किंवा घोषणापत्र करेल आणि ते त्या व्यक्तीस माहिती असेल किंवा खोटे असल्याचा विश्वास असेल किंवा खरेपणा बद्दल अविश्वास असेल अशी व्यक्ती लोकप्रतिनिधी अधिनियम, १९५० च्या कलम ३१ अन्वये शिक्षेस पात्र ठरेल.**

*** जो परिछेद लागू नसेल तो खोडा.**

— — — — — — — — — छिद्रण — — — — — — — — —

**केलेल्या कार्यवाहीची सूचना**

नमुना १९ द्वारे श्री./श्रीमती/कुमारी ..........................................पत्ता
.......................................... यांनी सादर केलेला अर्ज

(अ) स्वीकारण्यात आलेला आहे आणि श्री./श्रीमती/कुमारी .......................... यांची नाव नोंदणी .............. अनुक्रमांक .......................... भाग .................. येथे करण्यात आली आहे.

(ब) खालील कारणासाठी नाकारण्यात आलेला आहे ..........................................

**तारीख** ..........................................

**मतदार नोंदणी अधिकारी**
पत्ता ..........................................
..........................................
..........................................

— — — — — — — — — छिद्रण — — — — — — — — —

**अर्जाची पोचपावती**

श्री./श्रीमती/कुमारी * ..........................................
पत्ता * .......................................... यांचा नमुना १९ मधील अर्ज प्राप्त झाला आहे

**तारीख** ..........................................

**मतदार नोंदणी अधिकारी**
पत्ता ..........................................
..........................................
..........................................

* अर्जदाराने भरावयाचे

# शहरातील वाहतूक कोंडीवर आधी अभ्यास, नंतर उतारा

## नवनियुक्त आयुक्त अभिजित बांगर यांची ग्वाही



**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या आयुक्तपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्याच दिवशी अभिजित बांगर यांनी शहरातील वाहतूक कोंडीचा अभ्यास करण्याचा निर्णय घेतला आहे.

पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्याच दिवशी आव्हाने काय असतील हेसांगू शकत नाही, असे श्री. बांगर यांनी स्पष्ट केले. प्रत्येक शहरात आव्हाने असतात, परंतु आव्हाने आणि संधी यांची एकत्रीत सांगड घालून काम करणे गरजेचे आहे. मात्र शहराच्या दृष्टीने जी आव्हाने असतील ती सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. मुख्यमंत्री हे ठाण्याचे असल्याने आपल्याला त्यांच्यामुळे मदतच मिळणार आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत असल्याने त्यांच्याकरवी शहराच्या विकासासाठी शासनाकडून निधी मिळू शकतो, त्यांच्याकडे व्हिजन आहे, त्यांचे व्हिजन आपल्याला समजले तर निश्चितच शहराचा विकास करण्यात काहीच अडचणी येणार नाहीत, असेही श्री.बांगर यांनी स्पष्ट केले.

वाहतुकीची समस्या ही इतर शहरात देखील आहे, ठाण्यात देखील ती आहे. बॉटल नेक असल्याने काही ठिकाणी वाहतुक कोंडी होत आहे. मात्र त्यातून मार्ग काढण्यासाठी असे बॉटल नेक शोधून त्यावर टप्याटप्याने कसा मार्ग काढता येईल किंवा पर्याय शोधता येईल याचा अभ्यास केला जाणार आहे. देशातील कुठलीही सार्वजनिक वाहतुक व्यवस्था ही ना नफा ना तोटा या तत्वावर सुरु आहे. परंतु त्यातही लोकांना चांगली सेवा कशी दिली जाईल, दिवसाच्या ऑपरेशनमध्ये काही बदल केल्यास यातूनही मार्ग काढण्यात येणार आहे. इलेक्ट्रीक बस येणार असतील तर चांर्जींग स्टेशन उभारण्यासाठी हालचाली केल्या जातील. अनाधिकृत बांधकाम हे ठाण्यातही असू शकते, त्यावर अभ्यास करुन मार्ग काढला जाईल. वृक्ष लागवडीचा वेगळा प्रयोग ठाण्यातही करण्याचा प्रयत्न असेल असेही त्यांनी सांगितले.

शहरात छोटे छोटे पॉकेट हे अर्बन फॉरेस्ट म्हणून विकसित करणे अपेक्षित आहे. देशी प्रजातीच्या वृक्ष लागवड करणे अपेक्षित असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील महिला अधिकारी/कर्मचारी



जिओलाइफ डिजिटल टीम, मुलुंड



विहंग ग्रुप , ठाणे



ठाणे भारत सहकारी, मुख्य शाखा, ठाणे





छाया: रामसिंग

आमदार रवींद्र फाटक आणि जयश्री फाटक यांच्या मार्गदर्शनाखाली रघुनाथ नगर वागळे इस्टेट, ठाणे येथे संकल्प प्रतिष्ठानतर्फे भव्य दांडिया तसेच नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या आयोजनामध्ये सहभागी होण्यासाठी सिनेमा क्षेत्रातील कलाकार उपस्थिती दर्शवत आहेत. मराठी चित्रपट अभिनेते पुष्कर श्रोत्री, निर्माता हर्ष लिंबाची आदी मान्यवरांनी देवीचे दर्शन घेतले. यावेळी आमदार रवींद्र फाटक, माजी नगरसेविका जयश्री फाटक, मिनल संख्ये, दीपक वेतकर, राजेंद्र फाटक, श्री. व सौ. प्रणय फाटक आदी उपस्थित होते. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.



ठाणे महानगरपालिका,आस्थापना विभाग (वर्तकनगर/लोकमान्य प्रभाग समिती)



मनिषा एज्युकेशन ट्रस्टचे मनिषा विद्यालय व ज्यू कॉलेज शिक्षक वर्ग



जीएस महानगर बँक, भांडुप शाखा






श्री साई धाम आनंद संस्था काजूवाडी, ठाणे आयोजित नवरात्रीनिमित्त नवदुर्गा छायाचित्र स्पर्धेत उत्तम वेशभूषा योगिता शिंदे राहणार साईनाथ नगर, संजना रांगळे (एकल) राहणार रामचंद्र नगर-1 विजेते ठरले तर सूर्यतेज मित्र मंडळ ग्रुप अंबिका नगर-1 च्या मंगल चौधरी, संगीता सापकर, सुनिता गुप्ता, ज्योती गुप्ता, आरती दास, माधुरी जयस्वाल, मीरा शिंदे, लता सोलकर, कविता जाधव- कानस्कर हा गट विजेता ठरला.



# रसिकांच्या सहभागाने 'रासरंग' बहरला



**ठाणे :** क्रेडाई-एमसीएचआय ठाणे आणि आशर ग्रुपने जनसेवा प्रतिष्ठान आणि जीतो ठाणे चॅप्टर यांच्या सहकार्याने 'रासरंग-2022' या भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले असून हा उत्सव 5 ऑक्टोबरपर्यंत असेल.

'रासरंग'मध्ये ठामपाचे आयुक्त डॉ. विपिन शर्मा आणि त्यांच्या कुटुंबाने सहभाग घेतला. कार्यक्रमात शहीद भगतसिंग यांची जयंती राष्ट्रध्वज फडकवून साजरी करण्यात आली. मुख्यमंत्र्यांचा "स्वच्छ ठाणे-स्वच्छ महाराष्ट्र" हा संदेश देण्यात आला. कार्यक्रमात रॉकस्टार नैतिक नागडा यांच्यासह उमेश बारोट, कोशा पंड्या, दिव्या जोशी आणि अंबर देसाई हे गायकही कला सादर करत आहेत.

'रासरंग'मध्ये केवळ ठाणेकरच नव्हेत, तर मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशातील नागरिकही सहभागी झाले आहेत. या विकेंडला 'रासरंग'मध्ये भाविक आणि कलारसिक मोठ्या संख्येने सहभागी होईल, असा विश्वास एमसीएचआय-क्रेडाई ठाणे युनिटचे अध्यक्ष जितेंद्र मेहता यांनी व्यक्त केला.



भारत माता महिला मंडळ, खारीगाव

# पाण्यासाठी महिलांचा रस्त्यावरच ठिय्या

## खडेगोळवलीत पाणीटंचाईने नागरिक त्रस्त

**कल्याण :** कल्याण पूर्व भागातील खडेगोळवली परिसरात आज पाण्यासाठी महिलांनी अनोखे आंदोलन केले. महिलांनी थेट रस्त्यावरच बसून रास्ता रोको केला.

कल्याण ग्रामीणमध्ये भोपर, डोंबिवली पूर्व भागात दावडी आणि खडे गोळवली परिसराला लागून असलेल्या माणोरे पारिसरात मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईचा सामना नागरीकांना करावा लागतो. त्याचप्रमाणे नांदिवली सागाव या ठिकाणीही पाणी टंचाईची समस्या आहे. याबाबत महिलांकडून अनेकदा आंदोलन करण्यात आले. काही दिवसांपूर्वी कल्याण पूर्व भागातील टाटा नाकानजीक देशमुख होम्समधील नागरीकांनी पाण्यासाठी रास्ता रोको केला होता. आत्ता कल्याण पूर्व भागातील खडेगोळवली परिसरातील 9 आय प्रभाग कार्यालयासमोर महिलांनी रस्त्यावर बसून रास्ता रोको केला.

या ठिकाणी अनेक दिवसापासून पाणी टंचाई आहे. टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात होता. तोही बंद करण्यात आला आहे. पाणी टंचाईच्या मुद्यावर नागरीक सातत्याने आंदोलने करीत आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधीची पाणी प्रश्नाविषयीची उदासीनता पाहता पाणी टंचाई दूर होईल असे वाटत नाही.



आर्चीनोवा डिझाईन इंक, ठाणे कर्मचारीवर्ग







मुंब्रा येथील राहत्या घरी आयोजित नवरात्रोत्सवात देवीचे दर्शन घेताना ज्येष्ठ माजी नगरसेवक राजन केणी, ज्येष्ठ माजी नगरसेविका अनिता केणी आणि करण केणी. सोबत परिवारातील इतर सदस्य आणि विभागातील महिला छाया: रामसिंग

# अर्थवार्ता

सध्या राखीव साठा करण्यासाठी फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया केंद्र सरकारच्या वतीने अन्नधान्याची खरेदी करते. लवकच खासगी कंपन्या आणि राज्य सरकारच्या संस्था हे काम सुरू करतील असे केंद्रीय अन्न सचिव सुधांशू पांडे यांनी सांगितले. यासंदर्भात राज्य सरकार बरोबर अगोदरच पत्र व्यवहार सुरू झाला असल्याचे ते म्हणाले. राज्य सरकारच्या संस्थांकडून धान्य खरेदी झाल्यानंतर अधिक समन्वयाने काम होईल अशी यामागे भूमिका आहे. त्याचबरोबर खासगी कंपन्यांनी सरकारसाठी धान्य खरेदी केल्यानंतर या क्षेत्रात कार्यक्षमता वाढेल असे केंद्र सरकारला वाटते. आपण आंतरराष्ट्रीय धान्य परिषदेत नुकताच सहभाग घेतला होता. त्यावेळी अनेक देशांमध्ये सरकारच्या वतीने खासगी कंपन्या धान्याची खरेदी करीत आहेत आणि त्यामध्ये बरीच कार्यक्षमता असल्याचे आपल्याला आढळून आले. जर खासगी कंपन्यांनी कमी खर्चात कार्यक्षमरित्या धान्य खरेदी केली तर त्याला आमची काही हरकत नाही. पुढील हंगामापासून हे काम सुरू होणार असल्याचे संकेत त्यांनी दिले.





**गेल्या काही काळापासून गुंतवणुकदारांचा पॅसिव्ह फंडकडे ओढा वाढला आहे. असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड इंडिया (एएमएफआय)ने जारी केलेले आकडेवारी पाहता पॅसिव्ह फंडाबाबत उत्सुकता वाढली आहे. इंडेक्स फंड, इटीएफ फंड आणि फंड ऑफ फंड याचे लाभ कसे असतात आणि त्यात कोण गुंतवणूक करू शकतो, असे काहींना प्रश्न पडत आहे. पॅसिव्ह फंड हे कमी गुंतवणूकीत हे जादा परतावा देऊ शकतात का? असाही सवाल निर्माण होत आहे.**

## पॅसिव्ह फंड म्हणजे काय?

गेले पॅसिव्ह फंड हे प्रत्यक्षात म्युच्युअल फंडचाच एक प्रकार आहे. या फंडात निफ्टी, निर्देशांक आदी इंडेक्सचे प्रतिबिंब असते. शेअर बाजार ३०, निफ्टी ५० मध्ये फंडाच्या क्षमतेनुसार गुंतवणूक होते. पॅसिव्ह फंडमध्ये मॅनेजर सक्रिय नसतो. परिणामी व्यवस्थापनाचे शुल्क कमी असते आणि खर्चही आपसूक कमी राहतो.

**इंडेक्स फंड म्हणजे काय?**

- मार्केट इंडेक्समध्ये सामील असलेल्या कंपन्यांच्या शेअरमध्ये गुंतवणूक
- निफ्टी ५०, शेअर बाजार ३० मध्ये असलेल्या कंपन्यांत गुंतवणूक
- पॅसिव्ह फंडची कामगिरी इंडेक्स फंडसारखीच असते.
- इंडेक्सची चांगली कामगिरी राहिल्यास फंड चांगला परतावा देऊ शकतो.

**इंडेक्स फंडचा लाभ**

- टोटल एक्स्पेंन्स रेशो कमी
- पोर्टफोलिओत वैविध्यपणा आणण्याची संधी
- इंडेक्स फंड हे पॅसिव्हली मॅनेज्ड असतात.
- फंड मॅनेजरची कोणतीही भूमिका नसते.
- इंडेक्स फंडवर खर्च कमी येतो.
- टोटल एक्स्पेंन्स रेश्यो खूपच कमी असतो.
- निफ्टी ५० फंडचा एक्स्पेंन्स रेशो ०.३ ते ०.५ टक्के आहे.
- निफ्टी नेक्स्ट ५० फंडचा एक्स्पेन्स रेशो ०.७ ते १ टक्के आहे.

**ट्रॅकिंग एरर**

इंडेक्स आणि पॅसिव्ह फंडच्या कामगिरीत किरकोळ फरक राहू शकतो. या फरकाला ट्रॅकिंग एरर असे म्हणतात. हा फरक एक्स्पेंन्स रेशो, कॅश होल्डिंगच्या बदलामुळे येतो. कमी फरकाचा फंड हा बेंचमार्क इंडेक्सच्या आधारावर परतावा देतात. ट्रॅकिंग एरर ०.१ ते २ टक्के दरम्यान राहतो.

**ईटीएफ म्हणजे काय?**

- ईटीएफ म्हणजे एक्स्चेंड ट्रेडेड फंड्स.
- ईटीएफमध्ये अनेक प्रकारच्या सिक्यूरिटीज असतात.
- ईटीएफचा परतावा इंडेक्ससारखा असतो.
- शेअर बाजारात लिस्टेड होतो. खरेदी आणि विक्री होते.

**ईटीएफचे फायदे**

- इंडेक्समध्ये अधिक तेजी राहिल्यास तेवढाच फायदा मिळतो.
- ईटीएफमध्ये गुंतवणूक करणे कमी खर्चाचे
- जोखमीत वैविध्यपणा राहतो.
- कर आकारणी ही अन्य शेअरवरील गुंतवणुकीप्रमाणे होते.

**इंडेक्स फंड विरुद्ध इटीएफ**

- इंडेक्स फंड हा ओपन एंडेड फंडप्रमाणे खरेदी करता येते आणि विकताही येतात.
- ईटीएफ हे स्टॉकप्रमाणे ट्रेड करता येते.
- ईटीएफमध्ये इंडेक्स फंडच्या तुलनेत कमी खर्च
- इंडेक्स फंडमध्ये एसआयपी, एसडब्ल्यूपी, एसटीपी करू शकता.
- ईटीएफमध्ये ट्रेडेड प्राईस हे एनएव्हीपेक्षा वेगळे असतात.

**किती प्रकारचे इंडेक्स फंड?**

- निफ्टी ५० इंडेक्स फंड, बीएसई नेक्स्ट इंडेक्स फंड, निफ्टी नेक्स्ट ५० इंडेक्स फंड, निफ्टी १५० मिड कॅप इंडेक्स फंड, निफ्टी एनएव्ही २० इंडेक्स फंड, निफ्टी २०० मोमेंटम २० इंडेक्स फंड, निफ्टी १०० क्वालिटी ३० इंडेक्स फंड, निफ्टी १०० लो वॉल्यूम ३० इंडेक्स फंड, निफ्टी अल्फा लो व्हीओआय इंडेक्स फंड,

**ॲक्टिव्ह विरुद्ध पॅसिव्ह म्युच्युअल फंड**

- ॲक्टिव्ह फंडाचे ध्येय हे मार्केट इंडेक्सपेक्षा चांगला परतावा मिळून देणे.
- पॅसिव्ह फंडची गुंतवणूक ही मार्केट इंडेक्सच्या हिशोबानुसार.
- पॅसिव्ह फंडमध्ये ॲक्टिव्हच्या तुलनेत रिसर्चवर अधिक खर्च.
- ॲक्टिव्ह फंडमध्ये पॅसिव्हच्या तुलनेत जादा जोखीम ●●●

## पेन्शन योजनेत गुंतवणूक करताय?

निवृत्तीनंतर पेन्शन मिळण्यासाठी सरकारने अटल पेन्शन योजना सुरू केली. ही योजना २०१५ मध्ये सुरवात करण्यात आली. १८ ते ४० वयोगटातील नागरिक या योजनेसाठी पात्र आहेत. अटल पेन्शन योजनेनुसार किमान वीस वर्षे गुंतवणूक करावी लागते. ६० वर्ष पूर्ण झाल्यानंतर गुंतवणुकीनुसार दरमहा एक हजार रुपयांपासून ते पाच हजार रुपयांपर्यंत पेन्शन मिळते.

- अटल पेन्शन योजना ही लाभार्थ्यासाठी उपयुक्त असली तरी त्याचा कोणत्या ना कोणत्या कारणाने अकाली म्हणजेच निवृत्त होण्याच्या आतच मृत्यू झाला तर त्याच्या गुंतवणुकीचे काय होते? असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. ही रक्कम त्याच्या मृत्यूनंतर नातेवाईकांना, वारसदारांना पेन्शनच्या रुपातून मिळते का?. या प्रश्नाचे निराकरण करू या.
- **जोडीदारास मिळते पेन्शन:** अटल पेन्शन योजनेनुसार ६० वर्ष पूर्ण होण्याच्या आत एखाद्या अर्जदाराचा मृत्यू आजारपण, अपघाताने झाला असेल तर त्याची गुंतवणूक वाया जाणार नाही. अशावेळी त्याच्या जोडीदाराला आयुष्यभर पेन्शनचा लाभ दिला जातो. अर्जदाराचा जोडीदार देखील हयात नसेल तर त्याच्या वारसदाराला एक रक्कमी रक्कम दिली जाईल आणि ती १.७० लाखांपासून ८ लाखांपर्यंत असू शकते.
- **वयाच्या ६० वर्षाच्या अगोदर पैसे काढायचे झाल्यास:** सर्वसाधारणपणे अटल पेन्शन योजनेतंर्गत ६० वर्षाच्या अगोदर अर्जदाराला पैसे काढण्याची मूभा नाही. परंतु अर्जदार एखाद्या गंभीर आजाराचा सामना करत असेल, त्याच्या उपचारासाठी जमा केलेली रक्कम काढू इच्छित असेल तसेच तो पुढे गुंतवणूक सुरू ठेऊ शकत नसेल तर अशावेळी तो योजनेतून पैसे काढून घेऊ शकतो. पण त्याला जमा झालेल्या रक्कमेवर व्याज मिळणार नाही.
- **असा करा**

**अर्ज :** आपल्याला अटल पेन्शन योजनेसाठी अर्ज करायचा असेल तर सर्वात मोठी अट म्हणजे आपले वय १८ ते ४० दरम्यान असावे. अटल पेन्शनसाठी कोणत्याही बँकेत बचत खाते सुरू शकता. आपले अगोदरच बचत खाते असेल तर संबंधित बँकेतून योजनेचा अर्ज मिळू शकेल. अर्जावर नाव, वय, मोबाईल नंबर, बँक खाते क्रमांक आदींची अचूक माहिती




भरा. आवश्यक कागदपत्रे त्यास जोडा. त्यानंतर बँकेत अर्ज द्या. या कागदपत्रांची बँकेकडून छाननी केली जाईल आणि अटल पेन्शन योजनेतंर्गत खाते सुरू होईल. अटल पेन्शन योजनेत ऑनलाइन योगदान भरण्याची सुविधा आता उपलब्ध करून देण्यात आली आहे.

●●●

## डेथ इन्शुरन्स क्लेम करताना...

आपण एखाद्या पॉलिसीधारकाचे नॉमिनी असाल किंवा आपण स्वत: पॉलिसीधारक असाल आणि कुटुंबातील कोणत्याही सदस्याला नॉमिनी केले असेल तर आपल्याला किंवा आपल्या वारसदाराला इन्शूरन्स क्लेमची प्रक्रिया ठाऊक असायला हवी. पॉलिसीधारकाच्या निधनानंतर त्याचा वारसदार पॉलिसी फंडसाठी दावा करू शकतो. यासाठी एलआयसीला वारसदाराकडून काही कागदपत्रांची गरज भासते. यासाठी नियम आणि कायदे देखील आहेत.

महत्त्वाच्या गोष्टी: सर्वात महत्त्वाचे म्हणजे डेथ इन्शूरन्स क्लेम हा ऑफलाइन करावा लागेल. त्याची संपूर्ण प्रक्रिया ऑफलाइनच होते. याशिवाय पॉलिसीधारकाचा विमा एजंट किंवा डेवलपमेंट ऑफिसरची स्वाक्षरी लागते.

**कोणत्या कागदपत्रांची गरज?**

- विमाधारकाचे मूळ मृत्यू प्रमाणपत्र
- पॉलिसीचे मूळ कागदपत्र, बाँड
- वारसदाराचे पॅनकार्ड आणि आयडी




प्रुफ

- डेथ इन्शुरन्स क्लेम फॉर्मवर विमाधारकाच्या विमा एजंटची किंवा विकास अधिकाऱ्याची सही.
- वारसदाराचा कॅन्सल चेकची कॉपी किंवा बँक पासबुकची कॉपी जमा करावी लागेल. नाव, खाते क्रमांक आणि आयएफएससी कोडचे विवरण भरावे लागेल.

**दावा कसा दाखल करावा?**

- विमा दावा करण्यासाठी नॉमिनीला सर्वप्रथम होम ब्रँचमध्ये जावे लागेल. त्या ब्रँचला पॉलिसीधारकाच्या मृत्यूची माहिती द्यावी लागेल. तेथे अर्ज क्रमांक ३७८३, अर्ज क्रमांक ३८०१ आणि एनईएफटीचा अर्ज भरण्यास सांगितला जाईल. एनईएफटी अर्जात बँकेचे विवरण अचूक भरावे लागेल. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या खात्यात एलआयसी फंड ट्रान्सफर करेल.
- पॉलिसीधारकाचे मूळ मृत्यू प्रमाणपत्र, पॉलिसी बाँड, वारसदाराचे पॅन कार्ड, आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, वाहन परवाना किंवा पासपोर्ट आणि पॉलिसीधारकाचे कोणतेही मूळ ओळखपत्र जमा करावे लागेल. ही सर्व कागदपत्रे सेल्फ असेस्टेड असणे आवश्यक आहेत.
- अर्ज आणि कागदपत्रांसह एक इंटिमेशन लेटर देखील द्यावे लागेल. हे कव्हर लेटर असेल. त्यात विमाधारकाचा मृत्यू कोठे झाला आदींचा उल्लेख करावा लागतो.
- एनईएफटी अर्जाबरोबरच नॉमिनीला कॅन्सल चेक, पासबूक जमा करावे लागेल. पासबुकची झेरॉक्स दिली नाही तर आपले कागदपत्रे नामंजूर होतील.
- कागदपत्रांच्या सत्यप्रती अर्जाला जोडावे लागेल.

शाखेत दाव्याची प्रक्रिया करत असताना वारसदाराला मूळ कागदपत्रे सोबत बाळगावी लागतील. कारण शाखाअधिकारी मूळ कागदपत्राच्या आधारे वरीष्ठांना मेल करू शकतात. म्हणून ऐनवेळी ते कोणत्याही कागदपत्रांची विचारणा करू शकतात. एकुणातच आपण सर्व तयारीनिशी शाखेत जायला हवे.

- कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर एक्नॉलेजमेंट स्लिप दिली जाईल. ती व्यवस्थित ठेवा.
- संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महिन्याच्या आत वारसदाराच्या खात्यात पॉलिसीचे पैसे जमा होऊ शकतात. पैसे मिळण्यास विलंब होत असेल तर शाखेत त्यासंबंधीची चौकशी करा. ●●●

**श्रीमंत व्हायचे असेल तर गुंतवणुकीसाठी दीर्घकाळाचा विचार केला पाहिजे. अल्पकाळासाठी केलेला विचार हा आर्थिक अडचणीत आणणारा ठरू शकतो किंवा अपेक्षित परतावा मिळत नाही. म्हणूनच बेन्जामिन ग्रॅहम, वॉरेन बफे, जोएल ग्रीनब्लॅट सारख्या दिग्गज गुंतवणूकदारांनी दीर्घकाळात भांडवल उभारणीसाठी व्हॅल्यू इन्व्हेस्टिंगच्या पद्धतीचे समर्थन केले आहे. व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग म्हणजे काय, यात गुंतवणूक कशी करावी, याबाबत जाणून घेऊ.**

## दीर्घकाळासाठी भांडवल उभारणी करताना...

गुंतवणुकीसंदर्भात मागदर्शन करणारे 'मॉर्निंगस्टार इंडिया'चे कौस्तुभ बेलापूरकर यांच्या मते, व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग म्हणजे वास्तविक मूल्यांपेक्षा कमी किंमतीत बाजार करणाऱ्या स्टॉकचा शोध घेणे. याचाच अर्थ असा की, कंपनीची चांगली असल्याने त्याचे भाव उच्चांकीवर असणे गरजेचे असते, परंतु राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय बाजाराच्या परिणामामुळे त्याचा व्यवहार त्याच्यापेक्षा कमी मूल्यावर होत असतो. अशा शेअरमध्ये दीर्घकाळासाठी पैसे गुंतवल्यास दमदार परतावा मिळण्याची शक्यता अधिक राहते. यासाठी म्युच्युअल फंड हा एक उत्तम मार्ग आहे. म्युच्युअल फंडची निवड करताना गुंतवणूकदारांनी असेट मॅनेजमेंट कपंनी, व्यक्तिगत फंडची कामगिरी तसेच गुंतवणूकीच्या पद्धतीचे आकलन करायला हवे. या आधारे अन्य फंडच्या तुलनेत स्टॉकची कामगिरी कशी राहिल, हे समजणे सोपे जाते. अर्थात ही बाब सहजासहजी लक्षात येत नाही. कारण उद्योगविश्वातून 'व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग'सारख्या शब्दांचा खूपच कमी होतो. चाणाक्ष गुंतवणूकदार भारताच्या विकासावर विश्वास ठेवत असून व्हॅल्यू इन्व्हेस्टिंगमध्ये गुंतवणूक करत आहेत. तरीही परकी गुंतवणूकदारांच्या तुलनेत भारतीय गुंतवणूकदार व्हॅल्यू इन्व्हेस्टिंगबाबत फार जाणून नाहीत.

**अनेक फंड व्हॅल्यू इन्व्हेस्टिंगमध्ये सामील**

'मॉर्निंगस्टार इंडिया'च्या विश्लेषणानुसार २०१८ नंतर अनेक फंडांचे व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग श्रेणीत सामील करण्यात आले आहे. मात्र त्यांच्या पोर्टफोलिओमधील ग्रोथ स्टॉक होल्डिंग्समध्ये घसरण दिसत आहेत. अर्थात व्हॅल्यू स्टॉकमध्ये किरकोळ वाढ पाहवयास मिळते. अनेक तथाकथित व्हॅल्यू फंड हे 'रिलेटिव्ह व्हॅल्यू अप्रोच'चे पालन करतात. आयसीआयसीआय प्रुडेंशियल ॲसेट मॅनेजमेंटचे मुख्य गुंतवणूक अधिकारी एस. नरेन हे भारतीय म्युच्युअल फंड उद्योगात सर्वाधिक अनुभवी व्यवस्थापकांपैकी एक आहेत. अलिकडच्या काळात त्यांनी आपल्या व्यवस्थापन कौशल्य आणि निधीच्या आधारावर चांगला ट्रॅक रेकॉर्ड तयार केला आहे. गुंतवणूकीच्या व्हॅल्यू स्टाईलचे ते प्रॅक्टिशनर असल्याने फंडची रणनिती त्यांना त्यांच्या



क्षमतेनुसार खेळण्याची परवानगी देते. या अनुभवाचा गुंतवणूकदारांना लाभ मिळत आहे.

**गुंतवणूकदारांना जबरदस्त फायदा**

व्हॅल्यू रिसर्चनुसार व्हॅल्यू इन्व्हेस्टिंगमध्ये चांगल्या फंड हाऊसने दमदार परतावा दिला आहे. उदा. आयप्रुचे व्हॅल्यू फंडचा असेट अंडर मॅनेजमेंट (एयूएम) २४,६९४ कोटी रुपये आहे. व्हॅल्यू श्रेणीत हे मूल्य एकूण एयूएमच्या सुमारे ३० टक्के आहे. या योजनेत व्हॅल्यू इन्व्हेस्टिंगबाबतचा गुंतवणूकदारांचा विश्वास लक्षात येतो. एखाद्या गुंतवणूकदाराने २००४ मध्ये एक रक्कमी दहा लाख रुपये गुंतवले असेल तर त्याची किंमत ३१ जुलै रोजी अडीच कोटी रुपये झाली आहे. म्हणजेच त्याला १९.७ टक्क्याचा परतावा मिळाला आहे.

**निफ्टीत केवळ १५.६ टक्के परतावा**

निफ्टी-५० मध्ये अशा प्रकारची गुंतवणूक केल्यास १५.६ टक्क्यांचा सीएजीआर मिळतो आणि त्याची एकूण रक्कम १.३ कोटी रुपये होते. त्यामुळे निफ्टीतील परतावा कमी राहिला आहे. व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग श्रेणी ही दीर्घकाळासाठी उपयुक्त असल्याने एसआयपी हा एक चांगला मार्ग आहे. फंड स्थापनेनंतर एसआयपीने दरवर्षी सरासरी १७.३ टक्के परतावा दिला आहे. त्यामुळे एसआयपीच्या माध्यमातून गुंतवणूक करणाऱ्यांसाठी हा एक दमदार पर्याय आहे.

**गुंतवणूक समजून घेण्याची गरज**

म्युच्युअल फंडची निवड करताना गुंतणूकदारांनी फंड कंपनी आणि व्यक्तिगत फंडचा पोर्टफोलिओ पाहणे आणि समजून घेणे गरजेचे आहे. भारतातील बहुतांश फंड हाऊस इक्विटी फंड विकासावर आधारित आहेत. जगातील नामांकित गुंतवणूकदार हे व्हॅल्यू इन्व्हेस्टिंगचा सल्ला देत आहेत. अशावेळी भारतीय गुंतवणूकदारांनी त्याचा लाभ उचलला पाहिजे, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. ●●●

## मुलांचे आधारकार्ड काढायचंय?

आजच्या काळात आधार कार्ड केवळ मोठ्यांचे नाही तर लहान मुलांसाठी देखील महत्त्वाचे कागदपत्र ठरत आहे. आधारकार्डशिवाय आज कोणतेच व्यवहार होत नाहीत. मुलांशी निगडीत महत्त्वाची कामे पार पाडण्यसाठी आधार आवश्यक आहे. आधार कार्डशिवाय पाल्य एखाद्या सरकारी योजनेचा लाभ घेऊ शकत नाही. शाळेत प्रवेशासाठी देखील मुलांकडे आधार कार्ड असणे गरजेचे आहे. आधार कार्डचे महत्त्व आणि गरज पाहता 'यूआयडीएआय'ने नवजात बालकासाठी आधार कार्ड जारी करण्यास सुरवात केली आहे. लहान मुलाचे आधार कार्ड कसे काढावे आणि त्यास कोणत्या कागदपत्रांची गरज भासते, हे जाणून घेऊ.

**आधार केंद्र किंवा अंगणवाडीतही आधार कार्ड**

देशात अनेक रुग्णालयात मुलांचा जन्म होतो. त्यांचे आधार कार्ड काढण्याची सुविधा आता सर्वत्र उपलब्ध झाली आहे. याशिवाय मुलांचे आधार कार्ड हे जवळचे आधार केंद्र किंवा अंगणवाडी केंद्रातही काढता येऊ शकते. मुलांचे आधार कार्ड काढण्यासाठी आपल्याला आधार एनरोलमेंट फॉर्म भरावा लागेल आणि त्यानुसार सर्व माहिती भरावी लागेल. अर्जाबरोबर काही कागदपत्रांची झेरॉक्सही जोडावी लागेल.

**प्रक्रिया कोणती?**

भरलेला अर्ज काऊंटरवर बसलेल्या कर्मचाऱ्याला द्या. त्यानंतर संबंधित कर्मचारी हा आपल्या मुलाचे आधार कार्ड तयार करण्यासाठी एनरोलमेंटची प्रक्रिया सुरू करेल. पाल्याचे नाव, वडिलांचे नाव, घराचा पत्ता, जन्मतारीख, लिंग आदी भरल्यानंतर आणि सर्वांची पडताळणी झाल्यानंतर कर्मचारी हा पाल्याचा फोटो काढेल. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर एकनॉलेजमेंट स्लिप दिली जाईल. ही स्लिप सांभाळून ठेवा. कारण याच एनरोलमेंट नंबरने आपण आधार कार्डचे ऑनलाइन



स्टेट्स पाहू शकता आणि डाऊनलोड करू शकता.

**कोणत्या कागदपत्रांची गरज?**

मुलांचे आधारकार्ड तयार करण्यासाठी आपल्याला विशेष कागदपत्रांची गरज भासत नाही. मुलाचे आधार कार्ड काढण्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा रुग्णालयातील डिस्चार्ज पेपर असणे गरजेचे आहे. त्याचबरोबर पालकांपैकी एकाचे आधार असणे गरजेचे आहे. पाच वर्षापेक्षा कमी वयोगटातील मुलांच्या आधारकार्डला 'बाल आधार' असे म्हटले जाते आणि ते फिकट निळ्या रंगाचे असते. ◆◆◆

## चांदीत गुंतवणुकीची संधी

चांदीची किंमत सध्या दोन वर्षाच्या निचांकी पातळीवर आहे. त्यामुळे चांदीत गुंतवणूक करण्याची नामी संधी नागरिकांना मिळत आहे. आयआयएफएल सिक्यूरिटीजचे अनुज गुप्ता म्हणतात, की सध्या चांदी आणि सोने खरेदीसाठी चांगले वातावरण आहे. डॉलरच्या निर्देशांकात जसजसी घसरण होईल, तसतशी दोन्ही धातूत उसळी पाहवयास मिळेल. अमेरिकी केंद्रीय बँक फेडरल रिझर्व्हने कडक भूमिका घेतल्याने डॉलरचा निर्देशांक हा सामान्य पातळीपासून ९० वरून ११०.७८ वर पोचला आहे. हा निर्देशांक दोन दशकांच्या उच्चांकी पातळीवर आहे.

सध्या डॉलरमध्ये तेजी आहे. तसेच जागतिक मंदीची शक्यता आणि खाद्य महागाई उच्च पातळीवर पोचल्याने गुंतवणूकदारांनी हात आखडता घेतला आहे. त्यामुळे धातूतील गुंतवणूकीचे प्रमाण कमी राहात आहे. त्याचबरोबर जगात चांदीचा सर्वाधिक खरेदीदार असलेल्या चीनमध्ये मागणी घटली आहे. चीनमध्ये अनेक भागात कोरोनाचे सावट असल्याने उद्योगधंद्यांना सारखे लॉकडाउनला सामोरे जावे लागत आहे.



परिणामी चांदीच्या किंमतीत घसरण सुरू आहे. गुंतवणूकदारांसाठी ही एक चांगली संधी आहे. या स्थितीत सुधारणा झाल्यास आणि मागणी वाढल्यास चांदी एक दीड वर्षात चांगला परतावा देऊ शकते.

**चांदीची सध्या खरेदी कशासाठी?**

खाद्यान्नातील महागाई दर कमी होत आहे. त्यामुळे लोकांची गुंतवणूकीबाबत सकारात्मक भूमिका राहू शकते.

इक्विटी बाजारात व्हॅल्यूएशन सध्या उच्च पातळीवर आहे. आगामी काळात घसरणीच्या शक्यतेने गुंतवणूकदार सोने आणि चांदी खरेदीचा विचार करतील.

कच्च्या तेलाच्या तेजीने जगभरात ऊर्जा संकटाचे वातावरण आहे. या संकटातून बाहेर पडण्यासाठी सोलर पॅनल आणि ऊर्जेच्या अन्य स्रोतांवर सरकार लक्ष देत आहे. सोलर पॅनलच्या निर्मीतीत चांदीचा देखील वापर होतो.

इलेक्ट्रिक वाहनांची मागणी वाढत चालली आहे. देशात फाईव्ह जीच्या लॉचिंगची जोरात तयारी सुरु आहे. त्यामुळे वाहन आणि दूरसंचार उद्योगात चांदीची मागणी वाढेल.

कोरोना काळात लागू केलेले लॉकडाउन जगातील बहुतांश देशात आणि आपल्याकडेही संपल्याने औद्योगिक कारणासाठी चांदीला मागणी वाढेल. चीनमध्ये देखील चांदीला मागणी पुन्हा येऊ शकते. म्हणून येत्या काळात चांदीच्या किंमतीत वाढ होईल.

तज्ज्ञांच्या मते, सोने आणि चांदीत गुंतवणूक करताना गोल्ड सिल्वर रेश्योकडे देखील लक्ष द्यायला हवे. कोरोना काळात २०२० मध्ये हा रेश्यो १२४ च्या उच्च पातळीवर पोचला होता. सध्या हा रेश्यो ९३-९४ च्या आसपास आहे. १५-२० वर्षात हा रेश्यो कधीही ७०च्या वर टिकला नाही. सध्याच्या काळात ९३-९४ वरून ७० वर आला तर गुंतवणूकदारांना चांगला फायदा मिळू शकतो. गोल्ड आणि सिल्व्हर रेश्यो अधिक असण्याचा अर्थ सोन्यात तेजी आणि चांदीत घसरण. हा रेश्यो जसजसा कमी होतो, तसतशी चांदीत तेजी येते.

**बहुपयोगी चांदी लाभदायी**

चांदी ही अशी कमोडिटी आहे की ती औद्योगिक धातू म्हणूनही वापरण्यात येते. जागतिक बाजारातील तरलता निश्चित करण्यासाठी या धातूला महत्त्व आहे. याशिवाय अनेक उद्योगात चांदीचा वापर होत असल्याने फंड मॅनेजर देखील चांदीत गुंतवणूक करण्याचा सल्ला देतात.

सध्या विविध देशात महागाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी विकसित अर्थव्यवस्था या कडक धोरण अमलात आणत आहेत. हेच धोरण पुढे सुरू राहिले तर ६-९ महिन्यांत मंदी येऊ शकते. अशा स्थितीत बहुमूल्य धातूत नवीन गुंतवणूकीचा ओघ वाढेल आणि परिणामी किमतीही वधारतील. ◆◆◆

# योग्य वेळी योग्य उत्तर दिले जाईल

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा उद्धव ठाकरे यांना इशारा



**ठाणे:** बाळासाहेबांची भूमिका, त्यांचे विचार कोणी खंडीत केले, त्यांच्या विचारांबरोबर प्रतारणा कोणी केली, सत्तेसाठी तडजोड कोणी केली हे मला सांगण्याची आवश्यकता आहे का?, बाळासाहेबांचे विचार आम्ही पुढे घेऊन जात आहोत आणि म्हणूनच राज्यातील प्रत्येक घटक हा आमच्या भूमिकेला समर्थन देत असल्याचे मत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. मात्र योग्य वेळी उत्तर दिले जाईल असा इशाराही त्यांनी उध्दव ठाकरे यांना दिला.

ठाण्यात गुरुवारी उध्दव ठाकरे गटाच्या महिला आघाडीने टेंभी नाका येथील देवीची महाआरती करुन शक्तीप्रदर्शन केले असतांनाच शुक्रवारी दुपारी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुटुंबासह देवीची विधिवत पूजा आणि महाआरती केली. यावेळी महाराष्ट्रातील जनतेला सुखी ठेव. त्यांचे आरोग्य चांगले राहावे अशी प्रार्थना त्यांनी यावेळी केली.

आनंद दिघे यांनी सुरु केलेला हा उत्सव आहे. या उत्सवाला वेगळी ओळख आहे. देवीची सेवा करीत करीत मी या पदापर्यंत पोहोचलो आहे. देवीचा आशिर्वाद सर्वांवर आहे, तो राज्यातील जनतेवरही राहावा. राज्यातील संकट, अरिष्ट, रोगराई, दुःख दूर व्हावे, त्यांच्या जीवनात सुख, समृध्दी, समाधान आरोग्य लाभू दे आणि या राज्याला सुजलाम सुफलाम होऊ दे अशी आई जगदंबे चरणी प्रार्थना केली असल्याचेही त्यांनी सांगितले.

रश्मी ठाकरे यांनी केलेल्या शक्तीप्रदर्शनावर त्यांना विचारले असता, ही शक्तीप्रदर्शनाची जागा नाही, ही मनोभावे पूजा करण्याची जागा असल्याचे त्यांनी सांगितले. टेंभीनाक्याचा हा उत्सव आहे, तो अखंडीतपणे पुढे नेण्याचे काम मी शिवसैनिक म्हणून करीत आहे.



## माझे डॉक्टर

**डॉ. योगेश गोडगे**
न्यूरॉलॉजिस्ट
ज्युपिटर हॉस्पिटल

**एपिलेप्सीचे मूल्यांकन आणि व्यवस्थापन कसे केले जाते?**

- खालील पावले उचलणे आवश्यक आहे:

1. जन्म/टप्पे यांचे सूक्ष्म दस्तऐवजीकरण आणि बालपणीचे आजार, तापाचे दौरे, कौटुंबिक इतिहास आणि पालकत्व, सर्वांचे अचूक वर्णन फेफरे दरम्यान आणि दरम्यानच्या घटना/लक्षणे रुग्ण आणि प्रत्यक्षदर्शी दोघांची मुलाखत घेणे, संपूर्ण वैद्यकीय पार्श्वभूमी. (सर्वोत्तम केले न्यूरोलॉजिस्ट)
2. सह रुग्णाची पूर्ण शारीरिक तपासणी तपशीलवार न्यूरोलॉजिकल आणि हृदय तपासणी, जन्मजात दोष शोधणे जसे की त्वचेचा रंग खराब होतो किंवा स्पॉट्स/कंकाल/मणक्यातील विकृती, कमी संच केशरचना इ. (एक न्यूरोलॉजिस्टद्वारे सर्वोत्तम)
3. एपिलेप्सी साठी वर्क-अप: उच्च रिझोल्यूशन एपिलेप्सी प्रोटोकॉल

**या प्रश्न-उत्तरांच्या विषयाला अनुसरून आपणास काही प्रश्न विचारायचे असतील तर त्यासाठी संपर्क**
**majhedoctor@gmail.com**
**7045550171**

एमआरआय ब्रेन, ईईजी किंवा व्हिडिओ ईईजी, मेटाबॉलिक प्रोफाइल, नियमित रक्त चाचण्या, 2D-इकोकार्डियोग्राफी पहिल्या काही चाचण्या आहेत. पुढील चाचण्या नियोजित आहेतच्या क्लिनिकल भिन्नता आणि परिणामांवर आधारित पूर्वीच्या चाचण्या. (एपिलेप्सी सेंटरमध्ये सर्वोत्तम)
4. रुग्णाचे न्यूरोसायकोलॉजिकल मूल्यांकन.
5. रुग्ण आणि कुटुंब/ जोडीदार समुपदेशन, चर्चा विविध उपचार पर्याय आणि त्यांच्याबद्दल परिणाम, दीर्घकालीन दुष्परिणाम. तसेच ओळख आणि ट्रिगर्स टाळणे ज्यामुळे सहसा दौरे होतात (एक न्यूरोलॉजिस्टद्वारे सर्वोत्तम केले जाते)
6. प्राथमिक चिकित्सक/ न्यूरोलॉजिस्टसह नियमित फॉलोअप जप्ती नियंत्रणावर आधारित.
7. चक्कर आल्यास एपिलेप्सी शस्त्रक्रियेसाठी मूल्यांकन नियंत्रण अपुरे.

**शस्त्रक्रियेने एपिलेप्सी नियंत्रित करता येते का? एखाद्याने शस्त्रक्रियेचा कधी विचार करावा?**

- होय, काही विशिष्ट प्रकारचे अपस्मार चांगले नियंत्रित केले जातात किंवा अगदी योग्य शस्त्रक्रियेने बरा होतो. हे एक गुंतागुंतीचे आहे. स्थापन केलेल्या एपिलेप्सी सर्जरी सेंटरमध्ये टीमचा निर्णय. एपिलेप्सी सर्जरीचा विचार केला पाहिजे जेव्हा:

1. तीन एपिलेप्टिक औषधांच्या मिश्रणाच्या पूर्ण डोससह जप्ती नियंत्रण नाही.
2. एक अतिशय स्थानिकीकृत जप्ती फोकस (एपिलेप्सी शस्त्रक्रिया टीम याचे मूल्यांकन करू शकते).
3. अँटीपिलेप्टिक औषधांना असहिष्णुता आणि जीवाला धोका असलेल्या उच्च जप्तीची वारंवारता.
4. काही विशिष्ट प्रकरणांमध्ये अधिक संकेत आहेत.

# शहाडची पाणीयोजना उल्हासनगर महापालिकेला हस्तांतरीत होणार



**उल्हासनगर:** मुंबई महानगरातील विविध महापालिकांकडे स्वतःच्या पाणी पुरवठा योजना आहेत. उल्हासनगर शहराला शहाड पाणी पुरवठा योजनेतून पाणी पुरवठा केला जातो. ती योजना उल्हासनगर महापालिका हस्तांतरीत करावी या पालिकेच्या मागणीला राज्याचे उद्योगमंत्री आणि एमआयडीसीचे प्रमुख उदय सामंत यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

कल्याण लोकसभा मतदारसंघात मोडणाऱ्या उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील पाणी पुरवठ्याच्या समस्यांवर चर्चा करण्यासाठी आज (शुक्रवारी) खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने मंत्रालयात उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या दालनात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यात पालिकेच्या अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी शहरातील पाण्याच्या विविध समस्या उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासमोर मांडल्या.

उल्हासनगर शहराला शहाड येथील पाणीपुरवठा योजनेतून पाणी पुरवठा केला जातो. मुंबई महानगर क्षेत्रातील विविध महापालिका, नगरपालिकांचे स्वतःच्या पाणी पुरवठा योजना आहेत. त्याचप्रमाणे उल्हासनगर महापालिका क्षेत्राला पाणी पुरवठा करणारी शहाड पाणीपुरवठा योजना उल्हासनगर महापालिकेला हस्तांतरीत करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

त्यावर तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत उद्योग मंत्री उदय सामंत यांनी संबंधित अधिकाऱ्यांना ही योजना हस्तांतरीत करता येईल का, याचा अभ्यास करण्याचे आदेश दिले. जर महापालिका ही यंत्रणा चालवू शकणार असेल ती त्यांना देण्यात हरकत नसल्याचेही सामंत म्हणाले. उल्हासनगर शहराला उच्च दाबाने पाणीपुरवठा करण्यासाठी एक्सप्रेस फिडर देण्याची मागणी एमआयडीसी प्रशासनाकडे करण्यात आली होती. त्यावर बोलताना, एक्सप्रेस फिडर तातडीने मंजूर करून द्यावेत, असे आदेश उद्योग मंत्र्यांनी दिले.

उल्हासनगर शहराची पाण्याची वाढती मागणी पाहता शहराला एमआयडीसीकडून अतिरिक्त 50 दशलक्ष लीटर पाणी द्यावे अशी मागणी करण्यात आली. त्यावरही उदय सामंत यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

उल्हासनगर शहराला पाणी पुरवठा करताना एमआयडीसी 120 दशलक्ष लीटर पर्यंतच्या पाण्यासाठी 8 रुपये तर त्यावरील पाण्यासाठी 12 रुपये प्रति हजार लीटर दर आकारते. मात्र शहराला एकच दराने पाणी द्यावे अशी मागणी यावेळी करण्यात आली. त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश यावेळी मंत्री महोदयांनी दिले. त्यामुळे पालिकेच्या तिजोरीवरील आर्थिक भार कमी होणार आहे.

उल्हासनगर शहराला शहाड, पाले आणि जांभूळ येथून जलवाहिन्यांद्वारे पाणी पुरवठा केला जातो. मात्र पाले येथील जोडण्यांमधून येणारे पाणी कमी दाबाने येत असल्याने येथील नागरिक सातत्याने तक्रारी करत असतात, अशी भूमिका माजी नगरसेवक अरुण आशान यांनी मांडली. त्यावर दिलासा देण्यासाठी एमआयडीसी प्रशासनाने पाऊले उचलण्याची मागणी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केली. त्यावर बोलताना हा पाण्याचा दाब वाढवण्यात येईल असे मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले. उल्हासनगर शहरातील पाणी प्रश्नावर सातत्याने पाठपुरावा करुनही निर्णय होत नव्हते. मात्र शुक्रवारी झालेल्या या पहिल्याच बैठकीत उद्योगमंत्री उदय सामंत यांनी तत्काळ सकारात्मक निर्णय घेतल्याचे सांगत त्यांचे उल्हासनगरवासियांच्या वतीने खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी आभार मानले.



## ठाण्यात कोरोनाचे नवीन १४ रुग्ण

**ठाणे:** शहरातील नविन कोरोना रुग्णवाढ आटोक्यात आली असून आज 14 रुग्ण सापडले आहेत.

विविध रुग्णालयात आणि घरी उपचार सुरु असलेल्या रुग्णांपैकी 13जण कोरोनामुक्त झाले आहेत. आत्तापर्यंत एक लाख 94,395 रुग्ण ठणठणीत बरे होऊन घरी गेले आहेत तर रुग्णालय आणि घरी 106 जणांवर उपचार सुरु आहेत. आज एकही जण दगावला नसून आत्तापर्यंत 2,162 रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

महापालिका प्रशासनाने काल शहरातील 557 नागरिकांची चाचणी घेतली होती. त्यामध्ये 14जण बाधित सापडले. आत्तापर्यंत 25 लाख 27,081 ठाणेकरांची चाचणी घेण्यात आली असून त्यामध्ये एक लाख 96,663जण बाधित मिळाले आहेत.

# मोस्ट व्हॅल्युएबल ब्रँड पुरस्काराने 'पितांबरी' सन्मानित

**ठाणे:** गेल्या 33 वर्षांच्या यशस्वी वाटचालीत 'पितांबरी' प्रॉडक्ट्स प्रा.लि. ने ग्राहकांच्या प्रथम पसंतीसोबतच आपल्या कर्तृत्वाने उद्योजकीय क्षेत्रातील अनेक मानसन्मान मिळवले आहेत. यात आता आणखी एका अतिशय प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या पुरस्काराचा समावेश झाला आहे.

दि बिझनेस लीडरशिप ॲवॉर्डस् 2022 या पुरस्कार सोहळ्यात पितांबरी प्रॉडक्ट्स प्रा.लि. ला मोस्ट व्हॅल्युएबल ब्रँड पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. पितांबरीचे व्हाइस चेअरमन परीक्षित प्रभुदेसाई यांनी कंपनीच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला. 'फेदर टच' या संस्थेच्या वतीने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले होते.



पितांबरीचे व्हाईस चेअरमन परीक्षित प्रभुदेसाई यांना पुरस्कार प्रदान करताना सुप्रसिद्ध अभिनेत्री उदिता गोस्वामी आणि गोल्डस्टार ज्वेलरी प्रा.लि. च्या व्हाइस प्रेसिडंट डॉ. सौम्या बदगायन

## महापालिका वर्धापनदिनाच्या निमंत्रणपत्रिकेत फडणवीसांचा विसर

**ठाणे:** ठाणे महापालिकेच्या 40 व्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमपत्रिकेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा महापालिकेला विसर पडला आहे. या प्रकरणी भाजपाचे माजी नगरसेवक नारायण पवार यांनी हरकत घेतली असून, नवनियुक्त प्रशासक व आयुक्त अभिजीत बांगर यांच्याकडे पत्राद्वारे कडक कारवाईची मागणी केली आहे.

ठाणे महापालिकेच्या चाळीसाव्या वर्धापनदिनानिमित्ताने प्रशासनाच्या वतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावाबरोबरच पालकमंत्री शंभूराज देसाई, स्थानिक खासदार व आमदारांची नावे प्रसिद्ध करण्यात आली आहेत. मात्र, त्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा समावेश करण्यात आलेला नाही, हे धक्कादायक आहे, असे माजी नगरसेवक नारायण पवार यांनी आयुक्तांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे.

राज्य सरकारकडून प्रसिद्ध होणाऱ्या सर्वच जाहिरातींमध्ये मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचे नाव नमूद करण्यात आलेले असते. तो राजशिष्टाचाराचाच भाग आहे. मात्र, ठाणे महापालिकेने केवळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सोहळा होत असल्याचा उल्लेख केला आहे. हा प्रकार अत्यंत धक्कादायक व निषेधार्ह आहे.







